# मॉडर्न

१९९६-९७



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

**मॉडर्न महाविद्यालय, पुणे - ४११००५.**

# मॉडर्न नियतकालिक

## १९९६-९७

**-: संपादक समिती :-**

**★ अध्यक्ष ★**

प्राचार्य पी. डी. आपटे

**★ संपादन ★**

डॉ. स्नेहल तावरे

**★ सदस्य ★**

प्रा. बी. जी. वाणी

प्रा. अनुराधा कुलकर्णी

प्रा. सी. टी. प्रधान

प्रा. संजीवनी रहाणे

प्रा. लीना पाटणकर

प्रा. सुजाता गायतोंडे

प्रा. वंदना जोशी

प्रा. विजय शेळके

# From IV

Statement about ownership and other particulars about

## PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S
## *MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE AND COMMERECE PUNE - 411 005.*

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Pune |
| 2. | Peridicity of its Publication | : | Annual |
| 3. | Printer's Name | : | Mr. L. V. Tawre<br>Snehavardhan Publishing House,<br>863, Sadashiv Peth, Pune - 411 030. |
| 4. | Cover Photo | : | Mr. Rajshekhar Divan |
| 5. | Publisher's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Prin. P. D. Apte<br>Modern College of Arts, Science and Commerce, Pune - 5. (Indian) |
| 6. | Editor's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Prin. P. D. Apte<br>Modern College of Arts, Science and Commerce, Pune - 5. (Indian) |
| 7. | Name and address of individuals, who own the paper and partners | : | Modern College of Arts, Science and Commerce, Pune - 5. (Indian) |
| | or shareholders holding more than one percent of the total capital | : | Not applicable |

I, P. D. Apte hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Prin. P. D. Apte**
Signature of Publisher

# संपादकीय

जितुकें कांही आपणास ठावें । तितुके हळूहळू सिकवावें ।
शाहाणे करून सोडावे । बहुत जन ।।

– समर्थ रामदास

मॉडर्न महाविद्यालयाने पंचवीस वर्ष पूर्ण करून आपल्या यशस्वी जीवनाची पुढील वाटचाल नव्या जोमाने, उत्साहाने आणि विद्यार्थ्यांच्या सर्वतोपरी कल्याणाच्या प्रयत्नाने सुरू केलेली आहे. समर्थ रामदासांच्या वरील उक्तीचा आदर्शच प्राध्यापकांच्या नजरेसमोर असल्याने अल्पावधीत एक चांगले, उपक्रमशील महाविद्यालय म्हणून मॉडर्न महाविद्यालयाचा नावलौकिक सर्वत्र झालेला आहे.

सर्वच विद्यार्थी अभ्यास करीत असतात पण अभ्यासाचेही एक तंत्र असते. हे तंत्र आत्मसात केले तर यश निश्चितच मिळते. ही यशाची गुरुकिल्ली विद्यार्थ्यांसाठी प्रा. सुरेश मेहता यांनी 'अभ्यास कसा करावा' या लेखाद्वारे दिलेली आहे. उज्ज्वल यशासाठी विद्यार्थ्यांनी या लेखाचा उपयोग करून घ्यावा आणि भावी आयुष्यात वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रगती करून दाखववावी, संशोधन करावे. अर्थात या सर्वांच्या मुळाशी असलेली 'अभ्यासू वृत्ती' ही एक अत्यावश्यक गोष्ट झालेली आहे. केवळ महाविद्यालयातील हाताच्या बोटावर मोजण्या इतक्याच विद्यार्थ्यांना सुयश मिळावे अशी अपेक्षा कोणीच करणार नाही तर सर्वच विद्यार्थी निरनिराळ्या क्षेत्रात पारंगत झाले पाहिजेत. अमेरिकेचे हेन्री किसींजर चालू शतकाला 'अमेरिकन शतक' म्हणायचे, याचे कारण अमेरिकेचा जगभर पडलेला प्रभाव हे आहे. काही विद्वानांना हे मान्य होणार नाही, तरीही १९९६ हे वर्ष अमेरिकेचेच आहे हे ते मान्य करतात. याच धर्तीवर असे म्हणावेसे वाटते की आमच्या या भावी नागरिकांनी पुढील शतक हे 'भारतीय शतक' म्हणून निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील व्हावे. 'प्रयत्नांती यशेश्वर' का मिळणार नाही? मात्र कोणत्याही प्रकारचा 'दुबळे'पणा आला की आपल्यावर इतरजण दडपण आणण्याचा प्रयत्न करतात. सर्वच बाबतीतील दुबळेपणा समूळ नष्ट होणे आवश्यक आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर इतरही क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. पुष्कर कुलकर्णी आंतरराज्य स्पर्धेत पहिला आला. माधुरी पटवर्धन राष्ट्रीय खेळाडू म्हणून बास्केट बॉल स्पर्धेत चमकली, शकील पठाणची नेपाळमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली. अनुप्रिता मगरची कमर्शिअल पायलट म्हणून ऑस्ट्रेलियासाठी निवड झाली. म्हणजे केवळ आपल्या देशातच नव्हे तर आमचे विद्यार्थी परदेशात निश्चितच यश मिळविणार यात काहीच शंका नाही. आमचे विद्यार्थी विविध शिबिरांमध्ये ज्याप्रमाणे चमकतात, अनेक स्पर्धांमध्ये ते यशस्वी होतात या सर्वांचेच आम्हाला कौतुक वाटते. आशिष मालाणी याला बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेत गणितामध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. यापुढेही असेच यश मिळावे.

नेहमीप्रमाणेच या वर्षीही कविता अधिक संख्येने आल्या होत्या. हायकूप्रमाणे चार ओळीच्या कविता करण्याची उर्मी अनेकांमध्ये दिसून आली. वेगवेगळ्या विषयांवरील लेखांचे स्वरूप पाहता विद्यार्थ्यांना संतांची

महती जशी समजते तशीच विज्ञानाची थोरवीही त्यांना माहीत आहे. आपल्या आजूबाजूला कोणकोणत्या घडामोडी घडत आहेत हे जाणून घेण्याची, त्यावर भाष्य करण्याची क्षमता आमच्या विद्यार्थ्यांमध्ये आहे. म्हणूनच भ्रष्टाचाराबद्दल ते लिहितात, तसेच अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचीही त्यांना जाणीव आहे. 'स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाबद्दल जागरूक तरुण नागरिकांचे मनोगत' वाचनीय आहे. शिक्षण हे जीवनोपयोगी असावे ही विद्यार्थ्यांची रास्त अपेक्षा आणि शिक्षणाचा बाजार मांडला जात आहे, याबद्दल त्यांना वाटणारी चिंता खरोखरच विचार करायला लावणारी आहे. योग्य करिअर कसे निवडावे हा लेख अनेक बाबींचा विचार करावयास लावणारा आहे. 'प्राण्यांचे संदेशवहन' हा निबंधस्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविणारा लेख विविधांगी माहिती देणारा आहे.

अंदाजपत्रकाबद्दल सर्वांनाच उत्सुकता असते. ते तयार कसे होते, त्याच्या कार्यवाहीची पद्धत कळावी म्हणून 'असे आकाराला येतात आपले अर्थसंकल्प' हा प्रा. सुरेश मेहता यांचा अभ्यासपूर्ण लेख जाणीवपूर्वक घेतला आहे.

यंदाच्या वर्षी प्रा. दातार, डॉ. धायगुडे आणि प्रा. गोखले हे तीन प्राध्यापक सेवानिवृत्त झाले. त्यांची महाविद्यालयातील आणि विशेषतः प्राध्यापक कक्षातील अनुपस्थिती सर्वांनाच जाणवणार आहे.

नियतकालिकांच्या मुखपृष्ठासाठी महाविद्यालयातीलच धबधब्याचे सुंदर छायाचित्र काढून दिल्याबद्दल श्री. राजशेखर दिवाण यांचे आम्ही आभारी आहोत.

नियतकालिकांच्या कामासाठी अनेकांचे साह्य मिळाले. नियतकालिकाचे अध्यक्ष प्राचार्य पी. डी. आपटे यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. नियतकालिकाच्या समितीतील सर्वच सदस्यांनी मदत केली. विशेषतः प्रा. प्रधान सरांनी इंग्रजी लेखांची प्रूफे तपासल्यामुळे बराचसा भार हलका झाला.

या वर्षी 'स्वच्छता दिना'चा एक अभिनव उपक्रम प्राचार्य आपटे यांच्यामुळे संपन्न झाला. सर्व विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या सहकार्याने महाविद्यालय अक्षरशः 'झाडून पुसून' स्वच्छ केले. महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्याचा एक आदर्श वस्तुपाठच प्राचार्य पी. डी. आपटे यांनी सर्वांसमोर ठेवलेला आहे. प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाला विद्यार्थ्यांच्या मेहनतीची जोड मिळावी ही प्राचार्यांची भावना आहे. १९९७ च्या बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत विनय काकडे हा पुणे विभागात प्रथम क्रमांकाने पहिला आला आहे. विनय काकडे याच्या यशाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. प्राचार्य आपटे आणि प्राध्यापकांनी केलेली विद्यार्थ्यांची निवड, त्यांना दिलेले विशेष मार्गदर्शन, प्रत्येक गुणासाठी करवून घेतलेली तयारी आणि विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत यामुळे गुणवत्ता यादीत मॉडर्न महाविद्यालयाचे विद्यार्थी चमकलेले आहेत. ही उज्ज्वल यशाची परंपरा अखंड चालू राहावी हीच अपेक्षा व्यक्त करते.

डॉ. स्नेहल तावरे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| अभ्यास कसा करावा? | प्रा. सुरेश मेहता | १७ |
| स्पर्श (कविता) | 'तारा' | १९ |
| अण्णा हजारे : एक असामान्य व्यक्तिमत्त्व | सोनाली थेटे | २० |
| वाघाला पळवून कसे लावले (विनोद) | सरिता गोतारणे | २१ |
| आशेचा किरण (कविता) | किरण गायकवाड | २१ |
| भ्रष्टाचाराचे स्वरूप | रवींद्र भोसले | २२ |
| एल.एल.एम.पी. (विनोद) | शुभांगी शिंदे | २४ |
| महत्त्वाची गोष्ट | शुभांगी शिंदे | २४ |
| स्वातंत्र्य (!) सुवर्णमहोत्सव : एका युवा नागरिकाचे मनोगत | निवेदिता देशमुख | २५ |
| अलंकार भ्रमनिरास (कविता) | रमेश राऊत | २६ |
| परिणाम विद्युत - चुंबकीय क्षेत्रांचे | उमर फारूक सुतार | २७ |
| राष्ट्रीय एकात्मता शिबीर - एक सुवर्णानुभव | छाया गायकवाड | २८ |
| चोराच्या उलट्या..... (विनोद) | तुषार रंधवे | २८ |
| स्त्री शक्तीची लाट | कल्पना भोकरे | २९ |
| गाढव सापडत नाही (विनोद) | सरिता गोतारणे | ३१ |
| झोपमोड (विनोद) | सरिता गोतारणे | ३१ |
| अर्थ (कविता) | पंकज ओव्हाळ | ३१ |
| फॅशन आवश्यक आहे का? | गीता बागल | ३२ |
| आरोप (विनोद) | सरिता गोतारणे | ३३ |

| | | |
|---|---|---|
| बहिणीचं प्रेम (कविता) . . . . . . . . . . . . | सचिन सोनवणे . . . . . . . . . . . . | ३३ |
| मला आवडलेले चरित्र पुस्तक . . . . . . . . | मनिषा थेटे . . . . . . . . . . . . . . | ३४ |
| भारत – 'आजचा आणि एकविसाव्या शतकातला' . . . . . . . . . . . . . | अनुजा गोरे . . . . . . . . . . . . . . | ३५ |
| माझे घर : माझी कल्पना . . . . . . . . . . . | वर्षाराणी रावतु . . . . . . . . . . . . | ३८ |
| जीवनमूल्ये (कविता) . . . . . . . . . . . . . . | मिहीर परमणे . . . . . . . . . . . . . | ३९ |
| प्राण्यांचे संदेशवहन (पारितोषिक प्राप्त निबंध) . . . | शशिकला मारणे . . . . . . . . . . . | ४० |
| कलाभिरुचीवर मराठी विभागातर्फे चर्चासत्र संपन्न . . | डॉ. स्वाती कर्वे . . . . . . . . . . . . | ४५ |
| चुटकुला . . . . . . . . . . . . . . . . . . . . | गीता बागल . . . . . . . . . . . . . . | ४८ |
| सोडून गेलात का? (कविता) . . . . . . . . . . | पूनम भोंडवे . . . . . . . . . . . . . . | ४८ |
| एक अविस्मरणीय आठवण . . . . . . . . . . . | छाया तांदळे, पूनम भोंडवे, वैजयंती दळवी . . . . . . . . . . . | ४९ |
| विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबद्दलच्या अपेक्षा . . . . . . . . | मीनल इंदोरे . . . . . . . . . . . . . . | ५० |
| काही घटना अशा असतात (कविता) . . . . . . . | मोनाली गोरे . . . . . . . . . . . . . . | ५१ |
| विष (कविता) . . . . . . . . . . . . . . . . . | योगेश खडके . . . . . . . . . . . . . . | ५१ |
| दोष तुमचा नाही (विनोद) . . . . . . . . . . . | तुषार रंधवे . . . . . . . . . . . . . . | ५१ |
| भीमाशंकर : एक निसर्गरम्य स्थळ . . . . . . . . | पूनम भोंडवे . . . . . . . . . . . . . . | ५२ |
| लोककला – स्वरूप . . . . . . . . . . . . . . . | शैलेंद्र काळे . . . . . . . . . . . . . . | ५३ |
| दुरावा (कविता) . . . . . . . . . . . . . . . . | कुणाल इंगळे . . . . . . . . . . . . . . | ५४ |
| असे आकाराला येतात आपले अर्थसंकल्प . . . . . . | प्रा. सुरेश मेहता . . . . . . . . . . . . | ५५ |
| यशस्वी जीवनाचा पाया . . . . . . . . . . . . . | उज्ज्वला रजपूत . . . . . . . . . . . . | ६१ |
| भ्रष्टाचार . . . . . . . . . . . . . . . . . . . | सुनीता पाटील . . . . . . . . . . . . . | ६३ |
| रोजगाराभिमुख शिक्षणविषयक धोरणाचे महत्त्व . . . | 'विद्यार्थी' . . . . . . . . . . . . . . . | ६५ |

| | | |
|---|---|---|
| चला भाज्यांच्या बाजारात जाऊ | चैताली माने | ६६ |
| जीवन (कविता) | रवींद्र भोसले | ६७ |
| थँक गॉड (विनोद) | शुभांगी शिंदे | ६७ |
| सुख-दुःख (कविता) | बीना बाळपाटकी | ६७ |
| माझी माय (कविता) | गुलाब मोरे | ६८ |
| जीवन (कविता) | पल्लवी पालांडे | ६८ |
| क्रांतिकारी कवि : सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' | चैताली माने | ६९ |
| दिल्ली बहुत दूर है (कविता) | मुकुंद वडुसकर | ७० |
| संत तुलसीदास | क्रांती पाटील | ७१ |
| नौजवानों (कविता) | मदन उंडे | ७२ |
| Riddles | Mihir Paramane | ७३ |
| Teaching of a Father | Rupali Rajopadhye | ७४ |
| Seminar on Services Marketing | Dr. B. S. Dole | ७५ |
| Advanced Communcation Technology | Prof. S. R. Chaudhari | ७६ |
| Faith/ Destiny (Poem) | Siby Kurian | ७९ |
| An Upside - Down Tale (Poem) | Aniket Kulkarni | ७९ |
| Dink Culture | Siby Kurian | ८० |
| Book Review | Dipti Thakur | ८२ |
| College Student (Poem) | Vinit Kalantre | ८२ |
| Choosing the right Career | Manish Sansare | ८३ |
| Terrorism | Aniket Kulkarni | ८४ |
| "Knock, knock who's there?" | Sharan Shetty | ८६ |
| अहवाल | | ९३ ते १२० |


★ ★ ★

# उज्ज्वल यशाची परंपरा



विनय विजय काकडे
इयत्ता बारावीत पुणे विभागात मार्च १९९७ मधील परीक्षेत
९४.६७% गुण मिळवून सर्वप्रथम

| | | |
|---|---|---|
| ★ ज्योती सुरेश शिरोळेकर | गुणवत्ता क्र. १० | ९२.५०% गुण |
| ★ तुषार अविनाश शेठजी | गुणवत्ता क्र. ११ | ९२.३३% गुण |
| ★ अनुजा विजय मुळे | गुणवत्ता क्र. १४ | ९१.८३% गुण |

## सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मॉडर्न महाविद्यालयातर्फे

# हार्दिक अभिनंदन

# प्रेरणास्थान




प्राचार्य पद्माकर आपटे



**प्रा. व्ही. जी. जोशी**
उपप्राचार्य, कला शाखा



**डॉ. माधवी मित्र**
उपप्राचार्य, वाणिज्य शाखा



सायन्स असोसिएशन



कला मंडळ



राष्ट्रीय सेवा योजना



एन. सी. सी.



क्रीडा मंडळ



लांघे धनाजी अर्जुनराव
'मॉडर्न श्री' ९६-९७

## विविध शिबिरांमध्ये निवड झालेले विद्यार्थी



**छाया गायकवाड**
राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड



**सुमेदिन इनामदार**
सिनिअर ऑफिसर, आर्मी विंग



**अनुप्रिता मगर**
कमर्शियल पायलट, ऑस्ट्रेलियासाठी निवड



**वृषाली दळवी**
सर्वोत्कृष्ठ एनएसएस स्वयंसेविका पुणे विद्यापीठ पुरस्कार



**आशिष पाटील**
क्रॉसकंट्री आंतरमहाविद्यालयीन, प्रथम क्रमांक



**श्रीनिवास पी. बाकरे.**
एन. सी. सी. एअरविंग, राजगिर कॅम्पसाठी निवड



**राजश्री जैन**
एटीसी ९७ दिघी वक्तृत्व स्पर्धेत सुवर्ण पदक

## विशेष उल्लेखनीय यशाचे मानकरी



**पुष्कर अरविंद कुलकर्णी**
स्केटिंग, आंतरराज्य स्पर्धा, प्रथम



**योगेश देसाई**
आयपीए. पोस्टर स्पर्धेत
द्वितीय क्रमांक



**प्रेमा कुलकर्णी**
व्हॉली बॉल विद्यापीठ खेळाडू



**आशिष मालाणी**
१२ वी, बोर्डात गणितात
१०० पैकी १०० गुण



**माधुरी पटवर्धन**
बास्केट बॉल, राष्ट्रीय खेळाडू



**अर्चना बंजारी**
प्रथम क्रमांक,
एन.सी.एल. निबंध स्पर्धा



**लीना योगानटे**
स्केटींग, हॉकी



**शरण शेट्टी**
आयपीए. निबंध स्पर्धेत
तृतीय क्रमांक



**शकील पठाण**
ब्लॅक बेल्ट परीक्षेत प्रथम क्रमांक
नेपाळमधील आंतरराष्ट्रीय कराटे
स्पर्धेत निवड

# अभिनंदन



**डॉ. स्वाती कर्वे**
मराठी विषयात पीएच.डी. पदवी



**प्रा. गीताराम गायकवाड**
प्रमुख, कनिष्ठ महाविद्यालय



**प्रा. प्र. ग. दीक्षित**
राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ,
सर्वोत्तम कार्यक्रमाधिकारी पुरस्कार



**सायन्स असोसिएशनच्या वार्षिक समारंभात पुरस्कार देताना प्रा. एम. एस. वाडिया**



कबड्डी उपविजेता संघ, वरिष्ठ महाविद्यालय



'सर्व्हिसेस मार्केटींग' या चर्चासत्राचे उद्घाटन करताना प्रा. पी. डी. पारखी

# अभ्यास कसा करावा?

प्रा. सुरेश मेहता (सी. ए.)

वार्षिक परीक्षेचा हंगाम नेहमी येतो. सारा विद्यार्थीवर्ग परीक्षेच्या तयारीसाठी घोकमपट्टी आणि रात्रीचा दिवस (आणि दिवसाची रात्र) करावयास लागतो. परीक्षा जसजशी जवळ येईल तसा विद्यार्थ्यांवरचा मानसिक ताण वाढत जातो ह्या सार्वत्रिक आणि पारंपरिक दृश्याची आपणास चांगलीच सवय झालेली आहे. अशा प्रकारची जागरणे, मानसिक ताण इत्यादींमुळे काही विद्यार्थी नेमके परीक्षेच्या वेळेसच आजारी पडतात आणि आपले बहुमोल वर्ष वाया घालवतात. अशी बरीच प्रकरणे आपणास माहिती असतात. असे प्रसंग का येतात त्याचा सखोलपणे विचार केल्यास आपणास लक्षात येईल, की बहुतांश विद्यार्थी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास न करता अभ्यासासाठी धोपटमार्ग अनुसरतात. ह्या लेखामध्ये अभ्यास कसा करावा आणि उत्तमतऱ्हेने अभ्यास केल्यानंतर प्रश्नांची उत्तरे कशी लिहावीत ह्याची चर्चा केली आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास हा नियमितपणे आणि वर्षाचे सुरुवातीपासूनच केला पाहिजे. ज्याप्रमाणे आपण सामान्यतः दररोज ठराविक वेळेला परंतु दोनदा जेवतो, त्याप्रमाणे दररोज ठराविक वेळेला विद्यार्थ्यांनी नियमितपणे आपला अभ्यास केला पाहिजे. कोणत्या वेळेला अभ्यास करावा हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या उपलब्ध वेळेनुसार ठरविता येईल. हा ढोबळ संकेत खरा असला तरी साधारणपणे पहाटेच उठून ५ वाजल्यापासून ६ ते ६॥ वाजेपर्यंत केलेला अभ्यास अत्यंत फायदेशीर ठरतो कारण पहाटे सामान्यतः सर्वत्र शांतता असते. त्यामुळे मन एकाग्र करणे शक्य होते. तसेच नुकतीच झोप पूर्ण झालेली असल्याने मनही उल्हसित असते. साधारणपणे ८ तास नियमितपणे झोप घेणे विद्यार्थी वर्गाच्या दृष्टीने हितावह आहे. पहाटेचा अभ्यास करणे बहुतांशी विद्यार्थ्यांना शक्य आहे. किती वेळ अभ्यास करावा हाही भाग ह्या ठिकाणी महत्त्वाचा आहे. कोणत्याही वर्गात विद्यार्थी असला तरी एकूण अभ्यासक्रमाचा भार लक्षात घेता किमान ३-४ तास अभ्यास करणे जरूर आहे. एका वेळेस एकाग्रतेने प्रत्येकी २ तास ह्या प्रमाणे ४ तास अभ्यास करता येईल. हल्ली तीव्र स्पर्धेच्या धूळफेकी नावाखाली शिकवणी वर्गास जाणे गरजेचे अगर प्रतिष्ठेचे मानले जाते. त्यामुळे शाळा आणि शिकवणी वर्गाची वेळ लक्षात घेऊनच अभ्यासाच्या वेळेची ढोबळ बैठक ठरवता येईल. अशी अभ्यासाची वेळ, प्रमाण, पद्धत, हे सर्व पूर्व-नियोजित असले तर त्याचा दीर्घकालीन फायदा विद्यार्थ्यांना होतो.

कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना अत्यंत शास्त्रोक्त पद्धत अनुसरणे आवश्यक आहे. त्यासाठी त्या विषयाचे मूलभूत तत्त्व समजावून घेणे अत्यंत जरूर आहे. कारण एकदा त्याची समज पक्की झाली, की त्यावर आधारित कशाही पद्धतीने विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देणे शक्य होते. आणि शिवाय त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे. विशेषतः परीक्षागृहातील हा तुमचा अत्यंत विश्वसनीय साथीदार असतो. उदा. अंकगणितातील नफा-तोटा हे प्रकरण अभ्यासताना ह्या प्रकरणातील खरेदी, विक्री, नफा-तोटा ह्या चार मूलभूत संकल्पना उत्तम तऱ्हेने समजावून घेतल्यानंतर परीक्षेस ह्या प्रकरणावर विचारलेल्या उदाहरणांतून दिलेल्या माहितीच्या आधारे कोणतेही उत्तर काढता येईल. उदा. नफा-तोटा दिलेला असेल तर खरेदी–विक्री काढता येईल, त्याचे प्रमाण काढता येईल इ. या ठिकाणी घेतलेले अंकगणिताचे उदाहरण हे प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांपासून पदव्युत्तर वर्गापर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला समजू शकेल असे

मुद्दामच घेतलेले आहे. प्रत्येक विषयाचा मूळ गाभा मनापासून समजावून घेण्याचे हे तत्त्व गणिताप्रमाणे भाषांचे व्याकरण, शुद्धलेखन, बीजगणित, भूमिती, विज्ञान, रसायन व सर्वच विषयांना, शास्त्रांना लागू आहे. त्यामुळे वार्षिक परीक्षेसाठी (आणि आयुष्याच्या परीक्षेतही) घोकमपट्टी करावी लागत नाही. आपण एखादे तत्त्व नीट समजावून घेतल्यानंतर मग त्यांचा वापर कसा करावा ह्यासाठी मर्यादित सराव केला तरी चालू शकतो. उदा. ह्या पद्धतीने अंकगणितातील प्रकरणावरील ४-५ उदाहरणे सोडविली तरी चालतील. संख्येपेक्षा प्रथम दर्जा (First Quality and the Quantity) हे जागतिक सत्य येथे लागू आहे.

हे मूलभूत तत्त्व समजावून घेताना विद्यार्थ्यांना बरेच वाचनही करावे लागते. वाचनातून अभ्यास करीत असताना संबंधित पाठ अगोदर पूर्णपणे एकाग्र मनाने वाचून काढावा. त्यातील काही मुद्दे नीट उमगले नसतील, तर तो पाठ पुन्हा वाचावा आणि त्यातील विचारांची चौकट नीट समजावून घ्यावी. असे केल्यानंतर वहीच्या एका पानावर हे सर्व संबंधित मुद्दे सारांश रूपाने लिहून काढावेत. त्यासाठी त्या पाठाचे मनन करावे, शेवटी हे मुद्दे पुस्तकांतील मूळ पाठाशी ताडून पाहावेत; म्हणजे एखादा राहिलेला मुद्दा त्यात वाढविता येईल, चुकलेला मुद्दा दुरुस्त करता येईल आणि नको असलेला मुद्दा काढून टाकता येईल. ह्यामुळे तुमची ह्या विषयांची जवळची ओळख होईल आणि खऱ्या अर्थाने तुम्ही विषयाशी एकरूप व्हाल. हा प्रयोग मी स्वतः माझ्या सी. ए. च्या परीक्षेच्या वेळी केलेला आहे आणि अपेक्षेपेक्षा जास्त यश मला मिळाले आहे.

सामान्यतः पाठांतर करण्याकडे बऱ्याच विद्यार्थ्यांचा कल असतो. परंतु माझ्या मते पाठांतर करणे म्हणजे ''काखेत कळसा आणि गावाला वळसा'' असा प्रकार होय. पाठांतरामध्ये आपण स्मरणशक्तीवर जास्त अवलंबून राहत असतो. एखाद्या वेळी आत्मविश्वासाच्या अभावी स्मरणशक्ती दगाही देऊ शकते आणि आपले पाठांतर करण्यातील श्रम वाया जातात. म्हणून विद्यार्थ्यांनी पाठांतरावर जास्त अवलंबून राहू नये. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाठांतर केले म्हणजे अभ्यास झाला असे मुळीच नाही. वर विवेचन केल्याप्रमाणे अभ्यासाचा हेतू, तत्त्व, मूलभूत गाभा समजावून घेणे हा आहे. पाठांतराने तो साध्य होत नाही.

काही पातळीवर – विशेषतः वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी समूह-अध्ययनाची कल्पना अमलात आणावयास हरकत नाही. म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाने स्वतंत्रपणे एखाद्या पाठाचा अभ्यास केल्यानंतर त्याच विषयावर सामूहिक चर्चा आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करावी. त्यामुळे त्या विषयाकडे बघावयाचा प्रत्येकाचा दृष्टिकोन, त्याचे विचार त्यांची देवाण घेवाण करणे सुलभ होते, विषयाचे आकलनही नीट होते आणि त्या विषयाची व्याप्ती अधिक स्पष्टपणे आपणास समजून त्यावर प्रभुत्व मिळवता येते. ही गोष्ट डोळ्यांसमोर ठेवूनच नेहमी सी. ए. सारख्या व्यावसायिक लोकांच्या संघटना नियमितपणे वेगवेगळी चर्चासत्रे आयोजित करीत असतात. ह्या प्रकारच्या चर्चासत्रांचे ध्वनिफित अगर दृक्श्राव्यफितीवर रेखांकन करून ज्या ठिकाणी अशी चर्चासत्रे घेता येणार नाहीत अशा विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ध्वनिफित अगर दृश्य फिती अभ्यासासाठी उपयुक्त ठरू शकतील.

हे सर्व केले तर तुमची सर्व विषयांवरील पकड चांगल्या प्रकारे घट्ट होईल. उत्तम तऱ्हेने केलेला अभ्यास परीक्षागृहातील आणि जीवनातील तुमचा आत्मविश्वास वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. तथापि, परीक्षेत उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण होण्यासाठी नुसते एखाद्या विषयाचे आकलन पुरेसे नाही, तर तो विषय तुम्हाला योग्य तऱ्हेने उत्तरपत्रिकेत मांडता येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी तुम्ही ज्या भाषेत उत्तर लिहिणार आहात त्या भाषेची आणि त्या भाषेच्या व्याकरणाची चांगली माहिती करून घेणे जरूर आहे. स्पष्ट, नेमक्या आणि मर्यादित शब्दांत तुम्हाला तुमचे विचार मांडता आले पाहिजेत. शुद्धलेखनाचे सर्व नियम, काना, मात्रा, पहिली / दुसरी वेलांटी आणि उकार, अनुस्वार, जोडशब्द, अवतरण चिन्हे, उद्गारवाचक

चिन्हे, प्रश्नचिन्हे केव्हा आणि कोठे वापरावीत हे नीट आकलन करून घेतले पाहिजे. इंग्रजीतील शब्दांची (Spellings) नीट लक्षात ठेवली पाहिजेत. अभ्यास करतानाच हे व्याकरणाचे नियम डोळ्यांत तेल घालून सूक्ष्म निरीक्षणाद्वारे करून घेतले तर त्याच्या वेगळा विचार, अभ्यास तुम्हास करावयास लागणार नाही.

अभ्यासानंतर उपयुक्त अवांतर वाचन करणे अत्यंत फायदेशीर ठरते. त्यामुळे आपली दृष्टी अधिक व्यापक होते. विचार अधिक प्रगल्भ होतात आणि मुख्य म्हणजे त्याचा उपयोग तुमच्या भाषेत तुम्हाला तुमचे सर्व विचार मोजक्या शब्दांत परंतु परिणामकारकरीत्या व्यक्त करण्यासाठी होतो. उत्तरे लिहिताना विषयाचे मुद्दे आणि परिणामकारक शब्दरचना ह्या बरोबर सुवाच्च अक्षर असणे आवश्यक असते. तसा प्रयत्नच नव्हे तर तशी सवयच विद्यार्थ्यांनी लावून घ्यावी. ही चांगली सवय तुम्हाला परीक्षेतच नव्हे तर आयुष्यभर साथ देईल.

एवढी काळजी घेऊनही एखाद्या वेळेस आपणास एखादा शब्द, ओळ अगर परिच्छेद खोडावयाची वेळ येते. अशा वेळी चुकीच्या ओळीवर, शब्दावर अगर परिच्छेदावर नागमोडी रेघा मारू नयेत. अगर गिरवागिरव करू नये. त्याऐवजी त्यावर पट्टीने दोन समांतर सरळ रेघा माराव्यात आणि योग्य शब्द, ओळ अगर परिच्छेद पुन्हा लिहावा. चूक दुरुस्ती करण्याची ही पद्धत तुमच्या उत्तराचे सौंदर्य निश्चितच बिघडविणार नाही. उलट माझ्या मते ते अधिक आकर्षक होईल.

उत्तरे लिहिताना मुख्य मुद्दे अधोरेखित करावेत. प्रत्येक मुद्दा स्वतंत्र परिच्छेदात लिहावा. आपल्या मुद्याच्या समर्थनार्थ रोजच्या जीवनातील झटकन पटणारे उदाहरण द्यावे. ते जास्त परिणामकारण ठरते. उदा. 'आदर्श नागरिक कसा असावा' ह्या विषयावरील निबंध लिहिताना नागरिक कचरापेटीत कचरा न टाकता इतरत्र टाकतात यासारखे चटकन पटणारे उदाहरण देता येईल. नियमितपणे अभ्यास केला तर आपल्याला परीक्षेच्या हंगामात जागरणे करावी लागणार नाहीत. त्यासाठी दुर्मिळ अशी वीजही वाया घालवावी लागणार नाही आणि झोप न येणारी उत्तेजक औषधेही घ्यावी लागणार नाहीत. हे सर्व नियमितपणे अखंडितरीत्या करण्यासाठी आपण शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी असणे जरूर आहे. म्हणून नियमित अभ्यासाबरोबर नियमित व्यायाम करणे जरूर आहे. त्यामुळे उच्च शारीरिक क्षमता तुम्हास प्राप्त होईल. श्रद्धा हा यशस्वी जीवनातील अजून एक महत्त्वाचा घटक आहे. म्हणून अभ्यास आणि व्यायामाबरोबरच आपली श्रद्धा असेल तर ती असणाऱ्या देवतेची नियमित उपासना केल्यामुळे आपणास मनःशांती मिळेल. आयुष्य ही तुम्हाला मिळालेली एकाच वेळची अमूल्य देणगी आहे. तिचा शक्य तेवढा चांगला वापर करावा हेही जरूर लक्षात घ्यावे. अभ्यास करताना आणि परीक्षेत उत्तरे लिहिताना ही काही सोपी आणि उपयुक्त पथ्ये पाळली तर नेत्रदीपक यश तुम्हाला निश्चितच मिळेल ह्यात शंकाच नाही.

★ ★ ★

## स्पर्श

नंदनवनातील कळीला
फुलविले दवाच्या थेंबाने
फुलली कळी झाले फूल
त्याच्या लाडिक स्पर्शाने ॥१॥

इतकी रंगली त्याच्या रंगात
की विसरली स्वतःचा रंग
खुळी कळी होऊन गेली
त्याच्याच रंगात धुंद ॥२॥

वेडी कळी देऊन बसली
होते, नव्हते ते सर्व
मनात मात्र म्हणत होती
याहून वेगळा आहे का स्वर्ग ॥३॥

तारा
द्वितीय वर्ष, विज्ञान

# अण्णासाहेब हजारे : एक असामान्य व्यक्तिमत्त्व

कु. सोनाली थेटे, द्वितीय वर्ष, कला

गतवर्षी कोणत्या विषयाची चर्चा होती याची निवड करावयास मला सांगितले तर मी निश्चितच भ्रष्टाचाराची निवड करीन. आज महाराष्ट्र सरकारमधील अनेक मंत्री संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले दिसतात. कुणी खुनाच्या गुन्ह्यात, तर कुणी जमिनीच्या गुंत्यात, तर कुणी 'बरखा'च्या प्रेमात! भ्रष्टाचारीविरुद्ध साऱ्या राज्यात रण पेटवणाऱ्यांत व स्वच्छ शासनाची 'तुतारी' फुंकणाऱ्यात 'अण्णा हजारे' यांचा सिंहाचा वाटा आहे. राज्यातील भ्रष्टाचार प्रकरणात आपला पुन्हा एकदा विश्वासघात झाल्याची भावना जनतेच्या मनात निर्माण झाली आहे. म्हणूनच राळेगणसिद्धीच्या अण्णा हजारे यांना जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळताना दिसून येतो.

राळेगणसिद्धीतून सुरू झालेले भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सध्या महाराष्ट्रभर घुमत आहे. या आंदोलनाची कक्षा कदाचित भारताभर विस्तारण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अण्णा हजारे यांनी राजकीय पक्षाला दिलेला दणका मोठा जबरदस्त होता. भ्रष्टाचारासंबंधीच्या तक्रारी, मंत्र्यांविरुद्ध आरोप, कारवाई व्हावी म्हणून सरकारशी केलेले सहकार्य व ठोस कारवाई व्हावी यासाठी समिती स्थापन करण्याची दाखवलेली तयारी ही सारी टोलवाटोलवी आहे. पुरावे दिल्यानंतरही पुरावे मागणे हे 'राजकारण' लक्षात आल्याने अण्णांनी राळेगणसिद्धीला वीस दिवस उपोषण करून सरकारचे धाबे दणाणून सोडले. शशिकांत सुतार आणि महादेव शिवणकर या युती सरकारमधील दोघा मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकडे राजीनामे सादर केले. त्यांचे राजीनामे स्वीकार न करता निवृत्त न्यायमूर्ती पुराणिक यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली. मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढल्यानंतर चौकशी करा ही मागणी करण्यात आली.

एवढे करूनही आपले ध्येय पूर्ण होत नाही हे स्पष्ट झाल्यामुळे अण्णांनी राजव्यापी दौरा केला. जनतेने याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अण्णांच्या सभांना लोकांचा जसजसा पाठिंबा मिळू लागला तसतसा शिवसेनाप्रमुख 'बाळासाहेब ठाकरे' यांचा स्वतःच्या जिभेवरील ताबा सुटू लागला. "अण्णांनी राळेगणसिद्धीत काय केलंय ते आम्हाला माहिती आहे. 'अण्णांचा' आता 'खैरनार' झाला" अशी विधाने करून अण्णांच्या आंदोलनालाच अप्रत्यक्षपणे आव्हान दिले.

सैनिकी पेशातून निवृत्त झाल्यानंतर अण्णांनी राळेगणसिद्धी या आपल्या गावातील समस्या जाणून घेऊन स्वतः झीज सोसून विधायक कार्य उभे केले. अण्णा जे काम हाती घेतात त्यात त्यांना कसलाही स्वार्थ नसतो. याचा प्रत्यय महाराष्ट्राला येऊ लागला. अण्णांचे आंदोलन संपविण्याचे अनेक प्रयत्न आज राजकीय वर्तुळात होत आहेत. मनोहर जोशींनी प्रथम सुतार व शिवणकर यांच्या विरुद्धच्या चौकशीची मागणी मान्य केली. ४०० पैकी ७० टक्के तक्रारीत तथ्य असल्याचे जाहीरपणे मान्य केले परंतु यापुढे चौकशी नाही, असे स्पष्टपणे ते सांगतात देखील.

अण्णांनी आजपर्यंत केलेल्या आंदोलनामुळे महाराष्ट्रात एक नैतिक अधिष्ठान असलेला माणूस सत्तेवर अंकुश ठेवू शकतो हे स्पष्ट झाले. त्यातच शेषन सारख्या प्रशासकीय कामकाजाचा गाढा अभ्यास असलेली व्यक्ती या आंदोलनात प्रत्यक्ष सामील झाली तर भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनातून निश्चित काही हाती लागेल असा विश्वास वाटतो. एका

रात्रीत भ्रष्टाचार दूर होणार नाही, या वास्तवाची जाणीव अण्णांना आहे. अनादिकाळापासून मानवी दुर्गुणातच त्याची बीजे आहेत. पण तरीही भ्रष्टाचारविरोधी सामुदायिक आवाज उठविणे गरजेचे आहे याची अण्णांना जाणीव आहे.

आज सरकारला काही मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराचे सोयरसुतक असो अथवा नसो, सर्वसामान्य जनतेला ते आहे अणि म्हणूनच महाराष्ट्रातून अण्णांच्या आंदोलनाला व्यापक पाठिंबा मिळताना दिसतो. आजच्या काळात 'राजकारण' व 'भ्रष्टाचार' हे समानार्थी शब्द बनले आहेत. नीतिमत्ता वगैरेचा प्रश्नच राहिलेला नाही. शासकीय नोकर म्हणजे जनतेचे सेवक हा विचारच नष्ट झाला आहे. तरीदेखील 'अण्णा हजारे' या नावाने काही आशा पल्लवित केल्या आहेत.

★ ★ ★

## विनोद

### वाघाला पळवून कसे लावले

(दोन थापाडे मित्र बऱ्याच दिवसांनी भेटले)

पहिला : अरे, दोन दिवसांपूर्वी मी शिकार करायला जंगलात गेलो तेव्हा माझ्यासमोर अचानक वाघ आला.

दुसरा : मग त्याने तुला जखमी केले असणार.

पहिला : नाही रे, तो दिसल्यावर मी माझ्या उजव्या खिशात हात घातला त्यात बंदूक नव्हती; मग डाव्या खिशात हात घातला त्यातही बंदूक नव्हती.

दुसरा : पण तू सहिसलामत कसा आलास?

पहिला : अरे, उजव्या खिशात बंदूक नव्हती पण बंदुकीचे लायसन्स होते, ते वाघाला दाखवले बस्स!

गोतारणे सरिता
द्वितीय वर्ष, कला

## आशेचा किरण

निराशेच्या छायेत
प्रतीक्षेच्या यादीत
शोधत असतो प्रत्येक जण
अंधाराच्या काळोखातून आशेचा किरण
जीवन हे असे आपुले
सुख-दु:खाच्या धाग्यांनी विणलेले
दु:खाचे धागे असंख्य असतात.
प्रत्येकाला ते नकोसे वाटतात.
म्हणूनच तर शोधत असतो प्रत्येक जण.
अंधाराच्या काळोखातून आशेचा किरण.
दु:खाच्या समुद्रात भेटते अनमोल रतन
प्रत्येकास कधी तरी आशेचे किरण.
एक दिवस असा आला
सर्व दु:खांना विसरून राहिला.
अंधाराच्या काळोखातून आशेचा किरण दिसला.
मला तो हवाहवासा वाटला.
कारण तो खूप वर्षांनी भेटला.
म्हणूनच तर मला असे वाटते
निराश कधी व्हायचे नसते
आशेची आस धरायची असते.
तेजाची ज्योत मनात पेटवायची असते.
कारण येत असतो कधी तरी प्रत्येक जीवनी
सप्तरंगी किरणांचा पिसारा फुलवून
अंधाराच्या काळोखातून आशेचा किरण.

किरण प्र. गायकवाड
प्रथम वर्ष, कला

# भ्रष्टाचाराचे स्वरूप

रवींद्र बा. भोसले, प्रथम वर्ष, कला

मागे वळून पाहताना भारताच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे वर्णन एकाच शब्दात करता येईल तो म्हणजे 'अस्थिपंजर भ्रष्टाचाराचा देश'. भारतीय समाजातील संस्था व व्यक्ती भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवहारामुळे दिवसेंदिवस पोखरल्या जात आहेत. आपल्या संस्कृतीला, नीतिमूल्यांना पैशांच्या ताकदीमुळे धक्के बसत आहे. श्री. शेषन म्हणतात, "सार्वजनिक जीवनात आता एकही असे क्षेत्र शिल्लक नाही की, जिथे पैशाच्या ताकदीचा प्रभाव अजूनही पडलेला नाही. पैशाच्या प्रभावाने प्रत्येक क्षेत्र पोखरून काढले आहे." भ्रष्टाचार आता एक जागतिक समस्या झाली आहे. विशेषतः राजकीय पक्षांनी हा भ्रष्टाचाराचा वृक्ष वाढविला व त्याला खतपाणी घातले ते शासकीय व सनदी नोकरदारांनी, असे म्हटले तर ते चुकीचे ठरेल का?

इतिहासातील काही दाखले देऊन भ्रष्टाचाराची केव्हा अंधारमय पहाट झाली हे सांगता येईल. भारतीय समाजाबाबत कौटिल्याच्या काळात हिशोबातील अनेक प्रकारचे गैरव्यवहार व सार्वजनिक निधीचा अपहार असे प्रकार घडले होते. तसेच १७ व्या व १८ व्या शतकात राजकीय क्षेत्रात भ्रष्टाचार आढळतो. १८ व्या शतकात ब्रिटिश संसदेत देखील अनेक गैरव्यवहार झाले. भारतात स्वातंत्र्योतर काळात घडलेला भ्रष्टाचार हा अधिक काळ काँग्रेसच्या राजवटीत घडलेला आहे. त्यांपैकी काही भ्रष्टाचार प्रकरणांचा हा आढावा. भारतात 'जीप स्कॅडल' पासून भ्रष्टाचारास सुरुवात झाली. भारताचे ब्रिटनमधील उच्चायुक्त व्ही. के. कृष्णमेनन यांनी १४०० जीप्स पुरविण्याचे कंत्राट एका कंपनीला दिले. त्याची पूर्तता न झाल्याने भारत सरकारचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांच्या 'इंदिरा गांधी प्रतिष्ठान' सिमेंट प्रकरण. तसेच सर्वाधिक गाजलेले प्रकरण म्हणजे 'बोफोर्स प्रकरण'. कल्पनाथ राय यांचा 'साखर घोटाळा' यांची चौकशीही गोलमालच ठरली. सन १९९६ हे तर भ्रष्टाचाराचे सुवर्णमहोत्सवी वर्ष निघाले. 'जैन हवाला' रु. ६५ कोटींचा हवाला व्यवहार उघडकीस आला. त्यापाठोपाठ कारसन या तुर्की कंपनीकडून 'युरिया' आयात न करता १३३ रुपये कोटी तत्कालीन पंतप्रधान रावांचे चिरंजीव संजीव राय आणि नॅशनल फर्टिलायझर कंपनी यात गुंतलेली होती. तसेच कॅरिबिअन बेटावरील 'सेंट किट्स प्रकरण' त्यात लखूभाई पाठक यांच्याकडून एक लाख डॉलर घेतल्या प्रकरणी राव चांगलेच अडकले आहेत. माजी मंत्री सुखराम यांच्या घरी कोट्यवधी रुपये सापडले आणि 'टेलिकॉम लायसेन्स' दिल्याबद्दल, गैरव्यवहार केल्याबद्दल तुरुंगाची हवा खावी लागली. 'दूरचित्रवाणी संच खरेदीत' कोट्यवधी रुपयांची लाच खाल्याबद्दल अण्णा द्रमुकच्या नेत्या जयललिता सध्या तुरुंगात आहेत. रु. ५० कोटींवर मालमत्ता त्यांच्या बंगल्यात सापडली. जनता पक्षही यात कमी नाही. बिहार येथील 'पशुखाद्य व्यवहारात' सुमारे १०० कोटींचा गैरव्यवहार बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनी केला. माजी केंद्रीय मंत्री बुटासिंग, कृष्णकुमार, देवीलाल यांची नातू प्रदीपकुमार यांच्या घरी धाडी घालून अनेक कागदपत्रे सीबीआयने जप्त केली आहेत. म्हणतात ना 'उद्धवा! अजब तुझे सरकार' त्याप्रमाणे गत झाली आहे.

आपल्याप्रमाणेच परदेशातही भ्रष्टाचाराची असंख्य प्रकरणे घडलेली आहेत. त्यातसुद्धा राजकारण्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. बांगलादेशाचे माजी राष्ट्रपती इर्शाद यांच्यावर खुल्या कोर्टात भ्रष्टाचाराचा खटला शाबीत होऊन तुरुंगवास झाला. पाकिस्तानात भुत्तो यांनाही शिक्षा

झाली. मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष आलव्हारो ओबेग्रॉन व इर्लीयास कॉलेस यांवर भ्रष्टाचाराचे खटले भरून त्यांना शिक्षा झाली. जपानच्या माजी पंतप्रधानास 'लॉक्लीड प्रकरण' मध्ये चार वर्षांची शिक्षा झाली. परदेशातील भ्रष्टाचारी व्यक्तींस योग्य ती सजा मिळते पण भारतात त्यावर चौकशी आयोग नेमून जनतेचे लक्ष विचलित करतात. त्यामुळे भारतात भ्रष्टाचाराला भरपूर वाव दिसतो.

आतापर्यंत भारतातील एकाही अधिवेशनात भ्रष्टाचारासंबंधी निषेधाचा ठरावा चर्चेला आला नाही. शासन व समाजाला या भ्रष्ट रोगाची लागण झाली आहे. त्याचा परिणाम मंत्र्यापासून संत्र्यांपर्यंत व शासकीय कर्मचारी सर्वच भ्रष्टाचारात सहभागी झालेले दिसतात. हा झाला राजकीय भ्रष्टाचार. सर्वसामान्य जीवनात भ्रष्टाचाराचे काय स्थान आहे ते पाहू या. लाच देणे–घेणे एक आर्थिक व्यवहार झाला आहे. कारण आजूबाजूचे वातावरण, नोकरीची भीती, भविष्याची चिंता आणि महत्त्वाचे म्हणजे प्रवाहाविरुद्ध जाण्याची इच्छा, धैर्य नसणे व आपले काम लवकर व्हावे म्हणून इच्छुक व्यक्ती लाच देते. सरकारी नियमात असलेले महाभारत त्यामुळे अनधिकृत पद्धतीने कामे करण्यासाठी लाच संबंधितांना दिली जाते. परवाने, शालेय दाखले, आर. टी. ओ. यात भ्रष्टाचार वाढत आहे. त्यामुळे काळा पैसा व काळाबाजार करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. पेट्रोल, धान्य व इतर अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार वाढला आहे. जातीयता व जमातवादामुळे भ्रष्टाचार व वशिलेबाजीला उत्तेजन मिळते. मतदानाच्या वेळेस कोट्यवधी रुपये राजकीय पक्ष, पक्षीय कार्यासाठी, अधिवेशन, सभा व मतदारांना खरेदी करण्यासाठी वापरले जातात. सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रालाही कीड लागली आहे. बालवाडी व शाळा प्रवेशासाठी लाच व देणग्या, पेपर फुटणे, मेडिकल कॉलेज प्रवेश प्रकरण, नोकरी मिळवून देणे इ. कामे लाच घेऊन केली जातात. ती लाच पैसा अथवा चैनीच्या वस्तूच्या रूपाने स्वीकारली जाते. एखाद्या वस्तूला मागणी असेल तर त्यात भेसळ करून हलक्या प्रतीचे स्वस्त सामान पुरवून नफेबाजी केली जाते. उदा. औषधे व दैनंदिन गरजेच्या वस्तूंबाबत. सामान्य विक्रेताही या परिस्थितीचा फायदा घेताना दिसतो. ही प्रथा अति घातक आहे. शेअर बाजारात दलालांना अधिकृत दर्जा मिळालेला दिसतो. त्याचाच परिणाम गेल्या वर्षी संपूर्ण शेअर बाजार मंदीत गेला. सिनेमा तिकिटांचा, रेशन दुकानातील वस्तूंचा काळाबाजार व साठेबाजी होते. यात नुकसान होते ग्राहकांचे, गरीबांचे. 'आपलेच दात आपलेच ओठ' अशी सर्वसामान्यांची द्विधा मनःस्थिती झाली आहे. तसेच दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणे हासुद्धा भ्रष्टाचाराचाच प्रकार वाटतो. कारण भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट असा आचार (वागणूक) होय. एखादी क्षुल्लक गोष्ट करायची असेल तर त्यासाठी लाच मागितली जाते.

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी जनसामान्यांची राजकीय, सामाजिक व आर्थिक जागृती करायला हवी. भ्रष्टाचाराला पायबंद घालताना सर्वसाधारण प्रकारचे उपाय, प्रतिबंधक उपाय व दंडात्मक उपाय योजण्यात आले. विशेष पोलीस दक्षता यंत्रणा, केंद्रीय दक्षता आयोग व केंद्रीय अन्वेषण विभाग हे कार्यरत आहेत. तरी प्रत्येक क्षेत्रात अनीती, भ्रष्टाचार दिसून येतोच. शासनाने भ्रष्टाचारविरोधी अनेक उपाय योजले आहेत, तरी प्रत्येक नागरिक आपले हक्क, कर्तव्य सांभाळण्याबाबत दक्षता पाळतील तेव्हा ही समस्या कमी होईल. राजकीय कर्मचाऱ्यांनी व्यवस्थित कारभार करावा. भ्रष्टाचाराच्या चौकशीत वेळा न घालविता उपाययोजना करून शासन करावे. वाढती महागाई व आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण विशिष्ट वर्गात झाल्याने समाजात आर्थिक दरी निर्माण झालेली आहे. त्यासाठी शासकीय, राजकीय अधिकाऱ्यांची मालमत्ता व उत्पन्न यावर देखरेख ठेवावी. भ्रष्टाचार विरोधात प्रसारमाध्यमातून, वर्तमानपत्रातून जनजागरण करायला हवे.

लाच देणे व घेणे हा शिष्टाचार झाला आहे. भ्रष्टाचार व अनैतिक मार्गाने अधिकाराचा वापर करणे ह्या सर्व थरात पोहचलेल्या जळवा आहेत. नेते, मंत्री, शासकीय कर्मचारी व सर्व क्षेत्रातील कर्मचारी या अनिष्ट साखळीत गुंफलेले आहेत. शासकीय कार्यालयात काम लवकर व्हावे म्हणून लाच देणे ही रुढ परंतु सर्वमान्य प्रथा झाली आहे. त्याचे प्रमाण व वाटप हे ठरलेले असते. वरिष्ठ व्यक्ती भ्रष्ट असल्याने सर्व यंत्रणाच खालपर्यंत भ्रष्ट होते. भारतातील

काही सरकारी अधिकारी स्वच्छ चारित्र्याबद्दल प्रसिद्ध आहेत. उदा. टी. एन. शेषन, किरण बेदी, जे. एफ. रिबेरो तसेच अण्णा हजारे यांनी तर भ्रष्टाचार निर्मूलनासाठी जनआंदोलनाची सुरुवात केलेली दिसून येते. काही ग्राहक तसेच संस्थाही भ्रष्टाचारविरोधी कामे करताना आढळतात.

गेल्या काही वर्षांत पैशाच्या प्रभावाने प्रत्येक क्षेत्र पोखरून काढले गेले आहे. राज्यकर्तेच याला जबाबदार आहेत. जनतेची सद्सद्विवेकबुद्धी जागृत असेल तरच सर्व क्षेत्रात स्वच्छ प्रशासन व व्यवहारांना प्राधान्य मिळेल. अन्यथा, भ्रष्टाचाराला आळा घालणे शक्य नाही. आज समाजातील सर्व थरात श्रीमंतीचे प्रदर्शन, उपभोग्य वस्तूंचा हव्यास अशी जीवनविषयक दृष्टी पसरलेली दिसते. कायद्याचा वापर करून हा प्रश्न सुटणार नाही. सामाजिक जीवनात जेव्हा शिस्तीने परिवर्तन घडून नवीन मूल्ये व उद्दिष्टे पेरली जातील, तेव्हाच या प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन होईल असे वाटते. नाहीतर ही अनिवार्य गोष्ट मानून मनाविरुद्ध तडजोड करणे हेच आपल्या हाती राहील. अर्थात, असे असून चालणार नाही. प्रत्येकाने आपापल्या परीने त्या ठिकाणी त्यास थारा मिळणार नाही हे पाहिले पाहिजे. त्यासाठी काही किंमत मोजावी लागेलच; ती मोजली तरच पुन्हा एकदा भारत सुजलाम, सुफलाम होईल, बलशाली होईल असे मानायला हरकत नाही.

★ ★ ★

## विनोद

### 'एल.एल.एम.पी.'

गावाकडील दोन मित्र आपापसात गप्पा मारत असतात. त्यातला एक शहरातून आलेला असतो.

पहिला : काय राव! शहराला जाऊन किती बुकं शिकलास?

दुसरा : अरे! मी एल.एल.एम.पी. झालो.

पहिला : आरं म्हंजी काय रं?

दुसरा : म्हणजे 'लटकून लटकून मॅट्रिक पास'

शुभांगी शिंदे
तृतीय वर्ष, कला

## महत्त्वाची गोष्ट

आपापसातील बरेच गैरसमज व भांडणे ही आपल्या जीभेवर ताबा नसल्यामुळे उद्‌भवतात. ते कमी करण्यासाठी आपण खालील गोष्टी आचरणात आणू शकतो.

- ❒ बोलताना स्वतःचे महत्त्व प्रकट करू नका.
- ❒ बोलताना कडक भाषा वापरू नका.
- ❒ सत्य सांगतानासुद्धा नम्रतापूर्वक सांगा.
- ❒ आपण इतरांपेक्षा शहाणे आहोत असे मानू नका.
- ❒ निंदात्मक भाषा वापरू नका.
- ❒ आपल्या समोरचा बोलणारा कदाचित आपल्या योग्यतेचा नसेलही, तरीही त्याला योग्य वागणूक द्या. कारण त्याला व तुम्हांला एकाच पित्याने (सृष्टीचा कर्ता) जन्म दिला.
- ❒ इतरांचा दोष दाखवून आपण त्यापेक्षा कसे वरचढ आहोत हे दर्शवून घ्यायची सवय घालवा.
- ❒ जास्त बोलून आपली शक्ती वाया घालवू नका. शब्दात कसे पटवाल हे पाहा. हे तर शब्दांपलीकडले.

शुभांगी शिंदे
तृतीय वर्ष (कला)

# स्वातंत्र्य (!) सुवर्णमहोत्सव : एका युवा नागरिकाचे मनोगत

देशमुख निवेदिता दिलीप, द्वितीय वर्ष, कला

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. इंग्रजांच्या जवळजवळ पावणेदोनशे वर्षांच्या पिळवणुकीतून सुटका झाली. अर्थातच सुटका सहजसाध्य नव्हती. लढा देऊन स्वातंत्र्य परत मिळवावे लागले. भारताचा स्वातंत्र्यलढा हा जगातील एका अभूतपूर्व लढ्यात गणला जातो. इंग्रजांसारख्या चिवट प्रतिस्पर्ध्याविरुद्ध 'जनतेसहित' नेत्यांनी जो लढा दिला तो केवळ अवर्णनीय. जनतेसहित या शब्दाचे प्रयोजन असे, की भारतीय समाज दैववादी, संथ होता. त्यास हलवून कार्यक्षम करणे हे तत्कालीन सेनानींचे महत्त्वाचे काम होते. अजूनही भारतीय समाजाच्या प्रवृत्तीत बदल झालेला नाही. पण कुशल नेत्यांची मात्र वानवा आहे.

चालू वर्ष हे भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त निरनिराळे कार्यक्रम झाले आहेत, चालू आहेत व राहिलेले यथासांग पारही पडतील व सुवर्णमहोत्सवात 'भरीव' कामगिरी केल्याच्या आनंदात संयोजक स्वतःला धन्य मानतील. हे वर्ष संपून सालाबादप्रमाणे नवीन वर्ष लागेल. पण आज इथे याक्षणी थोडेसे थांबून काही विचार करण्याची, सिंहावलोकन करण्याची गरज आहे. स्वातंत्र्याने किती दिले? काय दिले? व त्याचा विनियोग कसा झाला? हे बघणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर अजूनही आम्हाला खरंच स्वातंत्र्य आहे का? असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आजूबाजूला आहे. त्याचाही गंभीरपणे विचार करावा.

स्वातंत्र्य तर १९४७ सालीच मिळाले पण ते ज्या मूल्यांवर मिळाले ती मूल्ये, ती तत्त्वे आज पार धुळीला मिळाली आहेत, नव्हे हास्यविषय झाली आहेत. असे का? आपण बदललो? का परिस्थिती अशी बदलली? की विचारांचा पायाच डळमळीत व्हावा. स्वातंत्र्यापासूनचा जमा-खर्च मांडला तर जमेत प्रचंड घट पण खर्चात मात्र लक्षणीय वाढ झाली आहे. वैचारिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक सर्वच क्षेत्रांत प्रचंड 'बदल' झाले आहेत. यापैकी वैचारिक व आर्थिक क्षेत्र हे गतिशीलच हवे. पण उरलेल्या दोन क्षेत्रांत मात्र रसातळाकडे जाणारे बदल झाले आहेत.

राजकीयक्षेत्राला स्वातंत्र्यानंतर काही वर्षांतच ग्रहण लागले. स्वच्छ चारित्र्याचे, गुणसंपन्न नेते आज औषधालाही सापडत नाहीत व या गोष्टीचे लोकांनाही काही वाटत नाही. लोकशाहीत लोक सजग हवेत पण आज लोकच उदासीन आहेत व भारतीय लोकांची राजकारणाबाबत धारणा ही 'चोर लोक राजकारणात जातात' अशी काहीशी असल्याने चांगली माणसे राजकारणात जात नाहीत व राजकारण हे अधिकच बिघडते व या सर्व गुंतागुंतीत कशाला पडा असे म्हणून लोक पुन्हा अलिप्त होतात. थोडक्यात आपला राजकीय प्रवास हा उदासीनतेकडून.....उदासीनतेकडे.....असा आहे.

सामाजिक क्षेत्र, वैचारिक क्षेत्र हे दोन घटक निकोप समाज उभारणीत अत्यंत महत्त्वाचे कार्य करतात. ही क्षेत्रे कार्यक्षम असतील तर समाज एकसंध, बलाढ्य, चाणाक्ष असा असतो. पण इथेही आम्ही कमीच पडत आहोत. स्वातंत्र्यपूर्वकालीन पिढी स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांत जन्मलेले लोक व आधुनिक पिढी यांच्याकडे बघितले तर धक्का बसावा अशी विसंगती दिसते. पहिली पिढी ही शिस्त, देशप्रेम यावरच वाढली. दुसरी धाकावर वाढली तर तिसरी पिढी खुल्या व्यक्तिस्वातंत्र्यवादावर वाढलेली आहे व तीच चिंतेची बाब आहे. सुवर्णमहोत्सवी वर्षात आज अनेकजण कुणा स्वातंत्र्य? कुठे स्वातंत्र्य असे

म्हणतात. ज्या कणखर भारताचे स्वप्न स्वातंत्र्यसेनानींनी पाहिले. त्या भारतात पाश्चिमात्यांचे अनुकरण करण्याची लाट आली आहे. एक प्रकारे जणू मानसिक गुलामगिरीतच आम्ही आहोत. ही गुलामगिरी प्रत्यक्ष गुलामगिरीपेक्षा वाईट असते कारण मानसिक पारतंत्र्यामुळे सद्सद्विवेकबुद्धीच लोप पावते. आज जे लोक मानसिकरीत्या पाश्चात्यांचे गुलाम आहेत. असे लोक भारतात असणे म्हणजे स्वातंत्र्यसेनानींचा एकप्रकारे पराजयच होत आहे. विचारात गतिशीलता जरूर असावी पण ती विघातक गतिशीलता नसावी. बरेचसे लोक विकृत विचारसरणीचे असल्याचे एक उदाहरण म्हणजे काही जुनी नाटके वा चित्रपट यातील विविक्षित प्रसंग पाहताना पूर्वी लोक पेटून उठायचे पण आज बरेचसे लोक तो प्रसंग (enjoy) करून टाळ्या वाजवतात. हे विकृत समाजाचेच द्योतक नाही का?

आज बरेचसे लोक १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या दिवशी रविवार आला की 'हक्काची सुट्टी' गेली म्हणून हळहळतात. (अर्थात कामाचे दिवस सुट्टीपेक्षाही आरामशीर असतात हा भाग वेगळा!) आज भडक चित्रणाचा 'हिंदुस्थानी' पाहून आम्हाला सद्वर्तन देशप्रेमाचा साक्षात्कार होतो. 'युग' पाहून क्रांतिकारकांचे कार्य कळते. पण तेच आम्ही इतिहासाची मात्र खिल्ली उडवतो. असे का? सर्व गोष्टी अत्यंत साधेपणाने, थंडपणाने घेण्याच्या आमच्या पारंपरिक वृत्तीने? की दुर्लक्ष करणे अंगवळणी पडल्यामुळे? का जुने ते सर्व सोने नसते या उक्तीचा प्रभाव पडला आहे. आम्ही असे कुठवर वाहत जाणार? किती वेळ आमच्या प्रसिद्ध अशा सहनशील प्रवृत्तीने सर्व सहन करणार व पेटून कधी उठणारच नाही का? आणखी पन्नास वर्षांनी जेव्हा स्वातंत्र्याची शताब्दी असेल त्या वेळीही आमच्यापेक्षा भयानक परिस्थितीत केवळ हातावर हात देऊन, दैवाला बोल लावत बसणार का.......नाही.

आजची माझी पिढी, युवा पिढी असे होऊ देणार नाही. आजच्या युवापिढीतही 'भावसरगमला' दाद देणारे व मायकला जॅक्सनच्या तालावर बेभान होऊन थिरकणारे असा विरोधाभास असला तरी सुदैवाने सुजाण व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. युवा पिढीला नावे ठेवली जात असली तरी ती बरीच समजूतदार आहे व तीच या अराजकातून देशाला तारू शकेल असा सार्थ विश्वास वाटतो. 'मी देशविरोधी असे नकळतही कृत्य करणार नाही. मी माझ्यापासूनच चांगल्या वर्तनाची सुरुवात करेन व नंतर इतरांना मार्ग दाखवीन. माझ्या हक्का इतकेच कर्तव्याबाबत दक्ष राहीन' अशी प्रतिज्ञा आज प्रत्येक युवकाने – युवतीने करणे हीच भारतमातेला सुवर्णमहोत्सवप्रसंगी भेट असेल. जयहिंद!

★ ★ ★

## अलंकार भ्रमनिरास

माझ्या अवखळ मित्रास...
मी केलेली निवड
माझी मलाच आवडली
कोणाचेही न ऐकता
तुझी संगत धरली,
मला हवा होता
पुरता मोबदला माझ्या प्रेमाचा,
साथी हवा होता
माझ्या हसण्यात व रडण्यात,
तुझ्या सहवासात,
अश्रूही माझे सुकत होते,
जगातील दुर्गंधीपासून
तू रक्षण माझे करत होता,
या अवखळ वयात
तूच माझा साथी होतास
म्हणूनच तुझ्या माझ्या सहवासावर,
मित्र माझे जळत होते...
अवखळ मित्र – रुमाल

रमेश मारुती राऊत
प्रथम वर्ष, वाणिज्य

# परिणाम विद्युत - चुंबकीय क्षेत्रांचे

उमर फारूक सुतार, अकरावी (क)

अनेक नैसर्गिक घटकांचा परिणाम मानवी जीवनावर होत असतोच. आता या नैसर्गिक घटकांबरोबरच मानवनिर्मित घटक मानवी जीवनावर परिणाम करू लागले आहे. उदा. रासायनिक द्रव्य, धूर, ध्वनी. या घटकात आता विद्युत आणि चुंबकीय क्षेत्रांची भर पडली आहे. पृथ्वी हाच एक मोठा चुंबक आहे व त्यालाही चुंबकीय क्षेत्र आहे. पण ते न बदलणारे आहे. या आधी काही कारणांमुळे विद्युत आणि चुंबकीय क्षेत्रांच्या अनिष्ट परिणामांची दखल घेण्याइतपत परिस्थिती नव्हती. औद्योगिकीकरणामुळे गेल्या दोन शतकांत प्रगत देशात ही परिस्थिती झपाट्याने बदलली आणि तितक्याच वेगात ती भारतातही बदलत आहे.

ऊर्जेच्या सतत वाढणाऱ्या गरजेमुळे विजेच्या तारांमधील विद्युतदाबात वाढ होऊ लागली साहजिकच या उच्च दाबाच्या चुंबकीय आणि विद्युतक्षेत्रांचा परिणाम सजीवांवर होणार काय, हा प्रश्न निर्माण झाला.

"उच्च दाबाच्या विजेच्या तारांमुळे निर्माण होणारे विद्युत आणि चुंबकीय क्षेत्र वेगळ्या प्रकारची असतात. बदलत्या चुंबकीय क्षेत्रामुळे सजीवांवरही परिणाम होतो."

## कित्येक पटींनी तीव्रता जास्त

स्थिर चुंबकीय क्षेत्राचा सजीवांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास अनेक प्रयोगांद्वारे केला गेला आहे. यात प्राण्यांच्या अंड्यांची होणारी वाढ, रक्तपेशी, रक्तातील इतर घटक, प्राण्यांच्या हृदयाचे कार्य, मज्जासंस्था, वनस्पतींच्या वाढीवर होणारा परिणाम यांचा समावेश आहे. या प्रयोगांत वापरल्या गेलेल्या चुंबकीय क्षेत्राची तीव्रता ही नैसर्गिक चुंबक क्षेत्राच्या तीव्रतेपेक्षा कित्येक हजार पटींनी जास्त होती. या उच्च तीव्रतेच्या चुंबकीय क्षेत्रामुळे बेडकाच्या अंड्यांची वाढ योग्य प्रकारे होत नाही. एकपेशीय वनस्पतींच्या वाढीवर आणि आकारावर परिणाम होतो. रक्तपेशींवरही परिणाम दिसून येतो. माकडाच्या हृदयातील विद्युत स्पंदनात बदल घडून येतो. मानवी मेंदूमधील विद्युत स्पंदनातही चुंबकीय क्षेत्रामुळे बदल झालेला दिसून येतो. त्यामुळे निद्रावस्थेत आढळणाऱ्या विद्युत स्पंदनात वाढ झालेली दिसून येते. पण हा परिणाम काही मिनिटेच टिकतो. त्यातही सर्व प्रकारच्या मज्जापेशींवर होणारा परिणाम सारखा नसतो. यावरून असे दिसते, की चुंबकीय क्षेत्राचा दृश्य परिणाम होण्यासाठी उच्च तीव्रतेच्या चुंबकीय क्षेत्राची आवश्यकता असते व हे क्षेत्र ज्या यंत्रामध्ये अधिक क्षमतेचे चुंबक वापरलेले असतात अशा यंत्राच्या जवळ आढळून येते. त्यामुळे अशा ठिकाणी जाण्यास टाळल्यास किंवा योग्य खबरदारी घेतल्यास त्यापासून होणारा धोका टाळता येतो.

काही चुंबकीय प्रयोग एकदाच केले गेले आहे किंवा काही प्रयोग करताना वैज्ञानिक निकष काटेकोरपणे लावले गेलेले नाहीत. त्यामुळे अशा प्रयोगांतून निष्पन्न झालेल्या परिणामांचा विचार न करता त्यावर तोडगा, उपाय काढायला हवा. बदलत्या विद्युत क्षेत्रामुळे पेशींची वाढ होत नाही अशा क्षेत्रामुळे फळमाश्या मरतात, तर उंदीर अशा ठिकाणी राहयला नाखूष असतात. मधमाश्यांच्या मध तयार करण्याच्या प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होतो. माणसाच्या अंगावरील केस ताठ उभे राहतात. छत्री, मोटार किंवा इतर वाहनासमवेत जाताना विजेच्या सौम्य झटक्याची जाणीव होते.

जागतिक आरोग्य संघटनेने अलीकडेच या परिणामांसाठी तज्ज्ञांची एक समिती नियुक्त केली आहे. ही समिती या परिणामांचा तपशीलवार अभ्यास करून अधिकृत अहवाल तयार करील. भारतातदेखील हा प्रश्न आज ना उद्या येणारच आहे.

★ ★ ★

# राष्ट्रीय एकात्मता शिबिर - एक सुवर्णानुभव

छाया गायकवाड, प्रथम वर्ष, कला

राष्ट्रीय एकात्मता शिबिरात मला बरेच चांगले अनुभव मिळाले. या शिबिराचा विषयच 'राष्ट्रीय एकात्मता' होता. या शिबिरामध्ये भारतातील अनेक प्रांतातून अनेक विद्यापीठे आली होती. त्यामुळे या शिबिराला 'छोट्या भारताचे' स्वरूप आले होते. या शिबिरामुळे मला परत तरी 'भारत दर्शन' करायची इच्छा राहिली नाही. भारताचे खरे व वास्तववादी दर्शन मला या 'राष्ट्रीय एकात्मता' शिबिरातच मिळाले.

या शिबिरात प्रत्येकजण आपल्या संस्कृतीचे विविध पैलू दाखविण्याचा, सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याचबरोबर इतर प्रांताच्या धर्माचा, संस्कृतीचाही तितकाच आदर, सन्मान राखला जात होता. ६ तारखेला पंजाबी विद्यापीठाची प्रार्थना होती. त्या दिवशी सर्वांनीच आपल्या डोक्यावर ओढण्या व रुमाल घेतले होते (न सांगता) हे पाहिल्यावर पंजाबी बांधवांना इतका आनंद झाला, की ते आपल्या डोळ्यातील अश्रू आवरू शकले नाहीत.

इतकेच काय आम्ही ज्या वेळेस जेवताना प्रार्थना म्हणायचो त्या वेळी सगळ्यांनी हात जोडलेले असायचे. यापेक्षा वेगळी एकात्मता काय असणार!

शिबिरातील आणखी एक गोष्ट मला सांगावीशी वाटते, की जी माझ्या मनावर कायमची कोरली गेली आहे. आम्ही शेवटच्या दिवशी हळदी–कुंकवाचा व तीळगुळाचा कार्यक्रम केला होता. त्या वेळी मी सगळ्या मुलामुलींना हळद-कुंकू लावत होते. मी एका मुलाला तिलक लावायला गेले असता तो म्हणाला, ''मी मुसलमान आहे. आमच्यात कुंकू लावत नाहीत.'' मीही त्याच्याशी वाद घातला नाही. वाद घालायचे काही कारणही नव्हते. दोन-तीन मिनिटांनी तो मुलगा परत माझ्याकडे आला व म्हणाला, ''कॅम्प में ऐसा भी होता है, कॅम्प की आखरी यादमें''. असे म्हणून त्याने माझ्याकडून स्वतःहून तिलक लावून घेतला. ही घटना साधी असेल, परंतु ज्या ठिकाणी जातीय दंगे हिंदू-मुस्लिम धर्मावरून सतत घडतात. हिंदू-मुस्लिम एकमेकांना कट्टर शत्रू मानतात (काही ठराविक लोकांच्या सांगण्यावरून) अशा या माझ्या भारतात असेही मुस्लिम बांधव भेटतात. हे पाहून कोणत्या भारतीय स्त्रीच्या डोळ्यात पाणी येणार नाही. (सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तेव्हा रोजे चालू होते.)

ज्याप्रमाणे कॅम्पमध्ये चांगले अनुभव आले त्याप्रमाणे एक कटू अनुभवही मला आला. तो म्हणजे ज्या वेळी 'मीनाक्षी शेषाद्री' आमच्या कॅम्पला भेट द्यायला आल्या होत्या, त्या वेळी कॅम्पमधील अपंग मुलीने उत्कृष्ट डान्स व जळगावच्या सदानंद गावीत या अंध मुलाने एक गीत सादर केले होते. परंतु मीनाक्षी शेषाद्रीने आपल्या भाषणात यांचा उल्लेखही केला नाही व त्यांना प्रोत्साहनही दिले नाही. ही गोष्ट माझ्या मनाला खटकली.

१० दिवसांमध्ये राष्ट्रीय एकात्मता होणे शक्य नाही, हे मलाही मान्य आहे. परंतु ज्याप्रमाणे गडद काळोखात एखाद्या पणतीच्या मदतीने अंधारातून वाट काढून प्रकाशात जाण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याचप्रमाणे या पणतीरूपी राष्ट्रीय एकात्मता शिबिराने मला जी एकात्मतेची वाट दाखववली आहे, ती मला पुढील आयुष्यासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

★ ★ ★

### चोराच्या उलट्या......

राजू रडत घरी येतो. आई विचारते, ''काय झालं रडायला राजू?'' राजू म्हणतो, ''बंडूने मला मारलं.'' आई म्हणते, ''चल त्या बंडूच्या घरी.'' इतक्यात राजू म्हणतो, ''आई, बंडूचे आई-वडील त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले आहेत.''

तुषार रंधवे
प्रथम वर्ष (कला)

# स्त्री शक्तीची लाट

कल्पना भोकरे, प्रथम वर्ष, कला

भारतातील स्त्री म्हणजे जगातील एक वैशिष्ट्य अशीच गोष्ट आहे. भारतातील स्त्री तिच्या वेशभूषा, केशरचना तसेच तिचे संस्कार, श्रम, वार्तालाभ यावरून जगातील अनेक गोष्टींपेक्षा वेगळीच आहे.

शक्तीने पावती सुखे । शक्ती नसता विटंबना ।।

पूर्वीपासूनच आपल्याला स्त्रीशक्तीची जाणीव आहे. त्यातून घडलेल्या घटनांची ओळख अनेक ग्रंथातून आज आपणास पाहावयास मिळते. संत मुक्ताबाई, संत जनाबाई व संत मीरा या स्त्रियांनी आपल्या भक्तीच्या साहाय्याने दैवाला सुद्धा आपलेसे केले आहे. म्हणून त्याची आज आपण पूजा करतो. स्त्री म्हणजे आपल्या संस्कृतीने मानलेले एक दैवतच आहे. स्त्री महान असली तरीसुद्धा पूर्वी तिच्या गुणांचा, विचारांचा आविष्कार होऊ शकत नसे. कारण १७ व्या शतकाच्या सुमारास स्त्रीला अगदी कनिष्ठ प्रतीची वागणूक दिली जात होती. १८५७ च्या उठावात राणी लक्ष्मीबाई इंग्रजांशी अत्यंत वीरश्रीने लढली. यात स्त्रीची शक्ती किती प्रचंड आहे हे दिसून येते. स्त्री असून ती इंग्रजांशी लढाई लढली आणि अखेरीस वीरगतीला पावली. या स्त्रिया अमर झाल्या. इतिहासात त्याचा अत्यंत मानाने त्याचा गौरव केला जातो.

स्त्रीच्या शक्तीची, गुणांची ओळख महात्मा फुले यांना झाली. त्याच्या विचारमतानुसार समाज घडवण्याचे महत्त्वाचे काम स्त्री करते. ती जर अशिक्षित असेल, तर तिचे अज्ञान व अंधश्रद्धा यामुळे समाज प्रबळ होऊ शकणार नाही. त्यात काही त्रुटी राहू शकतील. हे होऊ नये म्हणून ती शिक्षित, साक्षर होणे आवश्यक आहे. यामुळे म. फुले, स्वामी विवेकानंद व राजाराममोहन राय यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले. त्या वेळी त्यांना या कार्यात जास्त सहभाग मिळाला नसेल. मात्र आजच्या काळात स्त्री शाळा, कॉलेजात जाते. प्रशिक्षित होते. निरनिराळ्या व्यवसायात, उद्योग क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने वावरत आहेत. आज तिला तिच्या हक्कांची, अधिकाराची जाणीव झाली आहे. आपले हक्क मिळविण्यासाठी ती पार्वतीप्रमाणे कालिमातेचे रूप घेण्यास सुद्धा मागेपुढे पाहणार नाही. कारण राक्षसाचा नाश करण्यासाठी देवीला कालीचे रूप घ्यावे लागते.

शक्ती नेटका प्राणी । वैभवे भोगिता दिसे ।
कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी दिसे ।
फळा नाही क्रांती नाही । युक्ती, बुद्धी दुरावली ।
सजिरी शक्ती तो काया । काया मायाची वाढावी ।।

जगातील साऱ्या कर्तबगार महिलांना अभिमान वाटावा अशा एक कर्तबगार स्त्री म्हणजे इंदिरा गांधी होय. त्यांनी भारताचे पंतप्रधानपद जवळजवळ १० वर्षे सांभाळले. ही साधारण गोष्ट नाही. मात्र ही गोष्ट त्यांनी शक्य करून दाखविली होती. भारताचा राज्यकारभार चालविलेल्या कालखंडात अनेक गौरवपूर्ण कामे त्यांनी केली आहेत. अनेक अडचणींवर मात करून त्यांनी कारभार केला आहे. त्यांच्या स्मरणार्थ अनेक खासगी ठिकाणाला नावे दिली आहे. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची समाधी बांधली गेली आहे. त्यांची समाधी म्हणजे एक प्रचंड शिला होय. अगदी प्रचंड शक्तीचे ते प्रतीक आहे. म्हणून शक्तिशाली स्त्रीसाठी ते राष्ट्राने योजले आहे. त्यांच्या चरित्राप्रमाणे त्यांचे कार्यसुद्धा महान आहे. भविष्यकाळात अशी स्त्री घडेल मात्र तिच्यात इंदिरा गांधींसारखे व्यक्तिमत्त्व असेल याविषयी शंका मनात येऊन जाते.

बलाकमाला उडता भासे । कल्पसुमांची माळचि ते
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें ।।

आजच्या स्त्रीने अनेक क्षेत्रात पदव्या मिळवल्या आहेत. आजच्या स्त्रिया डॉक्टर, इंजिनिअर, वकील

आहेत. तसेच अनेक ठिकाणी त्या नोकऱ्या करीत आहे. कंपनी, उद्योग, व्यवसाय करीत, काढत आहेत. शिवाय ती आपल्या घरातील संस्कृती, परंपरा, कामे याकडे तितक्याच तीव्रतेने लक्ष देत असते. आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करीत असते. यावरून तिच्या शक्तीची कल्पना येते. प्रथम खेळ हे पुरुषांसाठी असेच होते. मात्र आजच्या स्त्रिया कराटे, स्पोर्टस्, स्पर्धा यात भाग घेत असतात. पी.टी. उषा ही सुद्धा भारतातील खेळाडू आहे. खेळ खेळणे म्हणजे आपले शरीर मजबूत, कठीण करणे होय. प्रचंड शक्तिशाली होणे आवश्यक असते.

शक्ती तो सर्व ही सुखे । शक्ती आनंद भोगावी
सार संसार शक्तीने । शक्तीने शक्ती भोगिजे ।
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने येल होतसे ।
शक्ती तो सर्व हि भोगी । शक्ती विना दरिद्रता ।।

स्त्रीच्या प्रत्येक कामाला आज एक विशेष अर्थ आहे. शक्तीने सुखे मिळू शकतात. संसार सुखाचा होण्यासाठी शक्ती आवश्यक असते. ज्याकडे शक्ती नाही तो काम करत नाही आणि त्याकडे दारिद्र्य आलेच कारण काम होत नाही.

ज्यांच्या अंगी शक्ती, युक्ती आहे ती व्यक्ती श्रीमंत होईल. शक्तीविना काही नाही असे म्हटले जाते. स्त्रियां अनेक जबाबदाऱ्या उचलत असतात आणि त्या पार पाडतात. आज स्त्री घराबाहेर नोकरीच्या शोधात अनेक ठिकाणी जात आहे. पूर्वीच्या काळी परदेशात जाणे म्हणजे पाप केले असे होते. मात्र आज परदेशात जाणे ही एक हौसेची, अभिमानाची तसेच प्रतिष्ठेची गोष्ट आहे. अनेक स्त्रियांसुद्धा एकट्या नोकरीसाठी, शिक्षणासाठी जात असतात. पूर्वीच्या स्त्रीमध्ये आणि आजच्या स्त्रीतील फरक येथे व्यक्त होत आहे. स्त्रीच्या विचारामुळे तिच्या राहणीमानात फरक पडला आहे. तिच्या शक्तीतच भर पडली. अशा अनेक स्त्रिया जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्यांच्या शक्तीची लाटच निर्माण झाली असती. प्रगती होण्यास मदत झाली आहे. आज अनेक स्त्रिया राजकारणासुद्धा येत आहेत.

आधुनिक काळातील एक कर्तबगार स्त्री म्हणून 'सौदामिनी देशमुख' ह्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांची कहाणी थोडक्यात सांगू इच्छित आहे. कारण या स्त्रीला आपल्या आत्मबळाच्या शक्तीवर आशिया खंडातील पहिली कॅप्टन म्हणून ओळखले जाते. जगातील कर्तबगार स्त्रियांनी त्याच्यांविषयी गौरवप्रधान वाक्ये उच्चारली. याच्या आयुष्यातील मुख्य घटना ३० मे १९९४ रोजी घडली. अनेक अडचणींवर मात करून स्वतःच्या कर्तृत्त्वाने सौदामिनी एअर बस - ३२० ची आशिया खंडातील पहिली महिला कॅप्टन बनली. पुण्याच्या देशमुखांच्या घरात जन्माला आलेल्या या सौदामिनीने आपले नाव सार्थ केले. जणू तिच्या आकांक्षापुढे हे उंच आकाशही ठेंगणे वाटू लागले.

आपण मोठेपणी वैमानिक व्हायचे हे स्वप्न सौदामिनीने बालपणापासून उराशी बाळगले होते. त्या वेळी तिच्या या महत्त्वाकांक्षेची दखल कोणीच घेतली नव्हती. पण या बाबतीत मात्र तिच्या वडिलांचे तिला प्रोत्साहन होते.

मुंबईच्या जयहिंद महाविद्यालयातून त्या पदवीधर झाल्या. दोन वर्षे कायद्याचा अभ्यास केला. वैमानिकाचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी परवाना मिळवला. बँकेत नोकरी केली. मात्र नोकरीत संतुष्टता नव्हती. मग त्यांनी 'इंडियन विमेन्स पायलट असोसिएशन'चे सभासदत्व मिळवले. त्याच काळात अमेरिकेतील नाईंटी नाईन असोसिएशनच्या महिला सदस्या मुंबईत आल्या होत्या. त्यांच्यासह त्या अमेरिकेत गेल्या. आठ महिन्यांच्या कालावधीत त्यांनी एकूण ३०० तासांचा हवाई उड्डाणाचा अनुभव मिळवला व यासंबंधीतले निरनिराळे पाच परवाने मिळवून त्या भारतात परतल्या. मग आपल्या कौशल्याच्या व कर्तृत्वाच्या बळावर त्या एफ-२७ या विमानाच्या कॅप्टन झाल्या. अनेक परीक्षा दिल्या. वैमानिकांची मक्तेदारी केवळ पुरुष वर्गाची नाही हे सौदामिनींनी साऱ्या जगाला दाखवून दिले.

त्यांचे आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न पूर्ण केले. स्त्री कोणत्याही गोष्टीत कमी नाही हे स्पष्टपणे सांगितले. मात्र स्त्री आपल्या शक्तीचा वापर करीत नाही. काही स्त्रिया ह्या गोष्टी करतात व जगाच्या बरोबरी जात आहेत. कोणत्याही गोष्टीचा विचार करून काम ती करू शकत नाही असे नाही. स्त्रियां जेव्हा एकत्र येतात तेव्हा अनेक गोष्टी सहज करू शकतात. सत्याग्रह, धोरणे,

टाळेबंद अशा गोष्टीत आपल्या अटी सहज मान्य करून घेऊ शकतात. आजची स्त्री ही एक आदर्श व्यक्तिमत्त्व असलेली स्त्री आहे.

हम होंगे कामयाब !
मन में है विश्वास,
पूरा हैं विश्वास,
हम होंगे कामयाब एक दिन !

ह्या समूहगीताप्रमाणेच आजची स्त्री हळूहळू पुढे जात आहे. आणि स्त्री आपल्या शक्तीचा पूर्णपणे वापर करून कामयाब होण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि हे प्रयत्न जरूर कामयाब होतील. कारण प्रयत्न करणारी स्त्री आहे.

★ ★ ★

## विनोद

### गाढव सापडत नाही.....

एक धोबी एका गायन मास्तराकडे आला आणि विचारू लागला,

''मास्तरजी, आपल्या भागात तुमच्यापेक्षा चांगला गाणारा कोणी नवा गायक आला आहे काय?''

''का? तुला गाणे शिकायचे असेल तर माझ्याकडे ये.'' मास्तरजी म्हणाले.

''नाही! मला गाणे वगैरे काही शिकायचे नाही पण माझे गाढव सापडत नाही. पूर्वी ते तुमच्या क्लासपुढे उभे असायचे. आज तुमच्यापेक्षा चांगले गाणारा आला असणार म्हणून ते त्याच्याकडे गेले असणार!'' धोबी उत्तरला.

गोतारणे सरिता
तृतीय वर्ष, कला

### झोपमोड

न्यायाधीश : (आरोपीस) तू आपल्या पत्नीला गळा दाबून का मारलेस?

आरोपी : साहेब, मी एक शांतताप्रिय माणूस आहे आणि पिस्तुल झाडून मला रात्रीची आसपासच्या लोकांची झोपमोड करावयाची नव्हती?

गोतारणे सरिता
तृतीय वर्ष, कला

## अर्थ

जगी मिळविली कीर्ती
धन्य झाली धरती
उभारली महान घटनाकृती
जनलोक करती बाबांची आरती ।।
बाबा म्हणजे काय?
बाबा म्हणजे धर्माचा अर्थ
दलितांचे जीवन होते व्यर्थ
मोठा झाला असता अनर्थ
पण बाबांनी केले जीवन सार्थ ।।
फुले म्हणजे काय?
फुले म्हणजे क्रांती
मनाची जुळविली त्यांनी नाती
दिवसांच्या केल्या राती
समाजात प्रस्थापिली शांती ।।
कबीर म्हणजे काय?
कबीर म्हणजे संत
समाजासाठी झिजले ते अनंत
तरी अजूनही वाटते खंत
की, का नाही तयार झाला मानवी पंथ ।।
बुद्ध म्हणजे काय?
बुद्ध म्हणजे शब्दांचे वर्णन नाही
त्यांनीच तर उघडली ज्ञानाची दारे दाही
शंभरातला एकजण करतो काही
मला सांगा,
आपला समाज का पुढे जात नाही? ।।

पंकज ओव्हाळ
प्रथम वर्ष, कला

# फॅशन आवश्यक आहे का?

कु. गीता बागल, द्वितीय वर्ष, कला

फॅशन हा आजच्या नव्या पिढीचा एक अविभाज्य घटक बनत चालला आहे. अर्थात ही फॅशन कपड्यापुरती अथवा केसापुरती मर्यादित नसून रोजच्या जीवनातील आवश्यक गोष्टींमध्ये दिसून येत आहे. युवकांवर याचा परिणाम सर्वाधिक होतो.

आज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या तरुण पिढीचे 'फॅशन'कडे अधिक लक्ष केंद्रित झालेले आढळते. फॅशन म्हणजे एखाद्या गोष्टीत नावीन्य आणणे किंवा परिवर्तन करणे. सतत बदल घडवून आणणे किंवा परिवर्तन करणे हा मानवाचा स्वभावतःच असणारा गुणधर्म आहे. प्रत्येक नवीन पिढी ही बौद्धिकदृष्ट्या मागील पिढीपेक्षा प्रगत व विकसित असते. याचे प्रतिबिंब आपल्याला महाविद्यालयातील तरुण–तरुणींकडे पाहिल्यावर दिसून येते. काही क्षणापूर्वी नावीन्यपूर्ण वाटणारी कला नंतरच्या कलाकृतीपुढे फिकी वाटते.

स्वतःला सुंदर व आकर्षक दाखवण्यासाठी मनुष्य फॅशनचा स्वीकार करतो. काहीतरी वेगळे म्हणजे ड्रेस, बोलणं, चालणं हे इतरांपेक्षा वेगळे असलं पाहिजे असं प्रत्येक कॉलेजच्या युवक–युवतीला वाटत असतं. इतरांपेक्षा वेगळं असल्याने दुसऱ्या व्यक्तीचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करून घेणं सोपं आहे असं मला वाटतं. फॅशन ही आकर्षणाची एक बाब ठरली आहे.

आजकाल मुलीसुद्धा मुलांचे कपडे घालून वावरतात आणि मुलंसुद्धा हातात कडं, कानात डूल, तसेच केस वाढवून त्याची वेणी घालून फिरताना दिसतात. स्वतःची केशभूषा व वेशभूषा बदलत नंतर सिगारेट, दारू या गोष्टीकडे फॅशन म्हणून वळतात. फॅशन ही मर्यादेपुरतीच असावी. उगाचच रंगीबेरंगी, चित्रविचित्र कपडे घालून बेढब दिसण्यापेक्षा फॅशन न केलेली बरी. आपल्याला शोभून दिसेल अशीच फॅशन करणे योग्य ठरेल.

फॅशनचे मूळ हे आजच्या चित्रपटसृष्टीत आहे. भडक पोशाख पद्धती, अंगप्रदर्शन, अश्लीलता यांची लोकप्रियता यातून अनेक फॅशन प्रचलित झाल्या आहेत. चित्रसृष्टीतील नायक–नायिका यांचे पोषाखपद्धतीचे अनुकरण तरुण पिढीकडून केलं जात आहे.

प्रत्येक युवक-युवतीला हे समजणे आवश्यक आहे, की कुठली फॅशन योग्य व कुठली अयोग्य. दुसऱ्या व्यक्तीला जे कपडे चांगले दिसतील तेच आपल्याला चांगले दिसतील असे नाही. फॅशनमुळे जर आपल्या संस्कृतीला तडा जात असेल तर त्यापासून दूर राहणेच चांगले आहे. मुंबई सारख्या शहरात तर मुलगी कोणती व मुलगा कोणता हे ओळखणे सुद्धा कठीण आहे. मुलीचे केस बारीक होऊ लागले आहेत तर मुलांचे केस खांद्यापर्यंत येऊ लागले आहेत. एखादी नवीन गोष्ट तरुण पिढीकडून लगेच स्वीकारली जात आहे. आज एका पोषाखाची फॅशन आली, की दोन दिवसांनी आणखी दहा नवीन पोशाखांची फॅशन येईल.

भारतीय स्त्रियांचा पारंपरिक पोषाख असलेली 'साडी'. आता परदेशात लोकप्रिय होऊ लागली आहे. पुढे साडीचे महत्त्व समजावून देण्याची वेळ येणार आहे. महाविद्यालयीन तरुण पिढी ज्ञानापेक्षा फॅशनमध्ये अधिक प्रगत होत आहेत असे दिसून येते.

फॅशन ही ठराविक पातळीपर्यंत असावी. तिचा अतिरेक होता कामा नये. फॅशन ही आर्थिक परिस्थितीशी निगडित असते. काही गरीब व मध्यम कुटुंबातील तरुणसुद्धा फॅशनकडे वळलेले दिसतात. घरात आई-वडिलांशी भांडणे करून महागडे बूट, ड्रेस खरेदी करून अधिक पैसा खर्च करतात. अशा दिखावू फॅशनवर पैशाची

उधळपट्टी करण्यापेक्षा तोच पैसा जर समाजकल्याणासाठी किंवा एखाद्या गरजू मुलाला मदत म्हणून उपयोगात आणला, तर त्या पैशाचा खरा विनियोग झाल्यासारखा होईल. तसेच आपल्याला मानसिक समाधानही मिळेल.

फॅशनच्या प्रवाहात भरकटून आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा विसरून न जाता त्याचे जतन करावे. भारतीय संस्कृती ही उत्कृष्ट मानली जाते. पाश्चिमात्य लोक जे कपडे वापरतात ती त्यांची संस्कृती आहे. त्यांनी फॅशनच्या नावाखाली संस्कृती सोडली नाही. परंतु आपण त्यांच्यासारखे कपडे वापरून आपल्या संस्कृतीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. पाश्चिमात्य लोकांबरोबर जाण्यासाठी फॅशनची गरज नाही. त्यासाठी संस्कृती जपून त्याच्याबरोबर चालले पाहिजे. गांधी, टिळक, नेहरू हे सुद्धा इतरांपेक्षा वेगळे होते. पण त्यासाठी त्यांना फॅशनची गरज पडली नाही. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे वेगळेपण सिद्ध होत होते.

खरोखर, आज फॅशन जरी आपल्या दैनंदिन जीवनाचा, प्रामुख्याने युवा पिढीचा आवडीचा, भाग असली तरी फॅशन ही 'गरज' होऊ नये असे मला वाटते.

★ ★ ★

## आरोप

एक तरतरीत तरुण वकिलांकडे येऊन म्हणाला, "माझ्यावर पोलिसांनी खटला भरला आहे. तुम्ही माझे वकिलपत्र घ्या."

वकिलाने सांगितले, "पण माझी फी १०० रु. आहे."

आरोपी म्हणाला, "माझ्याजवळ रोख पैसे नाहीत. पण माझी ही स्कूटर विकून मी तुमची फी देईन." वकिलाने खुष होऊन म्हटले, "ठीक आहे. तुझ्यावर कसला आरोप आहे."

"स्कूटर चोरल्याचा" – तरुण उत्तरला.

गोतारणे सरिता
तृतीय वर्ष, कला

## बहिणीचं प्रेम

शोधून शोधून थकलो मी,
पण प्रेम नाही मिळाले,
मला प्रेम हवं होतं बहिणीचं,
नको होतं एखाद्या मुलीचं,

मुलीचं प्रेम तर कुणालाही मिळतं,
पण बहिणीचं प्रेम कुणाकुणालाच मिळतं
बहिणीच्या प्रेमात असतं एक समाधान,
काय करणार ज्याला बहीण नसते.
त्यालाच ते कळते.

त्याची किंमत होत नसते
ती एक भेट असते.
ती मला हवी होती,
शोधून शोधून थकलो मी.
आता सहन मला होत नाही.
कारण वेळच तशी आली आहे.

राखी पौर्णिमेची पहाट.
काही माहितीय किती वर्षांनी
उजडेल.
हाताकडे पाहून
कीव मला हातांची आली.

सचिन विठ्ठल सोनवणे
द्वितीय वर्ष, वाणिज्य

# मला आवडलेले चरित्र पुस्तक

कु. मनीषा थेटे, द्वितीय वर्ष, कला

परमेश डंगवाल यांनी लिहिलेले आणि आशा कर्दळे यांनी मराठीत अनुवाद केलेले 'आय डेअर' हे किरण बेदींचे चरित्रात्मक पुस्तक वाचताना माझी जी सहज प्रतिक्रिया झाली ती मी आपल्या समोर देत आहे. काही व्यक्तीविषयी बोलायचे ठरले तर शब्दही अपुरे पडतात. आज समाजात भ्रष्टाचाराचा अंधार असताना तो दूर करण्यासाठी काही माणसं उपजत प्रेरणेनं धडपडतात, त्यातील काही व्यक्ती तर नक्षत्रांसारखी चमकून जातात. त्यातल्याच 'किरण बेदी'.

कोणत्याही असाध्य कार्यात बेदी भाग घेतात व असाध्य असणारे कार्य बेदी साध्य करून दाखवितात. कारण त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीची ती गरज होती. जेथे–जेथे झुंजण्याची वेळ आली, तेथे–तेथे त्या निष्ठेने झुंजत असलेल्या आपण पाहिले आहे. हे एका स्त्रीचे प्रवाहा- विरूद्धचे पोहणे आहे. एक कौतुकमिश्रीत कुतूहल आहे. आणि या कुतूहलामुळेच परमेश डंगवाल यांनी आपल्या समोर किरण बेदींना पुस्तकाच्या माध्यमातून ठेवलेले आहे.

दिल्लीच्या कारागृह महानिरीक्षक 'किरण बेदी.' या पुढील अनेक वर्षे, त्यांच्या योगदानाबद्दल देशाच्या आठवणीत राहतील. एक महिला पोलीस अधिकारी म्हणून संपूर्ण जगात पहिल्यांदा किरण बेदी यांना 'रॅमन मॅगेसेस' पुरस्कार १९९४ साली देण्यात आला. आत्मप्रतिष्ठेसाठी त्या नेहमी प्रकाश झोतात राहतात असा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील आणि राजकीय क्षेत्रातील देशी ते परदेशी गुन्हेगार असलेला, मद्य, सिगारेट, ड्रग्ज, टी.व्ही. या सर्व सुविधा पुरविणारा, अनेक कैद्यांचे हक्कांचे 'संस्थान' झालेला, नाना भोग असलेला परिणामी प्रचंड असूनही जागेची तंगी भोगणाऱ्या तिहार तुरुंगाचा किरण बेदींनी 'तिहार आश्रम' केला आणि तेथूनच त्यांची अपमानकारक बदली झाली. परंतु त्या खचून गेल्या नाहीत.

दिल्लीत असताना त्यांना उपहासाने 'क्रेन' बेदी ही पदवी मिळाली. परंतु न घाबरता त्या जनतेला उजळ माथ्याने सामोऱ्या गेल्या. शासकीय, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रांतील भ्रष्टाचार दूर करण्याचा बेदींनी प्रयत्न केला. आत्मसन्मानासाठी त्यांना पदोपदी लढा द्यावा लागला. हा लढा देण्यासाठी त्या स्वतःच तत्पर राहिल्या. सर्व अडथळे दूर करून पुढे जात राहिल्या. शिक्षण घेत राहिल्या. किरण बेदी या 'कला' शाखेच्या विद्यार्थिनी असून राज्यशास्त्र हा त्यांचा विशेषस्तरीय विषय होता. बेदींनी 'पोलीस अकादमी'त जाण्यासाठी होणाऱ्या विरोधालाही तोंड दिले.

क्रीडाक्षेत्रातील त्यांनी राष्ट्रीय विजेतेपद, आशियाई टेनिस विजेतेपद मिळवितानाच जगात हरणाऱ्यांसाठी कुणाकडेच वेळ नसतो हे त्या शिकत राहिल्या. त्यांना होणारा विरोध त्या झुगारत राहिल्या आणि शारीरिक क्षमता टिकवत राहिल्या. म्हणूनच 'आय डेअर' मधील त्यांच्या लढतीचे चित्र त्यांच्या आदर्शाचे चित्र ठरते. या पुस्तकात अधून-मधून येणाऱ्या घटना–छायाचित्रांनी सामान्य माणसाच्या मनातील उदात्ततेच्या छटांना अधिक गडद केले आहे. आपल्या समोर असलेल्या आदर्श जीवनाला संगतवार आपल्या समोर मांडण्याचे कार्य या पुस्तकाने केले आहे. केवळ बेदींकडे या पुस्तकाने आपले लक्ष वेधले असे नाही, तर आपल्याला विचार करायला लावले आहे. वाचकांना अंतर्मुखही केले.

किरण बेदींची तिहारमधून बदली झाली आणि वळणाचे पाणी वळणालाच गेले. तिहार पूर्वी सारखाच लयाला गेला. काहींच्या मते तर बेदींशिवाय तिहार म्हणजे 'अनाथाश्रम' झाला. भ्रष्टाचाराच्या अथांग सागरावर सुधारणेच्या लाटा उसळल्या तरी त्या फेसाळत–फेसाळत अखेर फुटतातच आणि उरतो फक्त भ्रष्ट समाजाचा भ्रष्ट आचार.

★ ★ ★

# भारत - 'आजचा आणि एकविसाव्या शतकातला'

अनुजा गोरे, ११ वी (शास्त्र)

भारत हा विविधतेने नटलेला देश ! येथे वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या जातीचे, धर्माचे, पंथाचे लोक वर्षानुवर्ष राहत आहेत. परंतु, 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे....' या आपल्या प्रतिज्ञेनुसार आचरण करण्याचा प्रयत्न आज आपल्या देशात किती जण करीत आहेत?

भारताला स्वातंत्र्य मिळवून ४९ वर्ष लोटली. आज भारत प्रगतीच्या सर्वोच्च शिखराकडे हळूहळू वाटचाल करीत आहे. परंतु ही वाटचाल करण्यासाठी असलेली पायवाट सरळ, सोपी, सुंदर व आरामदायक आहे, का या वाटेतदेखील खाचखळगे, काटे व दगड-धोंडे विखुरलेले आहेत? हो नक्कीच, ही वाट काही सुकर नाही. या वाटेत आहेत मोठमोठे राक्षस ! अहो Big Giant च म्हणा ना!

आज देशात सर्वात जास्त थैमान घातले आहे ते लोकसंख्येच्या भस्मासुराने ! आपल्या देशाची लोकसंख्या ही वाढतच जात आहे आणि शंभर कोटींच्या वर जाऊनच कदाचित ती स्थिरावेल. या वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील शिक्षण, आरोग्य, निवारा, शुद्ध पाणी, राहणीमान हे इतर प्रगतशील देशांच्या तुलनेत अत्यंत खालच्या दर्जाचे आहे. लोकसंख्येमुळे मानवी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताण पडत आहे व काही ठिकाणी कुपोषणही होत आहे.

भारत हा कृषिप्रधान देश ! सुमारे ७० टक्के लोकांचे उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतीपेक्षा स्वातंत्र्योत्तर शेती ही नक्कीच सुधारलेली म्हणावी लागेल. शेतीत हरितक्रांती झाली आहे. रासायनिक खते, कीटकनाशके, सुधारित यंत्रे यांच्या साहाय्याने शेतीचे उत्पादन वाढविले जात आहे. 'ग्रीन हाऊस' सारख्या तंत्राचा वापर केला जात आहे. अधिकाधिक लोक शेतीकडे वळू लागले आहेत. पडीक जमीन ओलिताखाली आणून तेथेही शेती केले जाते. शेतीचे दर हेक्टरी उत्पादन वाढविण्यासाठी शेतकरी आधिक जागृत झाले आहेत. आता गरजेपेक्षा अधिक अन्न आपण पिकवू लागलो आहोत आणि त्याची निर्यातही करीत आहोत. तरीही सध्या अस्तित्वात असलेल्या विभक्त कुटुंब पद्धतीमुळे शेतीचे तुकडीकरण झाले आहे व उत्पादनातही फरक पडत आहे. असे असले तरी, एकंदरीतच कृषी क्षेत्राची प्रगतीपथाकडे वाटचाल चालू आहे.

स्वयंचलित यंत्राची कथा तर न्यारीच ! जिकडे पाहावे तिकडे यंत्रेच यंत्रे झाली आहेत. ऊसतोडणी कामगारांनी संप केला म्हणून काय झाले? ऊसतोडणी करण्यासाठी यंत्रे आहेतच ना आपल्या मदतीला! उद्योग क्षेत्रातील प्रगती उल्लेखनीय अशीच आहे. कातडी उद्योग, पोलाद, वस्त्रोद्योग, दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स यांतील प्रगती विशेष करून जाणवते. अधिकाधिक वस्तू परदेशात निर्यात होऊ लागल्या आहेत. आणि आता ही मुक्त अर्थव्यवस्था ! या अर्थव्यवस्थेमुळे देशातील तंत्रज्ञान आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनू लागले आहे. तंत्रज्ञानाचा मानवाच्या भल्यासाठी वापर होत आहे. संगणकाचा वापर करून व कुशाग्र शास्त्रज्ञांच्या नवनवीन शोधांनी तंत्रज्ञान अधिक विकसित होत आहे. अहो, यंत्राची संख्या वाढली म्हणजे कारखान्यांची संख्या वाढलीच ना! या कारखान्यातून नाना तऱ्हेचे वायू बाहेर पडतात व प्रदूषणाला कारणीभूत ठरतात. यामुळे हवेच्या प्रदूषणात भरपूरच वाढ झाली आहे. हे झाले हवेचे प्रदूषण पण जलप्रदूषणाचे काय? कारखान्यातील दूषित पाणी नद्यात, समुद्रात सोडले जाते आणि तेथील 'बिचाऱ्या'

जलचरांना आपल्या प्राणास मुकावे लागते. म्हणूनच की काय, मुळामुठा सारख्या नद्यांना 'मृत नद्या' म्हणून घोषित करण्यात आले आहे. यांत्रिकीकरणामुळे बेकारांची संख्या वाढत आहे. सुशिक्षित बेकार तर कित्येक जण आहेत.

भारताला मिळालेली एक फार मोठी देणगी म्हणजे लोकशाही ! या लोकशाहीची किती स्वप्नं उराशी बाळगली होती ह्या वीर नेत्यांनी. पण सर्व व्यर्थ! 'लोकांनी, लोकांसाठी व लोकांचेच चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही' असे न म्हणता आता 'नेत्यांनी, नेत्यांसाठी व नेत्यांचेच चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही' असे म्हणावे लागेल. आज या लोकशाहीला खरोखरच, भ्रष्टाचाराची व राजकारणाची कीड लागली आहे. राजकारण आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणाव्या लागतील. देशातील स्वार्थी राज्यकर्त्यांनी या देशाला खरोखरच दुदैवाच्या खाईत लोटले आहे.

आता अण्णा हजारे यांचचे उदाहरण घ्या ना! आजही आपल्या देशात भ्रष्टाचाराला वाचा फोडणारे समाजसेवक आहेत. परंतु या समाजसेवकांनाही दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. या स्वार्थी राज्यकर्त्यांनी मनमानेल तसा राज्यकारभार करण्यास सुरुवात केली आहे. 'पोटासाठी' राजकारणात उतरणारेही काही जण आहेत. 'नोकरी-धंदा' काही नसेल तर राजकारणात उतरा आणि आपला स्वार्थ साधून घ्या. या भ्रष्टाचारांच्या आरोपांतून कोणाची सुटका झाली का? अहो मग देशाच्या कर्त्याची - माजी पंतप्रधानांची देखील या आरोपातून सुटका कशी होईल?

'धर्म आणि राजकारण' यांच्या समन्वयामुळे काय काय घडेल नसेल या देशात? मुंबईतील बॉम्बस्फोट, बाबरी मशिदीचा वाद आणि इतर दररोज चालणाऱ्या तुरळक दंगली कशाचे द्योतक आहेत? राजकारण धर्मात लुडबुड करीत आहे. जातीयवादाला खतपाणी घातले जात आहे. हिंदू-मुस्लिम, शीख-ईसाई हा भेदभाव वर्षानुवर्ष चालूच आहे. गुन्हेगारी वृत्ती फोफावत आहेत. टोळीयुद्ध तर दररोजची आहेत! शिक्षणव्यवस्थाही फारशी उपयुक्त नाही असे मला वाटते. मुले 'पुस्तकी किडा' व्हावीत या हेतूचा जणू काही शासनाचा अभ्यासक्रम आहे. पाठांतरावर जास्त भर दिला जातो. परीक्षा पद्धतीही चुकीची आहे असे मला वाटते. तरीही, शासनाने शिक्षणाचे महत्त्व जाणून अभ्यासक्रमात आता बदल केले आहेत. मुलांचे खेळाकडे दुर्लक्ष होऊन ती हळूहळू क्रीडांगणाला मुकली आहेत. शासनाने पी.टी., एन.सी.सी शिक्षण सक्तीचे केले आहे. एकूणच, खेळाच्या बाबतीत भारत फारशी सरस कामगिरी करू शकत नाही. म्हणूनच ऑलंपिक सारख्या स्पर्धांमध्ये वैयक्तिक पदक मिळविण्यासाठी ५८ वर्षे वाट पाहावी लागते, हे दुर्भाग्यच नाही का?

ही झाली सद्य परिस्थिती. परंतु एकविसाव्या शतकातील भारत कसा असेल? माझ्या मनात तरी एक स्वच्छ, सुंदर व संपन्न अशा एकविसाव्या शतकातील भारताचे चित्र आहे. परंतु ते प्रत्यक्षात साकार होईल? माझ्या मते एकविसाव्या शतकातील भारत हा नक्कीच जगातील एक प्रबळ महासत्ता बनलेला असेल. निरक्षर लोकांची संख्या कमी होऊन साक्षर लोकांचे प्रमाणे वाढेल. लोक अंधश्रद्धा, रूढी, परंपरा व संकुचित वृत्ती झुगारून देतील. लोक प्रगतशील झाल्याने व आधुनिक विचारसरणीने विचार करू लागल्याने 'फक्त एक किंवा दोन बस्स !' या पद्धतीने वागतील आणि आपोआपचे लोकसंख्येचे प्रमाण कमी होऊन काही कोटींच्या घरात जाऊन ते स्थिरावेल. त्यामुळे सर्व नागरिकच सुशिक्षित, विद्याविभूषित व स्वतःच्या पायावर उभे असतील.

कृषी क्षेत्रातील प्रगती वाढविण्यासाठी रासायनिक शेतीचा मार्ग पुढे येईल. रासायनिक खतांचा फार मोठा वापर करून उत्पादन वाढविले जाईल. परंतु त्यामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होईल. म्हणून जैविक पद्धतीने शेती करण्यात येईल व त्यासाठी गांडूळखतासारखे तंत्र वापरले जाईल. फळांच्या व इतर नवनवीन जातींचा शोध लागेल. एकूणच, भविष्यातील भारत कृषी क्षेत्रात अग्रेसरच असेल.

स्वयंचलित यंत्राची व कारखान्यांची मोठ्या प्रमाणात वाढ होईल. भविष्यात भारत पूर्णपणे यांत्रिक युगातच वावरत असेल. यांत्रिकीकरणामुळे तंत्रज्ञानाच्या बदलाने

बेरोजगारीचे प्रमाण वाढेल. खेड्यातील गरीब लोक शेती सोडून शहराकडे वळतील. त्यामुळे शहरातील आरोग्य धोक्यात येईल. शहरात कचरा व घाणीचे साम्राज्य पसरेल. सांडपाणी, मलमूत्र यांच्या योग्य व्यवस्थापनाचा प्रश्न पडेल. प्रदूषणाचे प्रमाण वाढेल व पाण्याची टंचाई निर्माण होईल. त्यामुळे शहरीकरण भविष्यात महागच पडेल.

पेजर, इंटरनेट, मोबाईल फोन, संगणक, टी.व्ही. फक्त श्रीमंतांपुरते मर्यादित न राहता त्याचे सार्वत्रिकीकरण होईल. या सुविधांमुळे लोकांना विविध माहितींची सर्व दारे खुली होतील व जग सर्वांच्या जवळ येईल. गरीब आणि श्रीमंतांमधील खोल खाई कमी होऊन ते एकाच माळेच्या मण्यांप्रमाणे गणले जातील. आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार पाहून हे लोक थोडेच गप्प बसतील? आता काही ते मूक राहिले नाहीत. मूठभर श्रीमंतांच्या हातीच पैसा न जाता त्याचे समान वाटप होईल. देशातील राहणीमान बदलेल व साडी आणि ब्लाऊज यांच्या ऐवजी सर्रास 'जीन पँट' आणि 'टी शर्ट' यांचा वापर केला जाईल आणि यात विशेष असे काही वाटणारच नाही. भारतीय शास्त्रीय संगीताप्रमाणेच रॉक, पॉप संगीताचे लोक चाहते बनतील आणि त्यामुळे मायकेल जॅक्सनच्या कार्यक्रमाला थोडा विरोधदेखील होणार नाही. लोकांचा दृष्टिकोण बदलेल आणि 'मिस वर्ल्ड' सारख्या स्पर्धाही सुरळीत पार पडतील. स्वदेशीचा पुरस्कार केला जाईल व खादीचे प्रस्थ वाढेल. पाश्चात्य संस्कृतीमुळे आपल्या संस्कृतीत फरक पडणार नाही. व ती आहे त्याच ठायी अधिक दृढ होईल!

एकविसाव्या शतकात राजकारणाला विशेष महत्त्व राहणार नाही. आपल्या 'उपजीविकेचा' व्यवसाय करून हौसेखातर माणसे राजकारणात उतरतील. अर्थातच, भ्रष्टाचार ओहोटीच्या मार्गाला लागेल. सध्या असलेले 'हिंदुस्थानी' सारखे चित्रपट याचेच द्योतक नाहीत का? राजकीय नेत्यांचे अनन्यसाधारण महत्त्व संपलेले असेल व लोकांकडून ते दुर्लक्षितच होतील. विशेष म्हणजे, नवनवीन औषधांचा शोध लागेल व एड्स, कॅन्सरसारखे असाध्य रोगदेखील आटोक्यात येतील. एकविसाव्या शतकात तरी भारतीय आयुर्वेदाला चांगले दिवस येतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. मृत्युदर कमी झालाच आहे. परंतु जन्मदरात देखील घट होईल. शास्त्रज्ञांना संशोधनासाठी सर्व सुविधा पुरविल्या जातील. त्यांना दुसऱ्या देशात जाऊन संशोधन करण्याची गरज पडणार नाही. नवनवीन तंत्रज्ञान विकसित होऊन आपली संरक्षण व्यवस्था अधिक भक्कम होईल. जयंत नारळीकर, एन. सी. राणा यांसारखे शास्त्रज्ञ निर्माण होतील. आपणास दुसऱ्या देशांवर अवलंबून राहण्याची गरज पडणार नाही व कोणाच्या दडपणाला आपण बळी पडणार नाही.

प्रत्येक कुटुंबात स्त्रियांना पुरुषांइतका बरोबरीचा दर्जा मिळेल. मुले स्वावलंबी व स्वतंत्र बनतील. ती आई-वडिलांवर अवलंबून राहणार नाहीत. असे झाले तरी, मुलांच्या मनातील आई-वडिलांविषयीचे प्रेम कमी होणार नाही. अस्तित्वात असलेल्या शैक्षणिक पद्धतीत काही त्रुटी असल्याने शिक्षणाचे खाजगीकरण होईल. शिक्षणाबद्दलची जागरूकता वाढेल. खेळाच्या बाबतीतही भारताला चांगले दिवस येतील. आंतरराष्ट्रीय दर्जाचे श्रेष्ठ खेळाडू तयार होतील.

एकूणच, बौद्धिक भांडवलाच्या आधारावर कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, साहित्य अशा सर्वच क्षेत्रांत भारत आघाडीवर असेल. प्रगतीच्या सर्वोच्च अशी ठिकाणी तो विराजमान होईल. व जगातील एक प्रबळ महासत्ता बनेल, यात शंका नाही. परंतु एकविसाव्या शतकातील धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनात भारताला आणि संपूर्ण जगालाच आवश्यकता असेल ती शांतीसंदेश पसरविणाऱ्या शांतीदूतांची!

म्हणूनच काय सांगावे, ज्ञानेश्वर, गुरू नानक, गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, महात्मा गांधी यांसारख्या शांतीदुतांचे भारताच्या पवित्र भूमीवर पुनःश्च आगमन होईल!

★ ★ ★

# माझे घर : माझी कल्पना

कु. वर्षाराणी रा. रावतु, एम.ए. मराठी.

''लग्न बघावं करून आणि घर पाहावं बांधून !'' हे बोल आपण नेहमी ऐकतो. अनेक लग्न होताना पाहतो आणि घर बांधून झाल्यावर होणाऱ्या 'वास्तुशांती' पूजेलाही जातो. पण जसे एकदा लग्न झाल्यावर पुन्हा त्या जोडप्याचे कसे काय चाललेय हे पाहण्यास, त्यांना भेटण्यास आपण जातोच असे नाही. फारच जवळचे नाते असले तरच भेटण्याचा प्रसंग येतो. तसेच आहे वास्तुशांती पूजेचेही. आपल्या सोसायटीमध्ये नवीन घर झाले की, अगत्याचे आमंत्रण सर्व सोसायटीला असते. सर्वच जातात या कार्यक्रमाला. पण नंतर पुन्हा जाण्याचा योग काही येत नाही. मुद्दामहून आपण गेलो तरी ते त्यांना आवडेल असे नाही. जग इतक बदलले की, आप्त-नातेवाईकही विनाकारण आलेले आवडत नाहीत. मग आपण परकेच नाही का ? जग जसं जसं जवळ आले, तस तशी माणसांची मने दूर गेली. स्वार्थी झाली. महत्त्वाचे म्हणजे 'लग्न' आणि 'आपले घर' ही दोन्ही माणसांच्या जीवनातील वळणेच. जी व्यवस्थित पास झाली की, माणूस सर्व काही जिंकतो, धन्य होतो.

जीवनात येणाऱ्या साथीदाराची जशी आपण स्वप्ने पाहतो. एक कल्पना मनी करतो. तसेच आपल्या वास्तूचीही कल्पना सर्वच करीत असतात. स्वप्नातील घर अस्तित्वात येईपर्यंत त्याच बराच बदल घडतो आणि काळही लागतो. माणूस जीवनाच्या बाल्यावस्थेपासून हे स्वप्न पाहतो, जेव्हा तो पन्नाशीचा होतो. तेव्हा त्या स्वप्नांचे मूर्तिरूपात साऱ्यांना दर्शन होते. तोपर्यंत त्याचा मुलगा २०/२२ वर्षांचा झालेला असतो. कधीतर इतका काळ लागतो की, बाबा व आई खास मुलाचे लग्न पुढल्यावर्षी करायचे म्हणून आदल्या वर्षी जीवनाची सारी पुंजी गोळा करून ते स्वप्न अस्तित्वात आणत असतात. ते घर पाहताना आजी-आजोबांचे डोळे भरून येतात. मुलांनाही वडिलांचे काही कमी कौतुक नसते. मित्र-मैत्रिणींना घरातील एक एक खोली दाखवताना त्यांचे भावपूर्ण शब्द आईच्या कानी पडत असतात. असे हे वडिलांच्या कष्टाचे फलरूप घर त्यांनी बांधलेले असले, तरी त्यांना पाठिंबा देणारी त्यांच्या सोबत प्रत्येक सुखदु:खात सामील झालेली, त्यांची अर्धांगिनी तिचे कौतुक असते फक्त तिच्या नवऱ्याला; म्हणून कितीतरी घरांना आईचेच नाव दिलेले असते.

असे हे घर प्रेमाच्या विटांनी, विश्वासाच्या पायावर उभे असते. आई, पतीचे होणारे कौतुक पाहून भारावून गेलेली असते. सारे कष्ट ती विसरते, कारण तिच्या पतीचे बोल ''एक महाल नाही पण हे छोटेसे घर या राणी सरकारांना नजर करीत आहे. सांभाळा ह्या किल्ल्या '' हे क्षण सोन्यासारखे असतात. प्रत्येक स्त्रीच्या जीवनात हा क्षण येतोच. त्याचे मोल कशातही होऊच शकत नाही. तिलाही तिच्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. असे हे घर प्रत्येकजण बांधतो. अशी सुखी घराची, संसाराची कल्पना सारेच स्त्री-पुरुष आपल्या स्वप्नात करीत असतात.

मी तर हे स्वप्न, वाळूचं घर मुंबईच्या समुद्रकिनारी बांधताना पाहण्यास सुरुवात केली. मुंबईचे धावते जीवन, चार भिंतींची बंद घरे, त्यात झुळझुळणाऱ्या वाऱ्यालाही प्रवेश परवानगी मागून घ्यावा लागतो. यापेक्षा माझे स्वप्न फार वेगळे आहे. मला 'घर' म्हणजे बंगला, फ्लॅट नको होता. 'घर' म्हणजे फक्त चार भिंतीच पण साध्यापणाचा पुरस्कार करणाऱ्या ! 'घर' म्हणजे एक मंदिर असावे. ज्यात साऱ्यांना येण्याची परवानगी असावी. वात्सल्याने

भरलेले, शिस्तीने चालणारे असावे. घर नको फक्त दोघांचं. घरात असावेत आजी-आजोबा, काका-काकू आणि साऱ्यांची चार-पाच मुले. ज्या घरात प्रवेश करता वाटावं हेच ते 'गोकुळ'! तशी ही कल्पना जुनी आहे. 'जुनं ते सोनं', 'नवीन असतं नऊ दिवसांचं'!

माझ्या घराचा पाया असावा 'विश्वास'. त्याला चहुबाजूंनी प्रेमाच्या भिंती! त्यात सतत वाढत राहावी प्रेमाची नाती. दाराने करावे हसत पाहुण्यांचे स्वागत. समोरच्या पडवीत कायम असावी वर्दळ. दररोज एक पाहुणा हात धुवून संतुष्ट मनाने परतावा. खिडकीतून डोकवावं अखंड आभाळाने, तीथपर्यंत पाहावं, जिथं दिसावी हिरवीगार शेती! दाराच्या पुढल्यादारी असावे तुळशीवृदांवन, तर मागल्यादारी गोठ्यात असावी खिल्लारी जोडी आणि एक गोमाता ! अंगणातून वर पाहिलं तर लांबवर निळं-निळं आकाश दिसावं. असं सुरेख स्वप्न मी नेहमी पाहत होतो.

पण हे सुख मला माझ्या घरी अस्तित्वातही मिळाले नाही. ती त्रुटी माझ्या मित्र-मैत्रिणींनी त्यांच्या घरी मला एक घरचे स्थान देऊन पूर्ण केली. त्यांनी त्यांच्यासारखे हट्ट करू दिले आणि ते पूर्णही होऊ दिले. त्यांच्या नात्यांमध्ये मला त्यांनी असे गुंफले जसे फुलात असतो सुगंध! त्यांच्या सुखदु:खात मी होते. त्यांच्या या प्रेमापुढे रक्ताची नातीही फिक्की होती. अशा माझ्या मैत्रिणींना मी कधी विसरणार नाही.

खरचं मुलीचं आयुष्य चिमण्यांप्रमाणे असते. नशिबात असेल तोपर्यंत दाणे टिपायचे. आणि वेळ आली की, भुर्रकन उडून जायचे. दैव नेईल तेथे. तसं पाह्यला गेले तर मुलीला स्वतःच घर असं कधी मिळत नाहीच. अगोदर असते आईच्या घरी, मग जाते सासूच्या घरी, आणि ते जेव्हा घर तिचे होते तोपर्यंत तिची सून येते. घर असे कधी तिला मिळतच नाही. दोन्हीकडे तिचे असे काहीच नसते. ती मात्र सर्वांचीच असते.

★ ★ ★

## जीवनमूल्ये

सुख दु:खाचे अतूट बंधन
मानवी जीवनाचे वाढवी स्पंदन
सुखापेक्षा दु:खावर
फुलापेक्षा काट्यांवर
गुणांपेक्षा व्यंगावर
चांगल्यापेक्षा वाईटावर
नेहमीच मानवाने केली टीका.
कावळ्याच्या नजरेने पाहता
सगळेच तुच्छ लाभे
कुणाचा पाणउतारा करण्या
मग वेळ तो कसला लागे.
दु:खापेक्षा सुखाची
काट्यांपेक्षा फुलाची
व्यंगापेक्षा गुणांची
वाईटापेक्षा चांगल्याची
करेल का मानव उपासना?
कौतुकाची, आनंदाची करेल
का तो जोपासना?
कौतुकाने प्रेम वाढते
आत्मविश्वासास बळ मिळते
एकमेकांचे भांडण मिटते
हसून जगण्यास सामर्थ्य लाभते
टीकेखोर ही वृत्ती क्रूर
करून टाकू चूर-चूर
कौतुकाचे मग जोपासू अंकुर
कारण सारेच आपण क्षणभंगूर!

मिहीर शि. परमणे
अकरावी (क)

# प्राण्यांचे संदेशवहन

**शशिकला मारणे**, द्वितीय वर्ष, विज्ञान

सूर्यमालिकेत सर्वात वेगळा ग्रह म्हणजे आपली पृथ्वी! एकट्या पृथ्वीवरच जीवसृष्टी आढळते, बाकी सर्व ग्रहांवर निर्जीव घटक आढळतात. सृष्टी ही पृथ्वीला मिळालेली मोठी देणगीच आहे. सजीव आणि निर्जीव हे घटक पृथ्वीच्या परिवर्तनाला कारणीभूत आहेत. हे दोन्हीही घटक एकमेकांवर अवलंबून आहेत. सृष्टीलाच निसर्ग असे म्हणतात. वनस्पती, प्राणी आणि अनेक निर्जीव घटक हे या निसर्गाचेच घटक मानले जातात, या निसर्गाची विविध रूपे आहेत जी आपण पाहतो, अनुभवतो.

'जेथे सजीव आणि निर्जीव एकत्र येऊन सुसंवाद साधतात व परिणामी जीवनाचा उगम होतो त्याला निसर्ग असे म्हणतात.'

निर्जीव घटकांमध्ये प्रमुख घटक सूर्य आहे. जो आपल्या प्रकाशाने पृथ्वीच्या पोटात उष्णता निर्माण करतो. या उष्णतेचे रूपांतर ज्वालामुखी आणि लाव्हारसात होते. पृथ्वीच्या वरील पृष्ठभागावर जेथे सजीव राहतात त्याला जमीन असे म्हटले जाते. पण सजीवांसाठी जमिनीप्रमाणे जीवन म्हणजेच पाणी आणि हवा हे महत्त्वाचे घटक आहेत.

सजीवांचे दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते ते म्हणजे वनस्पती आणि प्राणी. प्राणी स्वतःचे अन्न स्वतः तयार करू शकत नाहीत. वनस्पती स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात म्हणजेच त्या स्वावलंबी आहेत. प्राणी हा वनस्पतींवर अवलंबून असतो. तो फक्त अन्नासाठीच.

'ज्या विद्याशाखेत सजीव आणि निर्जीव घटकांचा अभ्यास केला जातो त्या शाखेला शास्त्र किंवा विज्ञान असे म्हणतात.' 'शास्त्र शाखेचे प्रमुख ध्येय जीवनाचा उगम शोधणे व निसर्गाची जास्तीत जास्त उन्नती करून प्रत्येकाचे आयुष्य सुखकर बनविणे हेच आहे.'

जर निसर्गाची विविध रूपे समजून घ्यायची असतील तर प्राण्यांचा अभ्यास करणे हे शास्त्रज्ञांचे प्रथम उद्दिष्ट होते. या पृथ्वीवर पुष्कळच प्राणी आढळतात जसे पाळीव प्राणी, जंगली रानटी क्रूर प्राणी, पशू, पक्षी इ. प्रत्येक प्राणी हा स्वतःच्या कुटुंबापासून अगदी वेगळा, भिन्न असतो म्हणूनच स्वतःच अस्तित्व सिद्ध करणे हा त्याचा प्रथम हेतू असतो. मनुष्य प्राण्याप्रमाणेच सर्व प्राण्यांच्या दोन प्रमुख गरजा आहेत त्या म्हणजे अन्न आणि निवारा. अन्न मिळविण्यासाठी, स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि अस्तित्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येक प्राणी स्वतःची अशी भाषा किंवा सांकेतिक खुणा निर्माण करतो, ज्यायोगे तो इतर प्राण्यांना आपले म्हणणे पटवून देऊ शकेल. यालाच संदेशवहन असे म्हणतात. केवळ अन्न आणि निवारा हेच महत्त्वाचे नसून प्रजनन ही स्थितीही महत्त्वाची असते. उत्पत्ती, स्थिती आणि मृत्यू ह्या प्राण्यांच्या ३ अवस्था आहेत. प्राण्यांचा जन्म होतो. हे प्राणी प्रथम बाल्यावस्थेत असल्यामुळे त्यांचे भरणपोषण करणे हे प्रमुख कार्य त्यांच्या मातापित्यांवरच असते. काही कालवधीनंतर हे प्राणी परिपक्व होतात. वंशवृद्धी करण्यासाठी उत्पत्ती करणे गरजेचे असते. नवीन पिढी तयार झाली की जुनी पिढी आपले अस्तित्व संपविते. बहुतांश प्राण्यांचे आयुर्मान अल्प असते म्हणून प्रजनन ही त्यांच्या आयुष्यातील प्रमुख घटना आहे. म्हणून प्राण्यामध्ये संदेशवहन होणे हे अत्यंत गरजेचे असते. संदेशवहनाचे आपण चार ढोबळ प्रकार पाडू शकतो.

**(१) दृष्टिद्वारे संदेशवहन :**

या संदेशवहनात डोळे, रंग, हालचाल, वेळ इत्यादींचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो.

**(२) ध्वनिद्वारे संदेशवहन :**

ध्वनिद्वारे संदेशवहनात आवाजाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो.

**(३) रासायनिक संदेशवहन :**

प्राण्यांच्या शरीरातून विशिष्ट प्रकारचा द्रव अथवा घन पदार्थ पाझरतो ज्यामुळे वास निर्मिती होते व संदेशवहन होते.

**(४) स्पर्शाद्वारे संदेशवहन :**

एकमेकांना स्पर्श करून जे संदेशवहन होते त्याला स्पर्शाद्वारे संदेशवहन असे म्हणतात.

उदा. चिम्पांझी माकड, पक्षी.

## दृष्टिद्वारे संदेशवहन

दृष्टी म्हणजे डोळे. दृष्टिद्वारे संदेशवहनात डोळ्यांद्वारे संदेशवहन होते कारण हे प्राणी आवाज करू शकत नाहीत. या प्रकारचे संदेशवहन घडवून आणण्यासाठी रंग, हालचाल, वेळ, बसण्याची विशिष्ट पद्धत इ. माध्यमे वापरली जातात. पण हे संदेशवहन घडवून आणण्यासाठी प्राणी व त्यांचा दृश्यभाग हा आकर्षित असणे महत्त्वाचे असते. हा नियम वनस्पतींपासून सगळ्या प्राण्यांना लागू पडतो.

फुलपाखरांच्या पंखावरचे रंग हे अतिशय ठळक व गडद असतात. जास्तीकरून त्यावर काळे गोल अथवा उभट पट्टे असतात.याचा त्यांना दोन प्रकारे उपयोग होतो. जेव्हा एखाद्या फुलावर ही फुलपाखरे बसतात त्या वेळी चटकन लक्षात येत नाहीत. तसेच आपल्या साथीदाराला आकर्षित करण्यासाठीही त्याचा उपयोग होतो. बऱ्याच पक्ष्यामध्ये त्यांचे डोके किंवा धड किंवा शेपटी ही गडद रंगाची असते.पोपटाचे शरीर हिरवे असते पण चोच लाल असते. झाडांमध्ये पोपटाच्या शरीराचे रंगही मिळते जुळते होतात व त्याचा शत्रूपासून बचाव होतो.

सरडा आपला रंग बदलतो. जेव्हा तो पानांमध्ये असतो. तेव्हा त्याचा रंग हिरवा असतो. इतर वेळी त्याचा रंग करडा,चॉकलेटी किंवा गडद लाल असतो. आपले भक्ष्य पकडण्यासाठी व शत्रूपासून संरक्षण होण्यासाठी सरड्याचा रंग हिरवा होतो.

वटवाघूळ हा प्राणी आपण फक्त रात्रीच पाहू शकतो, कारण दिवसा वटवाघूळ सहसा दिसत नाही. रात्रीच्या वेळीच वटवाघळाचे कार्य आपणास दिसते. दिवसा प्रकाश प्रखर असतो त्यामुळे त्याचे डोळे पाहू शकत नाहीत या उलट अंधारात किंवा मंद प्रकाशात ते पाहू शकते.

मांजराची अंधारात पाहण्याची शक्तीही माणसापेक्षा सहापट मोठी असते म्हणूनच मांजर रात्रीही प्रकाशाविना घरात फिरते. रात्रीच्या वेळी प्राण्यामध्ये प्रियाराधन होते तर दिवसा अन्न शोधणे इ. सहजप्रवृत्ती केल्या जातात.

अम्ब्लीन्हिड्स फ्रिस्टॅट्स नावाचे महाकाय सरडे त्यांच्या अंडी घालण्याच्या हंगामामध्ये फार मोठ्या प्रमाणात दक्षिण अमेरिकेच्या सागरी किनाऱ्यावर जमा होतात. प्रत्येक नर आपल्या कुटुंबीयासमावेत विशिष्ट जागी स्वतःचे साम्राज्य प्रस्थापित करतो. जर दुसऱ्या नराने त्याच्या सीमा प्रदेशात शिरकाव केला, तर तो नर आपल्या प्रतिस्पर्ध्याला परतविण्यासाठी पवित्रा घेतो. डोक्यावरील झूल भिंतीसारखी ताठच्या ताठ उभी करतो पट दाखवितो आणि डोके जोरजोराने हलवीत झूलू लागतो. त्यानं माघार नाही घेतली तर त्यांच्यामध्ये शीर्षखंडाची टक्कर होते व पराजित प्रतिस्पर्धी निघून जातो.

चिचील्ड जातीचे मासे स्वसामर्थ्याच्या प्राथमिक प्रदर्शनानंतर एकमेकांबरोबर काही काळ फिरतात नंतर समोर येऊन प्रतिस्पर्ध्याच्या अंगावर पाणी उडवतात किंवा त्याचा जबडा तोंडात पकडतात. ज्याची पकड सुटते तो हरतो.

दृष्टिद्वारे संदेशवहनामध्ये माहितीचे प्रमाण अत्यल्प असते. ते फक्त जवळच्या अंतरावरच फायद्याचे ठरते.

जर एखाद्या कळपातला साथीदार हरवला असेल, तर या संदेशवहनाचा उपयोग होत नाही कारण यातून स्थळ, काळाचा बोध होत नाही.

## ध्वनिद्वारे संदेशवहन

ध्वनी म्हणजेच आवाज. प्राणी पुष्कळच वेळा एकमेकांपासून खूप दूरवर निघून जातात. मग त्यांच्याशी सुसंवाद साधण्यासाठी आवाजाची गरज भासते. स्थळ, काळ, वेळेनुरूप प्रत्येकाची ओरडण्याची पद्धतही निराळी असते. या ओरडण्यामधेही प्रत्येकाच्या सांकेतिक खुणा असतात. ज्यायोगे योग्य त्या व्यक्तीला निरोप पोहचावा. उदा. पक्षी, पेंग्वीन, बेडूक, हत्ती इ.

पक्षी शरीराने हलके असतात आणि द्विपादी असतात. अन्न शोधण्यासाठी बरेचसे पक्षी थव्यानेच उडतात. हे पक्षी अन्नासाठी खूप दूरवर जातात म्हणून निरोप पोहोचविण्यासाठी

आवाजापलीकडे ते काहीच करू शकत नाहीत. कावळा, चिमणी इ. पक्षी स्वतःचा असा एक समाज निर्माण करतात. नर आणि माद्यांनी अन्न गोळा करून आणायचे व स्वतःचे आणि पिल्लांचे पोट भरायचे हा सांकेतिक इशारा आहे. शत्रू आला सांगण्यासाठी हे पक्षी खूप किलबिलाट करतात. पक्ष्यांचा आवाज प्रामुख्याने सकाळी आणि संध्याकाळी जास्त ऐकायला मिळतो. दुपारच्या वेळी हे पक्षी विश्रांतीसाठी स्थिरावलेले असतात.

बेडूक हा उभयचर प्राणी आहे, जमीन आणि पाणी या दोन्हींवरही त्याचे अस्तित्व आढळते. बेडकांमध्ये संदेशवहन फक्त पावसाळ्यातच पाहायला मिळते. पाऊस पडल्यावर सगळी नद्या, नाले, डबकी तुडूंब भरतात. नर बेडकाच्या गळ्यामध्ये आवाजाची पिशवी असते. पाऊस पडून गेल्यावर मादीला निरोप पोहोचवण्यासाठी तो ओरडतो. प्रजननासाठी परिपक्व आहे की नाही हेच ओरडण्यामागचे मुख्य कारण असते. बेडकांचे मिलन फक्त पावसाळ्यातच होते कारण त्या वेळी पुष्कळ पाणी असते व अंडे फलित होण्यासाठी पाण्याची जास्त आवश्यकता असते.

मोर हा भरपूर पिसारा म्हणजेच शेपटी असलेला पक्षी आहे. पावसाळ्यातच (नर) मोर आपला पिसारा फुलवतो आणि लांडोरीला आकर्षित करतो. नंतर एकमेकांच्या आवाजाची ओळख पटते व त्यांचे मिलन होते.

एम्परर पेंग्विन हा दक्षिण ध्रुवावर आढळणारा पक्षी आहे. पेंग्विन हा पक्षी कडाक्याच्या थंडीत राहतो. मार्च महिन्यात हे पक्षी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाटचाल करतात. या वाटचालीत माद्या आपल्या आवडीच्या नराची पसंती करतात. त्याच्या अवतीभोवती फिरून त्याच्याशी ओळख करून घेतात. त्याच्या आवाजाची लय समजून घेतात. प्रत्येक पक्ष्याची शीळ व आवाज अगदी स्वतःचा असा वैशिष्ट्यपूर्ण असतो. याकाळात सूर्यप्रकाशाचा पत्ताच नसतो त्यामुळे नजरेपेक्षाही आवाजाची खूणगाठ नरमादी परस्परात पक्की करतात. त्यांचे मिलन होते व मादी नराच्या पायाशी अंडे घालते. हे अंडे पायावर घेऊन नर ६४ दिवस उभा राहतो व ६४व्या दिवशी पिल्ले अंड्यातून बाहेर पडतात.

वाघ आपले भक्ष्य शोधायला निघतो तेव्हा सारखी डरकाळी फोडतो. वाघ हा प्राणी नरभक्षक असून त्याच्या अंगात प्रचंड शक्ती असते, म्हणून सहसा हे प्राणी समूहात नसतात. असे बलवान प्राणी हे जोडप्याने किंवा कुटुंब करून राहतात. कुटुंबात नर, मादी, पिल्ले हेच घटक असतात. पिल्ले गुरगुर करतात व आपल्या आईला भूक लागली इ. गोष्टी सांगतात.

हत्ती हा समूहप्रिय प्राणी आहे. त्यामध्येही आवाजाच्या साहाय्यानेच संदेशवहन केले जाते. एखादा प्राणी आपली वाट चुकला अथवा संकटात सापडला तर तो आवाज देऊन आपल्या सहकाऱ्यांना बोलावतो व स्वतःची सुटका करून घेतो.

प्रियाराधन, प्रजानिर्मितीची आस, अपत्य संगोपन आदी सहजप्रवृत्तींप्रमाणे आक्रमण हीसुद्धा प्राण्यांमधील एक सहज प्रवृत्ती आहे. प्राणी वन्य असो वा पाळीव. त्याचे जीवन स्पर्धात्मक आहे. या स्पर्धात्मक जीवनामध्ये स्वतःच, स्वतःच्या कुटुंबाचं एवढंच काय निवासाचं अस्तित्व टिकवणं, ते इतरांच्या लक्षात आणून देणे व त्याची सक्रिय मान्यता प्राप्त करून घेणे या गोष्टींची अतिशय गरज असते. यासाठी संघर्ष करावा लागतो.

स्पर्धक समोरासमोर येतात त्या अगोदर विशिष्ट प्रक्षोभक व भीतिदायक आवाज काढून अथवा शरीराची विशिष्ट हालचाल करतात. पायांची आदळआपट करून प्रतिस्पर्ध्याला दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

काही हरणांच्या जमातीतील प्रतिस्पर्धी नर डोळ्यांच्या कोपऱ्यातून एकमेकांचा अंदाज घेतात एकदम थांबून गर्रकन वळून ते एकमेकांना समोर येऊन धडक मारतात.

वन्य प्राण्यांमध्ये जीवनसंग्रामात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी लढती होतात पण दुसऱ्याचे अस्तित्व नामशेष केलं जात नाही. त्यामुळे एखादी जाती निर्वंश होण्याचा धोका टळतो. पराभूत स्पर्धक विशिष्ट ठिकाण वा प्रदेश सोडून जातो त्यामुळे ती जात विखरली जाते. त्यामुळे विशिष्ट प्रदेशात एकवटली गेलेली संख्या कमी होते आणि उर्वरितांना जीवनाश्यक असणाऱ्या गोष्टींची कमतरता भासत नाही. प्राणीमात्रांच्या आक्रमक वृत्तीमध्ये स्वजातीयांचे निर्दालन अभिप्रेत नसून त्यांचे विकसन, विस्थापन आणि पुनर्निर्माण अनुस्यूत आहे.

बरेचसे प्राणी हे नर आणि मादी या जोडीमध्येच राहतात म्हणून एकमेकांमध्ये निरोप पोहोचविण्याची क्रियाही वेगवेगळ्या माध्यमांद्वारे केली जाते. जेव्हा नर आणि मादी एकमेकांना पसंत करतात त्यानंतर ते एकमेकांमध्ये आयुष्यभरासाठी गुंतले जातात. मग पिल्लांचे संगोपन असो वा त्यांचे मिलन असो प्रत्येक साथीदार आपल्या सहकाऱ्याला जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न करतो. हा प्राण्यांचा कायदा नव्हे तर सामाजिक बांधिलकी आहे.

**ध्वनिद्वारे संदेशवहनाचे फायदे – तोटे :**

जर एखादा प्राणी दूरवर असेल तर किंवा कळपातून हरवला असेल अथवा वाट चुकला असेल तर त्याला इशारा देता येतो. यामध्ये माहितीचे प्रमाणही जास्त असते तसेच स्थळाचा, काळाचा आणि वेळेचा बोध होतो.

पण बऱ्याच वेळा गैरसमजही होतात कारण सांकेतिक खुणा एक जमातीच्या जवळ जवळ सारख्याच असतात. त्यामुळे नक्की कोण सांगतो अथवा बोलावतो याचा अर्थ कळत नाही.

## रासायनिक संदेशवहन

प्राण्यांना एक प्रकारचा उग्र दर्प असतो कारण प्राण्यांच्या शरीरातून पुष्कळ परिसर त्या वासाने भरून जातो. प्राण्यांच्या शरीरातून पाझरणाऱ्या रसायनामुळे जे संदेशवहन होते त्याला रासायनिक संदेशवहन असे म्हणतात.

उदा. मधमाशी, मुंगी, मासे, कस्तुरी मृग इ.

मधमाशीच्या पोळ्यात तीन घटक असतात. कामकरी माशी, नरमाशी आणि राणीमाशी. यामध्ये कामकरी माशीचे कार्य हे विस्तृत असते. अळ्यांचे, अंड्यांचे संगोपन करणे, दूरवर जाऊन परागकण म्हणजेच मध गोळा करून आणणे, आजाऱ्यांची सेवा करणे आणि प्रजननाच्या वेळी राणी माशीची काळजी घेणे. नरमाशीचे कार्य फक्त संयोगापुरताच मार्यादित असतो. त्यांचे कार्य संपले की कामकरी माश्या या नरांना हाकलून देतात व उपासमारीमुळे त्यांचा मृत्यू होतो. राणीमाशी म्हणजे सगळ्या पोळ्याची सर्वेसर्वा असते. फक्त एकटी राणीमाशीच प्रजनन करते. राणीमाशी प्रजननासाठी परिपक्व झाल्यावर पोळ्याच्या बाहेर पडते. तिच्या शरीरातून एक रासायनिक द्रव्य बाहेर पडतो. त्या वासामुळे नर तिच्याकडे आकर्षित होतात व त्या योगे त्या नराशी तिचे मिलन होते. पोळ्यात जेव्हा प्रथमच मध आणला जातो तेव्हा कामकरी माशी व राणी माशी नाचून आनंदोत्सव साजरा करतात.

मासे पाण्यामध्ये आपले प्रजनन घडून आणतात. बऱ्याच माश्यांचे मिलन हे रासायनिक प्रकारचे असते. मासे आपल्या साथीदाराला आकर्षित करण्यासाठी करण्यासाठी रासायनिक द्रव्य बाहेर टाकतात ज्यामुळे नर अथवा मादी एकमेकांकडे आकर्षित होतात. समुद्रात खूप लहान मासे असतात व परिणामी ते मोठ्या माश्यांचे भक्ष्य बनतात म्हणून ते आपला समुदाय करून राहतात. रासायनिक संदेशवहन सायप्रिनस माशांमध्ये जास्त आढळतो. पृष्ठवंशीय प्राण्याप्रमाणे माश्यांच्याही डोक्यात शीर्षग्रंथी अथवा पीयुषिकाग्रंथी असतात. मेंदूच्या खाली असलेली ही ग्रंथी प्रजननास कारणीभूत होते.

मुंग्यांमध्येही रासायनिक संदेशवहन आढळते. मुंगी चालताना तिच्या शरीरातून एक प्रकारचा रासायनिक पदार्थ पाझरतो ज्याच्या वासावर मागून येणाऱ्या मुंग्या चालतात. पहिली मुंगी अन्न शोधते व तिच्यावर आपली खूण करते. मागून येणाऱ्या मुंग्या हे अन्न आपल्या वारूळात पोहोचवतात. मुंग्यांच्याही वारूळात ३ घटक असतात. कामकरी मुंगी, राणी मुंगी आणि नर मुंगी.

कामकरी मुंगी ही अन्न गोळा करण्यापासून सगळ्यांची सेवा-शुश्रुषा करण्यापर्यंत सगळे कार्य करते. राणीमुंगी प्रजननास योग्य असते. नर आणि राणीचे मिलन होऊन जी अंडी फलित होतात त्यातून राणीच बाहेर पडते व अफलित अंड्यातून कामकरी मुंगी तयार होते.

आपण हरिणे फक्त जंगलातच अथवा अभयारण्यात पाहतो. या हरणांच्या प्रकारात कस्तुरीमृग हा सर्वात वेगळा हरणांचा प्रकार आहे. नर कस्तूरी मृग प्रौढ झाल्यावर त्याच्या शरीरातून उग्र दर्प बाहेर पडतो त्याला कस्तुरीगंध असे म्हणतात. कस्तुरी नराच्या पोटातील पिशवीत असते. या कस्तुरीचा वास खूप दूरवर पोहचू शकतो म्हणून मादी त्याच्याकडे आकर्षित होते.

काही हरणांमध्ये नरांना शिंगे असली तर माद्यांना मात्र ती नसतात. कुरंग हरणांच्या शिंगांना त्वचेतून उगवलेले कवच असते आणि त्याच्या आत हाड असते. हाड भरीव असते. याच्या वासाने ही हरणे एकमेकांना ओळखतात. टवकारलेले कान व चांगले डोळे यांच्या साहाय्याने हे हरिण शत्रूचा कानोसा घेऊ शकतो.

**रासायनिक संदेशवहनाचे फायदे व तोटे :**

रसायनाच्या वासने दूरवरही वासाचा प्रभाव होतो. त्यामुळे योग्य त्या प्राण्याला तो संदेश पोहचू शकतो पण त्यातून स्थळ, काळाचा बोध होत नाही. प्राण्याचे योग्य ठिकाण अथवा उद्देश (माहितीचा) कळत नाही. म्हणून रासायनिक संदेशवहन मर्यादित स्वरूपाचे असते.

## स्पर्शाद्वारे संदेशवहन

माहिती, निरोप अथवा संदेश प्रामुख्याने स्पर्शाने जाणवतो अथवा पोहोचविला जातो याला स्पर्शाद्वारे संदेशवहन असे म्हणतात. शब्दांपेक्षा स्पर्श अधिक बोलका असतो असे म्हणतात ते माणासांप्रमाणेच प्राण्यांमध्येही पाहायला मिळते.

उदा. चिम्पांझी, मांजर.

माकडापासूनच माणूस तयार झाला असे बरेच पुरावे सापडले आहेत. चिम्पांझी माकडाच्या बऱ्याचशा वागण्याच्या तऱ्हा या माणसासारख्याच असतात. या माकडाच्या अंगावर लांब लांब केस असतात. स्वतःची स्वच्छता करणे हा देखील या प्राण्याचा एक गुण आहे. माकड आपल्या पिल्लांच्या अंगावरचे केस हाताला असलेल्या नखांच्या साहाय्याने स्वच्छ करतात ज्यामुळे त्यांच्या अंगावर बसलेले कीटक उडून जातात.

चिमणी अथवा इतर पक्षीही आपल्या पिलांच्या चोचीत चोच घालून त्यांना भरवतात. केवळ पोट भरणे हा एकमेव उद्देश नसतो, तर प्रेम, वात्सल्य आणि माया हा गुणही यातून पाहायला मिळतो. स्वतःची स्वच्छता करण्यासाठी चिमणी आपल्या चोचीने केस साफ करते.

मांजर आपल्या पिलांच्या पाठीवरचे केस चाटते ज्यामुळे त्यांच्या अंगावर असलेली घाण निघून जाते. ती आपल्या पिल्लांना तोंडात धरून इकडे-तिकडे घेऊन जाते पण तिचे दात पिल्लांना लागत नाही.

प्राण्यांचे संदेशवहन हा त्यांच्या आयुष्यातला सर्वात मोठा भाग आहे. ज्याद्वारे ते आपल्या विविध क्रिया, भावना व्यक्त करतात आणि जाणून घेतात. प्राण्यामध्ये एक सुसूत्रता आणि अस्तित्व टिकण्याची क्षमता आहे जिची गरज आपल्या राष्ट्राला आहे. प्रत्येक प्राण्याचे दुसऱ्या प्राण्याशी वैर असतेच पण त्या वैराची एक मर्यादा असते. स्वतःची अशी एक सामाजिक चाकोरी असते म्हणूनच प्राण्यांपासून मनुष्य वेगळा पडला आहे. मनुष्याला देवाने पुष्कळ वर दिलेले आहेत. तो हसू शकतो, बोलू शकतो, विचार करू शकतो पण दिवसेंदिवस त्याच्या प्रकृतीत फरक पडत चालला आहे. त्यांने स्वतःचे वेगळे राज्य निर्माण करण्याची तयारी केली ज्यामुळे हे प्राणी, वनस्पती आणि इतर घटकांचा ऱ्हास होत गेला.

अजूनही भारतासारख्या देशात सामाजिक बांधलकी नावाची गोष्ट ही केवळ वर्गात अथवा शाळेत शिकवली जाते. बालहत्या, विधवा विवाह इ. सामाजिक प्रश्न अजूनही आपल्या देशातल्या लोकांना सतावतात. जातपात मानणारी लोक, अत्याचारी, क्रूर, आक्रस्तळी का बनतात याची उत्तरे न मिळण्यासारखी आहेत.

विज्ञानाचा फायदा मानवाला झाला पण त्याचे तोटे हे निसर्गाला आणि सगळ्याच प्राण्यांना भोगावे लागले. स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याच्या जीवनावर परिणाम करणे हे काही सूज्ञपणाचे नाही असे कोणतेही प्राणी सांगू शकेल.

खरेतर समाज म्हणजे विशिष्ट जात किंवा त्या प्राण्याचा एक समुदाय नसून ज्याने पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण केली त्यांचा समुदाय आहे. हे तरुणांच्या मनावर बिंबवणे , हेच जुन्या पिढीचे प्रथम कर्तव्य असते. ज्या चुका सगळ्यांकडून होतात त्यांचे निवारण करणारा परिणामी कोणीच शिल्लक राहत नाही. या चुकांचे निवारण मनुष्यानेच करायला हवे कारण निसर्गाच्या त्याच्याकडून जास्त अपेक्षा आहेत. चला तर मग आपण सगळे मिळून हा प्रयत्न यशस्वी करू, अगदी तन, मन आणि धन अर्पून!

★ ★ ★

# कलाभिरुचीवर मराठी विभागातर्फे चर्चासत्र संपन्न

डॉ. स्वाती कर्वे

साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, शिल्प व चित्र या सहा ललित कलांनी मानवी जीवनात कलेचे एक स्वतंत्र क्षेत्र निर्माण केले आहे. या सहा कला म्हणजे कलेची स्वतंत्र क्षेत्रे आहेत. विविध कलावंत आपल्या प्रतिभेतून कलानिर्मिती करीत स्वतःची साधना करीत असतात. परंतु त्याच वेळेला कलावंत व आस्वादक यांच्यात एक नाते निर्माण होत असते. त्यातून त्या कलेच्या संदर्भात समाजाची एक कलाभिरुची आकार घेत असते. एकाच वेळेला या सर्व कलांचा व त्या संदर्भात कलाभिरुचीचा वेध घेणे हे उद्‌बोधक ठरत असते. त्यातून तत्कालीन कलाभिरुचीचे कार्यसूत्र शोधता येईल? या विचारांनी मराठी विभागाचे प्रमुख डॉ. वि.भा. देशपांडे यांनी गुरुवार दि. २७ फेब्रुवारी ९७ रोजी एका दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते. 'कलाभिरुची' (साहित्य आणि अन्य कलांच्या संदर्भात) या शीर्षकाखाली साहित्य, चित्र, नाट्य, नृत्य व चित्रपट या प्रमुख कलांच्या संदर्भात या चर्चासत्रात प्रामुख्याने विचार केला गेला.

जेष्ठ कथाकार, समीक्षक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्‌घाटन करण्यात आले. डॉ. मेधा सिधये यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. उद्‌घाटन समारंभात डॉ. वि. भा. देशपांडे यांनी या चर्चासत्राच्या आयोजनामागील आपली भूमिका प्रास्ताविकात स्पष्ट केली. ''समाजात ज्या कला निर्माण होत असतात. त्यावरून त्यांचा दर्जा व्यक्त होत असतो. कलावंत समाजाची अभिरुची घडवत असतात. ती नेमकी कशी घडते. अभिजन व बहुजन यांच्या अभिरुचीचा काही संबंध असतो का? की त्यांच्यात भिन्नता असते. अभिरुचीचे घटक कोणते? असे विविध प्रश्न या निमित्ताने निर्माण होतात. त्यांचा विचार व्हावा, अभिरुचीचा शोध घेता यावा. ही भूमिका या चर्चासत्राचे आयोजन करण्यामागे आहे.'' असे त्यांनी सांगितले.

आपल्या उद्‌घाटनपर भाषणात प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी 'कलाभिरुची' च्या संदर्भात विविध पैलूंना स्पर्श करीत विषयाचा व्यापक पातळीवर आढावा घेतला. आपल्या मोजक्याच परंतु मौलिक भाषणात त्यांनी या विषयाचे एक व्यापक चित्रच स्पष्ट केले. प्रारंभी त्यांनी 'कलाभिरुची' या विषयावर चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल संयोजकांचे अभिनंदन केले. पुढे ते म्हणाले, 'विविध कलांच्या संस्काराने माणूस समृद्ध होतो. परंतु आजसुद्धा अन्य कलांचे व्हावेत तितके संस्कार होताना दिसत नाहीत. महाराष्ट्रात अनेक चित्रकार आहेत, परंतु त्यांचे अस्तित्व जाणवत नाही. चित्रकार व मराठी माणूस यांचे नातेच निर्माण झालेले नाही.'

'साहित्याची अभिरुची घडण्यास अन्य कलांचा उपयोग होतो.' हा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी आपल्या स्वानुभवातून स्पष्ट केला. ''ठुमरी ऐकली की मनावर एक परिणाम होतो. त्यातून एक विश्व उभे राहत असते. मनात हुरहुरी सारख्या भावना दाटतात. त्या साहित्यातून निर्माण करता येतील का? असा प्रश्न पडतो. ठुमरीच्या संस्कारातून माझ्या अनेक कथा निर्माण झाल्या आहेत.'' असे त्यांनी सांगितले.

''मराठी साहित्यावर अन्य कलांचे असायला हवेत तितके संस्कार नाहीत. पूर्वी साहित्यात अनेक प्रवाह होते. मार्क्सवाद, गांधीवाद सारखे वाद होते. तरी साहित्यात एकसंधपणा होता. एका व्यासपीठावर ते येत असत. असा एकसंधपणा सांस्कृतिक पातळीवर असणे. अतिशय

महत्त्वाचे आहे. सर्वांना जोडणारा तो एक अलिखित पाया असणे महत्त्वाचे असते. आज असा एकसंधपणा दिसत नाही. एकमेकांपासून फटकून राहणे. दुसऱ्याचे अस्तित्व नाकाराणे ही प्रवृत्ती आहे. सर्व अनुभव स्वीकारले पाहिजेत. त्यातूनच उत्तम साहित्य निर्माण होतो. अभिरुची घडते'' असे त्यांनी पुढे स्पष्ट केले.

'एका मुंगीचे महाभारत' या पुस्तकासाठी १९९६ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्रा. गंगाधर गाडगीळ यांना मिळाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य पद्माकर आपटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

पहिले सत्र साहित्य व चित्रकला यांच्या संदर्भात होते. डॉ. स्नेहल तावरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. 'साहित्याभिरुची' या विषयावर प्रा. रा.ग.जाधव यांनी अभ्यासपूर्ण सविस्तर निबंध सादर केला.

साहित्याच्या अभिरुचीचा विचार हा गुंतागुंतीचा विचार आहे. हा मागोवा साहित्य व साहित्य बाह्य सांस्कृतिक जीवनाच्या संदर्भात करता येतो. या दोन्ही गोष्टी परस्पर संबंधित आहेत. परंतु साहित्याच्या संदर्भात विचार हा खरा कळीचा प्रश्न आहे. त्यासाठी आपण साहित्य बाह्य गोष्टींचा विचार केलेला नाही,' हे त्यांनी प्रारंभी स्पष्ट केले.

१९८० नंतर साहित्याचे पात्र मोठे बनले आहे. त्यात स्थिरता आहे. नवतेची आव्हाने स्थिरावली आहेत. या पर्यावरणात साहित्याच्या अभिरुचीचा विचार करणे शक्य आहे. असे सांगून प्रारंभी त्यांनी आपली काही निरीक्षणे नोंदवली. ''मराठीत भैरप्पा कारंथ नाहीत. घणाघाती समीक्षा नाही. समीक्षा, वैज्ञानिकांना सामावून घेणारी नाही. अभ्यासकांची सृष्टी मर्यादित विश्वात आहे. विविध क्षेत्रातील लोकांना मुक्तद्वार नाही. हस्तीदंती मनोरा आहे. त्याची दारे बंद ठेवली तर अभिरुची विकसित होत नाही.'' असे ते म्हणाले.

यानंतर वाङ्मयीन अभिरुची निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या मुद्यांची त्यांनी चर्चा केली. त्यासाठी वाङ्मयीन पत्रकारिता आवश्यक आहे. हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. पुरस्कारांचे वाढलेले प्रमाण हा अभिरुचीवर परिणाम करणारा मोठा घटक आहे. त्याचा संबंध सांस्कृतिक अभिरुचीशी आहे. शिक्षण हा अभिरुची घडविण्यातील महत्त्वाचा घटक आहे. शिकणे व शिकवणे या दृष्टीने सोयीची पडणारी एखाद्या कवीची कविता निवडली जाते. त्यामुळे मुलांना कवी चुकीच्या दिशेने परिचित होतो. हे मुद्दे नमूद करून त्यांनी, ''सध्या दिसणारी वाङ्मयीन अभिरुची सुभेदारी प्रवृत्तीची, सरंजामशाही वृत्तीची आहे.'' असे मत व्यक्त केले. ''ध्रुवीकरणाने आदानप्रदान होत नाही परंतु अभिरुची त्या पलीकडे जाणारी असते. तिची जपणूक आवश्यक आहे. साहित्यकृतीला सामोरे जाताना जी मनःस्थिती तयार होते ती साहित्याची अभिरुची. ती वाढवली पाहिजे. रसायनशास्त्रातील उर्ध्वपतन प्रक्रियेने ती घडवावी लागते. त्यासाठी स्वतःची प्रयोगशाळा लागते. बाजारात ती मिळत नाही. मनाच्या घड्या मोडून ज्योत स्थिर करावी लागते. चटके-धक्के सहन करावे लागतात. या तप्त अवस्थेतून गोळा केलेली अभिरुची शुद्ध असते.'' असा विचार त्यांनी शेवटी व्यक्त केला.

'चित्रकलाभिरुची' च्या संदर्भात आपले विचार व्यक्त करताना डॉ.वि.मा.बाचल म्हणाले की, ''प्राचीन कालापासून आजच्या कॉम्प्युटर ग्राफीक्स्पर्यंत चित्रकलेचा ५०० वर्षांचा इतिहास आहे. चित्रकलेची अभिरुची निर्माण होण्यासाठी चित्रप्रदर्शने भरणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात मुळगावकर व दलाल यांनी स्वतंत्रपणे अभिरुची घडवली आहे.''

या सत्राचा अध्यक्षीय समारोप पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केला. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''अभिरुचीचा शोध घेणे अवघड आहे. परंतु त्याचा विकास केला पाहिजे. त्यावरून सांस्कृतिक दर्जा ठरत असतो. अभिरुचीवर परिणाम करणारेही काही घटक असतात. संकेत तोडून पुढे जाण्याचा जे प्रयत्न करतील तेच नवीन अभिरुची निर्माण करतील. अभिरुचीच्या कक्षा तोडण्याचा जो प्रयत्न

करेल त्याच्याच हातून उत्तम अभिरुची घडेल.'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात नृत्य, नाटक व चित्रपट या तीन कलांच्या संदर्भात विचार करण्यात आला. डॉ. मधुरा कोरान्ने यांनी वक्त्यांचे स्वागत केले. नृत्याच्या अभिरुचीच्या संदर्भात प्रसिद्ध कथ्थक नृत्याभ्यासिका रोहिणी भाटे यांनी काही महत्त्वाचे विचार मांडले.

अभिरुची संकल्पनेचा श्रीमती रोहिणी भाटे यांनी प्रारंभी विचार मांडला. ''जीवन सातत्यासाठी निसर्गाकडून घेणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्याबाहेर सुखासाठी काही करावेसे वाटणे. संग्रह करावासा वाटणे ही अभिरुची. आवडीला निवड व औचित्य यांची जोड देऊन होणारा आविष्कार ही अभिरुची. हा मानवी जीवनाचा मौलिक आधार आहे. अभिरुची हा मानवी जीवनाचा मोठा गुण आहे. प्राथमिक गरजा संपल्यावर मानवाला तो स्तर सोडावासा वाटतो. व नंतर त्याचे जीवन समृद्ध होते.'' असे त्या म्हणाल्या.

यानंतर त्यांनी नृत्याभिरुचीचा विचार मांडला. 'नृत्य ही प्रयोगजीवी कला आहे. त्याने प्रेक्षकांशी सतत संबंध येतो. नृत्यही संकीर्ण कला आहे. परंपरेने लादली गेली की तिचे माध्यम हरवते. शब्द वरचढ होतात. नृत्याच्या मानेवर संगीत, साहित्य यांचे जोखड आहे. हे नृत्याचे माध्यम नव्हे. गृहीत अवकाशात सुसूत्रलयीत मानवी देहाचे जे आकार होतात. ती नृत्याची भाषा असते. इतरांचा आधार हवा, पण माध्यम होऊ द्यायचे नाही. कलाकाराचा आविष्कार माध्यमनिष्ठ होणे आवश्यक आहे. कलावंतावर मोठी जबाबदारी असते. त्याने अभिरुचीच्या दिशेने उतरू नये. प्रेक्षकांना वर उचलून न्यावे.' असे त्या म्हणाल्या. ''महाराष्ट्रात स्वतःचा अभिजात नृत्यप्रकार नाही. परंतु तंजावरला नृत्याचे बारकावे लहानपणापासून कळतात. तसे महाराष्ट्रात होत नाही. परंतु महाराष्ट्राने या कला आत्मसात केल्या आहेत.'' असे त्या शेवटी म्हणाल्या.

'नाट्याभिरुची' च्या संदर्भात डॉ. श्रीराम लागू यांनी आपले विचार मांडले. ''संपूर्ण समाजाची अभिरुची व्यापक केली पाहिजे. संपूर्ण समाजाची जीवनविषयक अभिरुची घडवणे आवश्यक आहे. नाटक केवळ करमणूक नाही. नाटक समाजाला सुसंस्कृत करते. मराठी नाटकांनी प्रेक्षकांची अभिरुची घडवली आहे. नवनाट्याची चळवळ सुरू झाली तेव्हा जी वृत्ती होती ती आज दिसत नाही. प्रेक्षकांची अभिरुची नक्कीच विकसित झाली आहे. आळेकर, एलकुंचवार यांनी नाटकाची नवीन परिभाषा दिली. खरा नट प्रेक्षकांच्या पातळीवर उतरत नाही. तर प्रेक्षकांना वर नेतो.'' असे सांगून शेवटी ते म्हणाले, ''अभिरुचीची सध्या दिसणारी अधोगती चिंतास्पद आहे.''

चित्रपटाच्या अभिरुचीच्या संदर्भात प्रसिद्ध अभिनेते दिग्दर्शक, निर्माते श्री. अमोल पालेकर यांनी आपले विचार मांडले. आपल्या भाषणात प्रारंभी त्यांनी चित्रकलेच्या संदर्भात काही मते व्यक्त केली व नंतर ते चित्रपटाकडे वळाले. ''चित्रपट हे एक माध्यम आहे. त्याला स्वतःची भाषा व दृश्य कलेशी नाते हवे. त्याचा विचार केलेला नाही. आपण हॉलिवूडच्या चित्रपटांवर वाढलो. सरळ रेषेत कथा सांगणारा चित्रपटाचा प्रकार प्रभावी आहे. प्रेमकहाणीतून आपण अजून बाहेर येत नाही. महाराष्ट्रात लोकांचा कान चांगला तयार झाला. संगीताची भरभराट झाली. नाटकापुरती दृष्टी बदलत गेली. परंतु बाकीच्या कला नृत्य, चित्रकला, चित्रपट यांना समजावून घेतले नाही. सिनेमा बघावा कसा ही नजरच आलेली नाही.'' हे मत त्यांनी व्यक्त केले. ''कला व कलाकार या विषयी आस्था नाही. अभिरुची वाढविता कशी येईल याचा विचार होत नाही. मराठी साहित्य समृद्ध आहे. त्याला दाद दिली जाते. जटिल असे अनेक प्रकार आपण साहित्यात मान्य करतो. पण तेच प्रकार सिनेमात अवघड का वाटतात?'' हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

''अभिरुचीचा सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे. अनेक पद्धतीने ती घेता आली पाहिजे. गेल्या दीड वर्षात 'बनगरवाडी', 'दोघी', 'लिमिटेड माणुसकी' एवढेच चाकोरीबाह्य चित्रपट निघाले. त्यांना दादा कोंडके

यांच्या चित्रपटाचेच परिणाम लावले जाते. स्वतंत्र परिमाणे निर्माण होणे आवश्यक आहे.'' हा विचार त्यांनी शेवटी मांडला.

साहित्य, चित्रकला, नृत्य, नाटक व चित्रपट यांच्या संदर्भात कलाभिरुचीचा विचार स्वतंत्रपणे केल्यावर एक लक्षात आले, की मराठी माणसाची साहित्य व नाटक या संदर्भात अभिरुची विकासावस्थेत आहे. परंतु ती अधिक सूक्ष्म होणे आवश्यक आहे. त्यांच्या तुलनेत चित्रकला व नृत्य या कलांविषयी मराठी माणूस तितकासा उत्सुक नाही, तर चित्रपट कलेविषयी नेमकी जाण अद्यापि आलेली नाही. अभिरुची ही सर्वांगीण हवी. कोणत्याही एका कलेला अन्य कलांच्या जाणिवेची जोड दिली तर ती अधिक समृद्ध व सर्वांगीण होते. कलेविषयी ही जाणीव विकसित करणे आवश्यक आहे. असाच निष्कर्ष या चर्चासत्रातील विचार मंथनातून काढता येतो.

शेवटी डॉ. स्वाती कर्वे यांनी आभार मानले. हे चर्चासत्र मराठी विभागातर्फे आयोजित होत असले तरी अन्य विभागातील सहकाऱ्यांचेही सहकार्य मनापासून मिळाले. कार्यालयीन सहकारी व ग्रंथालयातील सहकारी यांनी जे मनापासून सहकार्य दिले त्याबद्दल विभागाच्या वतीने त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मा. प्राचार्यांकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनानेच हे उपक्रम यशस्वी होतात. असेही त्यांनी नमूद केले.

या चर्चासत्राला पुण्यातील तसेच पुण्याबाहेरील प्राध्यापकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला होता. अभ्यासक व कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

★ ★ ★

## चुटकूला

आशीष : ''डरावने सपनों से छुटकारा पाने के लिए क्या करना चाहिए?''

निखिलेश : ''जैसे ही सपने दिखाई दे. आँखे बंद कर लेनी चाहिए!''

कु. गीता बागल
द्वितीय वर्ष, कला

## सोडून गेलात का?

सोडून जाणे काय असते ते आज कळलं.
जिवंतपणी मरण मी आज अनुभवलं.
स्वप्नांचा चुराडा होताना किती वाईट वाटलं
हे आज उमगलं.
स्वतःपेक्षा जास्त ज्याच्यावर प्रेम केलं, त्यांना
काळाने कायमचे दूर नेलं.
ज्यांच्या आधाराची गरज होती आयुष्यभर,
त्यांनीच अर्ध्यावर बेबारशी सोडून दिलं.
त्यांची काही स्वप्न होती.
आमच्याकडून, आम्ही पूर्ण करणार होतो त्याचं
एक एक स्वप्न पण स्वप्नपूर्तीच बघण्याचे
भाग्यच नव्हतं त्याचं.
लाख ठरविले विसरून जायचं सारं.
पण, खरचं विसरणं इतक सोपं असतं का?
संकटाला कधी घाबरायचं नाही ही
शिकवण दिली त्यांनीच
म्हणून तर आज जिवंत आहोत आम्ही.
जीवनाला अर्थ नाही, जगण्याला दिशा नाही,
पुढे काय करायचे अशी कुठलीही आशा नाही.
सर्वत्र अंधार आहे निराशेचा, मिळेल का कधी
एखादा किरण आनंदाचा
नावाड्याविन जशी चालते, नौका तशी
तुमच्याविन आमची झाली आहे दैना.
तुम्ही असं केलतं का? उमलण्याआधी
आम्हाला असं का कोमजवलं.
मरण हे अटळ असते हे माहीत आहे आम्हांला
पण मरणालाही योग्य काळ, योग्य वेळ हवी हे
कसं कळलं नाही तुम्हाला.
सांगा का सोडून गेलात आम्हांला?

कु. भोंडवे पूनम विजय
१२ वी, कला
'महास्पर्धा' ९७ (द्वितीय क्रमांक)

# एक अविस्मरणीय आठवण

कु. छाया तुकाराम तांदळे, कु. पूनम विजय भोंडवे,
कु. वैजयंती झांजु दळवी, १२ वी (कला)

" जिंदगी का सफर है ये कैसा सफर
कोई समझा नहीं कोई जाना नहीं".........

'संजय कांबळे'

हे नाव ऐकले तर समोर दिसते एक व्यक्ती. आत्मविश्वासाने भरलेली, स्वतःच्या ज्ञानावर विश्वास असणारी, सर्वांना स्वतःच्या सहवासात सामावून घेणारी, मनमिळावू आणि मी कोणापेक्षाही कमी नाही. हे वारंवार म्हणणारी ही व्यक्ती होती. होय होतीच म्हणावे लागेल. कारण आता ती आमच्यात नाही. पण मन हे मानायलाच तयार होत नाही. इंग्रजी विषयाच्या पेपरच्या अगोदर आम्हा तिघींनाही ती दुःखदायक बातमी कळाली. आधीच पेपरचे टेन्शन आणि त्यात संजयच्या मृत्यूची बातमी. डोकं अगदी बधिर होऊन गेलं. पेपरमध्ये काय लिहिले हे आम्हा तिघींनाही (छाया, पूनम, वैजयंती) आठवत नाही. नंतर घरी गेल्यावर त्याच दिवशी आम्ही त्याच्या आठवणींना उजाळा देत लेखनाला शब्दरूप दिले. आणि ते सर्व लिखाण एकत्र करून हा लेख तयार केला.

संजय एका सर्वसामान्य कुटुंबातील होता. त्याला दोन बहिणी होत्या. तो एकुलता एक होता. म्हणून त्याच्या आई-वडिलांच्या त्याच्याकडून फार अपेक्षा होत्या. त्यांच्या म्हातारपणाचा तो आधार होता. त्याच्या बोलण्यातून नेहमी त्याच्या घरच्यांचा उल्लेख होत असे.

प्रत्येक आई आपल्या मुलावर उदंड प्रेम करत असते. मग जरी त्या मुलामध्ये काही व्यंग असले तरी, आईचे प्रेम कमी होत नाही. तशीच संजयच्या आईच्या प्रेमाची पाखर त्याच्यावर होती.....'संजय दृष्टिहीन होता.'

संजय हा लहानपणापासूनच अंध होता. मात्र तरीदेखील विद्यार्थ्यांना ज्ञानाचा प्रकाश देण्याचे कार्य तो करणार होता. त्याला शिक्षक व्हायचे होते. जगातील निसर्ग, मनुष्य, वस्तू हे सारे त्याला दिसत नव्हते. परंतु, त्याचे स्पर्शज्ञान आणि आवाज ऐकून माणूस ओळखण्याचे ज्ञान खरोखरच आश्चर्यकारक होते. आमचे क्लास ॲडव्हायझर श्री.आल्हाट सरांनी हळूच त्याच्या खांद्यावर हात ठेवला तरी तो लगेच म्हणत असे, 'काय काम आहे, सर?' यावरूनच त्याचे स्पर्शज्ञान किती अचूक होते हे कळायचे. संजयचे देवावर आणि देशावर उत्कट प्रेम होते, विश्वास होता. 'ऐ मेरे वतन के लोगो.....' हे लता मंगेशकर यांनी गायिलेले देशावरील गीत संजयला फार आवडत असे. तो नेहमी हे गीत म्हणत असे. याखेरीज त्याला इतिहास आणि राज्यशास्त्र हे विषय फार आवडायचे.

अकरावीपासून तो आमचा चांगला मित्र होता. आम्ही त्याला अभ्यासात मदत करीत होतो. तो नेहमी आम्हाला प्रश्न विचारत असे. त्याचे काही प्रश्न तर इतके बिकट असत की त्यांची उत्तरे देणे केवळ अशक्यच होते. त्याचबरोबर आमच्या वर्गातील मुलेदेखील नेहमीच सर्व बाबतीत संजयला मदत करीत असत. संजयचा सर्वांत जवळचा मित्र सुदेश होता. सुदेश संजयबरोबर नेहमी असे. तो त्याला सर्वप्रकारची मदत करीत असे.

आपल्या अपंगत्वावर मात करून संजयला स्वतःच्या आयुष्यात काहीतरी बनायचे होते. परंतु, नियतीने त्याला साथ दिली नाही. २४ ऑक्टोबर १९९६ या दिवशी आमचा हा मित्र काळाच्या उदरात गडप झाला. अशा मित्राला विसरणे खरोखरच अशक्य आहे.

ईश्वर त्याच्या आत्म्यास चिरशांती देवो.

★ ★ ★

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबद्दलच्या अपेक्षा

कु. मीनल इंदोरे, प्रथम वर्ष, कला

या दुनियेमध्ये थांबायाला वेळ कोणाला?
हे जीवन म्हणजे.....थांबला तो संपला!

अशीच काहीशी स्थिती आपल्यापैकी अनेकांची होते ना? चांगली भली मोठी पदवी असल्याशिवाय, भल्यामोठ्या पगाराची नोकरी नाही आणि त्याशिवाय माणूस स्वस्थ, शांत जीवन कसा जगणार, आणि जर त्याचे जीवन असे नसेल तर तो थांबलाच की!

खरं तर शिक्षण म्हणजे पदवी, पदविका अभ्यासक्रम अशी किती साधी, सोपी सरळ व्याख्या आपण करून टाकतो. मात्र नक्की शिक्षण किंवा Education म्हणजे काय? "To draw out' अव्यक्त आणि सुप्तावस्थेत असलेले गुण आणि शक्ती यांना जागृत करणे म्हणजे Education. शिक्षणाच्या या व्याख्येला आमची आजची शिक्षणव्यवस्था कितपत न्याय देऊ शकणार आहे. असे शिक्षण इंग्लंड, अमेरिकेच्या शिक्षण व्यवस्थेतही दिले जात नसेल. शिक्षण हे जीवनासाठी आहे. जीवन शिक्षणासाठी नव्हे आणि तर मग जगण्यासाठी सर्वात आवश्यक असणाऱ्या आमच्या मूलभूत गरजा भागविल्या गेल्या पाहिजेत. पण त्याचबरोबर चांगले जवीन जगण्यासाठी उदरनिर्वाहाच्या साधनांबरोबरच त्याला संस्काराची जोड हवी. शिक्षण हे या दोन्ही पातळ्यांवर सारखेच राहिले पाहिजे. जर आजचे शिक्षण असे असते, तर एकीकडे नैतिक समस्या अन दुसरीकडे बेकारीच्या समस्या अशा दोन्ही समस्या आमच्यापुढे उभ्या राहिल्या नसत्या.

आज शिक्षणाचा उघड उघड बाजार मांडला जात आहे. पदव्या विकत घेता येतातच, त्याचबरोबर तिच्या मागणी प्रमाणे तिच्या किमतीमध्ये उलाढाल होते. एखाद्या विशिष्ट अभ्यासक्रमाचे लेबल लावून विद्यार्थ्यांना या बाजारात सोडले जाते आणि प्रत्येक दुकानासमोर जाऊन ते आपलीच किंमत ठरवितात. शिक्षण संस्थांची 'मंदिराची' संकल्पना कधीच मागे पडून हळूहळू त्याला बाजाराचे स्वरूप येऊ घातले आहे. तिथे पुन्हा एकदा मंदिराची पावित्र्यता आणण्यासाठी प्राचीन काळच्या तपोवन पद्धतीचा आढावा घ्यावा लागतो. स्वतःची सर्व कामे स्वतः करणे, शेती किंवा आपला पिढीजात व्यवसाय शिकणे, त्याचबरोबर वेद पठण, संगीत, शास्त्र अशा निरनिराळ्या गोष्टी शिकवून विद्यार्थी घडविले जात. मुलाच्या भावी आयुष्याचा पाया शिक्षण आहे, तोच इथे पक्का केला जात असे.

जीवन जगण्याची कला शिक्षण आहे. सुंदर जीवन कसे जगायचे हे शिक्षणाने शिकविले पाहिजे. जातीपातीच्या भिंती, गरीब—श्रीमंतातील भेदाभेद काढायचा असेल तर राखीव जागा ठेवून किंवा डोनेशनवर प्रवेश मिळवून नाही काढता येणार. त्यासाठी शाळा, महाविद्यालये, आश्रम झाली पाहिजेत. तिथे कोणीही मोठा अथवा छोटा नव्हता म्हणूनच श्रीकृष्ण आणि सुदामासुद्धा परममित्र झाले. आजचे हुशार विद्यार्थी इतिहास, भाषा असा एखादाच विषय घेऊन डॉक्टरेट मिळवितात. मात्र महाभारतातील संदर्भानुसार पांडवांनी जीवनात आलेल्या कठीण समस्यांना तोंड देताना प्रसंगी शेतकरी, क्षत्रिय, आचारी, नर्तकी आणि ब्राह्मणाची कामे केली आहेत. मग सुधारित मानवाची, आमची आजची शिक्षण व्यवस्था श्रेष्ठ की हजारो वर्षांपूर्वीची तपोवन व्यवस्था?

शिक्षण जीवनोपयोगी ठरले तर अनेक समस्या सुटतीलच पण त्याचबरोबर ते व्यवसाय उपयोगी असणे आवश्यक आहे. क्रमिक अभ्यासक्रमाबरोबर आज आम्हाला बाहेरच्या निरनिराळ्या कोर्सेसची गरज भासते. किंबहुना आज त्यालाच जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. असे घडावे याचे कारण उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध करून देताना

आमची शिक्षण व्यवस्था कमी पडते आहे म्हणूनच ना? भरपूर शिक्षण घेऊनही नोकरी लागत नाही. अशा शिक्षणाचा उपयोग कशासाठी केवळ पदवीसाठी? कॉम्प्युटर, गार्डनिंग, लेदर वर्क यासारखे नवनवीन कोर्सेस उदयाला येत आहेत, कारण मुळात आज त्यांची गरज अधिक वाढते आहे मात्र त्याप्रमाणे शिक्षणाच्या अभ्यासक्रमात अपेक्षित बदल केले जात नाही.

भारताच्या येणाऱ्या भावी पिढीची मुख्य गरज व्यवसायाभिमुख व जीवनाभिमुख शिक्षण हीच आहे. जीवनात एकमेकांना समांतर असणाऱ्या या दोन्ही गोष्टी आहेत. जर पाया भक्कम असेल तर इमारत कोसळण्याचा धोका नसतो आणि म्हणून हा पाया भक्कम करण्याचे काम शिक्षणाचे आहे. आमच्यातले सुप्त गुण जागवून, त्याला आकार देऊन कामाला लावावे, अशी अपेक्षा शिक्षणाकडून आहे. शिक्षणव्यवस्थेत यांची पूर्ती व्हावी हीच आमची अपेक्षा आहे.

★ ★ ★

## काही घटना अशा असतात

मनाच्या अंतरंगात अलगद त्या जपलेल्या असतात
दु:खाच्या अंधाऱ्या क्षणी
मनाला आशेचा कोवळा किरण दाखवत असतात
एखाद्या
गार वाऱ्याच्या झुळकेसारख्या सुखावत असतात
आणि म्हणूनच आपल्या मनात
अशा अनेक घटनांची जाळी विणलेली असतात
मन तुझ्या आठवणी
खोल कप्प्यात दडवतं
कारण त्यामुळे माझं वर्तमानही
भूतकाळात हरवतं.

मोनाली गोरे
तृतीय वर्ष, वाणिज्य

## विष

पैसा नसता तर
नसले असते कोणी महान
नसले असते कोणी लहान
सर्वांना मिळाले असते
हक्क एक समान
खचला नसता कुणाचा धीर
मोडले नसते कुणाचेही घर
पैसा नसता तर
मांडला नसता कुणी
आपल्या शरीराचा बाजार
घेतला नसता कुणी कुणाचा जीव
पैशा विन होऊन बेजार
झाला नसता कधी
कुणी विरुद्ध पक्षपात
केला नसता कुणी कुणाचा
पैशासाठी घात
आले नसते जवळ कोणी
गेले नसते दूर
पैसा नसता तर

योगेश द. खडके
द्वितीय वर्ष, वाणिज्य

## दोष तुमचा नाही!

नीळकंठ संत हे स्त्रियांना कमी लेखत नव्हते. ते नेहमी स्त्रियांशी सौजन्यपूर्वक वागायचे. कधीही त्यांच्यावर टीका करत नसत. एकदा स्त्रियांच्या सभेत बोलत असताना ते म्हणाले, ''अजूनपर्यंत मी कुरूप महिला पाहिली नाही.'' त्या वेळी पुढील श्रोत्यातील एक नाक चपटे असलेली स्त्री पुढे आली व म्हणाली, ''महाराज मी कशी दिसते!'' महाराज म्हणाले, ''बाईसाहेब, तुम्ही तर इतर स्त्रियांप्रमाणे नंदनवनातून पडला आहात. परंतु तुम्ही पडताना नाकावर पडलात, हा काही तुमचा दोष नाही.''

तुषार रंधवे
प्रथम वर्ष, कला

# भीमाशंकर : एक निसर्गरम्य स्थळ

कु. पूनम विजय भोंडवे, १२ वी ( कला)

सहल म्हटली की आपणा सर्वांनाच आनंद वाटतो. शाळेची सहल, कुटुंबियांबरोबरची सहल व फक्त आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबरची सहल. प्रत्येक प्रकारच्या सहलीचे महत्त्वच काही वेगळे. रोजच्या कंटाळलेल्या जीवनापासून मिळणारी थोड्या काळाची सुटका म्हणजेच सहल होय. अशाच एका सुटकेचा आनंद मी दिवाळीच्या सुट्टीत मिळविला आहे. आणि तो आनंद मला तुम्हा सर्वांबरोबर वाटायचा आहे.

मी आणि आमचे सर्व कुटुंब भीमाशंकर येथे गेलो होतो. माझ्या आजीला देवदर्शनाचे फार वेड आहे. त्यांच्यामुळेच नेहमी आम्हाला वेगवेगळी ठिकाणे पाहायला मिळतात. या वेळीही आजींची इच्छा आणि काकांचे प्रयत्न यामुळे आमच्या सर्व कुटुंबाला भीमाशंकर या निसर्गरम्य स्थळाचे दर्शन घडले.

खेड, पेठ, मंचर यामार्गे आम्ही भीमाशंकर येथे पोहोचलो. हा प्रवास करताना माझे सर्व लक्ष खिडकीच्या बाहेर क्षणभर दिसणाऱ्या दृश्यांकडेच होते. खेड, पेठ, पोखरीचा घाट बघताना हिरवीगार वनराई, खोल दऱ्या, वळणावळणाचा रस्ता व दरींमध्ये वसलेली छोटी-छोटी गावे. सर्व मनोरम वाटत होते. माझ्या आजीचे माहेर अवसरी याच मार्गात येते. तेथून जाताना आजीच्या सर्व आठवणींना उजाळा मिळाला. सर्वांचे लक्ष आजीच्या बोलण्याकडे होते. पण माझे लक्ष मात्र सर्व बाजूंना दिसणाऱ्या निसर्गाकडे व निळ्याभोर आकाशाकडे होते. समोर मला अनेक गोष्टी दिसल्या. डोंगराच्या अगदी टोकावर पतंग उडविणारी मुले, नदीत मनसोक्त डुंबणाऱ्या गाई-म्हशी. डोंगरमाळावर सरसर चढणारे आदिवासी लोक. या सर्व गोष्टी जरी जुन्याच असल्या तरी मात्र मला त्या नवीनच वाटत होत्या. डोंगराच्या खडकाळ जमिनीत तेथे शेती केली जाते. 'पाझर तलाव' तेथे ठिकठिकाणी असलेले मला आढळले. 'डिंभे' हे धरण पाण्याने पूर्ण भरलेले होते. या धरणामुळे तेथील पाण्याचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणात सुटलेला आहे. भीमाशंकरला हिरवीगार वनराई आणि निसर्गसौंदर्य लाभलेले आहे.

भीमाशंकरला पोहोचल्यानंतर सर्वजण अगदी निसर्गरम्य होऊन गेले. प्रत्येक जण आपआपल्या परीने तेथील निसर्गाचा आनंद घेण्यात रममाण झालेले होते. भीमाशंकर हे मंदिर डोंगरावर आहे. परंतु, वर सपाटीवर गेल्यावर खाली जमिनीच्या थोड्याशा आत शंकराचे ते भव्य मंदिर वसलेले आहे. मंदिराचे बांधकाम जुन्या पद्धतीचे आहे व आता तेथे थोडीफार सुधारणा करण्यात आली आहे. मंदिराच्या समोर दोन दीपमाळा आहेत. घुमट आणि चंद्राकृती फुलांच्या आकाराचे नक्षीकाम या दगडी देवळात आढळते. मंदिराच्या कळसावर विविध देवतांच्या मूर्त्या आहेत. मंदिराच्या एका देवळीत ध्यानस्थ स्थितीत पुढे कमंडलू व हातात रुद्राक्षाच्या माळा असलेल्या एका तपस्वीची दगडी मूर्ती आहे. ती मला सर्वांत अधिक आवडली. तसेच तडतडीची फुलेदेखील.

'भारत खेड्यात वसतो.' असे म्हटले जाते. पण या खेड्यांचा विकास मात्र अजूनही पूर्णपणे झालेला नाही. हे मला प्रत्यक्षात अनुभवायला मिळाले. तेथे विजेच्या, पाण्याच्या आणि इतर सुविधा अल्प प्रमाणात आहे. शहरातील लोकांना खेड्यांमध्ये जायला आवडत नाही. त्यामुळे ते निसर्गातील निर्मळ आनंदाला मुकतात. सिमेंटच्या जंगलात कृत्रिम जीवन जगणाऱ्या या मानवाला निसर्गातील रम्यमय वातावरणात जगायला मिळत नाही. शहरात लहानाची मोठी झालेली आम्ही शहरी मुले या आनंदाला मुकतो. फ्रिजचे थंड पाणी पिणाऱ्यांना झऱ्याचे स्वच्छ, निर्मळ, थंडगार पाणी पिण्याचे सौभाग्य क्वचितच मिळते. शरीर बळकट राहावे यासाठी योगाभ्यास न करता आम्ही परदेशी व्यायाम प्रकारांचा आश्रय घेतो.

शंकर, महादेव, शिवशंभू इत्यादी नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या कैलासपती शंकराची मंदिरे नेहमी दऱ्या-खोऱ्यांत, दुर्गम ठिकाणी असतात. परंतु देवदर्शनाच्या निमित्ताने तरी मनुष्य निसर्गाच्या या विविध पैलूंनी नटलेल्या वातावरणात थोडा काळ तरी जातो.

★ ★ ★

# लोककला – स्वरूप

शैलेंद्र पंढरीनाथ काळे, तृतीय वर्ष, कला

मऱ्हाटमोळ्या मऱ्हाटी लोकसंस्कृतीचं प्रतिबिंब महाराष्ट्राच्या परंपरागत लोककलांमध्ये दिसते. महाराष्ट्राला समृद्ध लोककलांचा वारसा लाभलेला आहे. जगताना अन्न, वस्त्र आणि निवारा यांची गरज जशी असते, तितक्याच तोलामोलाची साहित्य, कला आणि संस्कृती यांची गरज जीवन जगताना उपयोगी दिसते. या गरजांची योग्य सांगड आपल्या जीवनात घातली. तर नक्कीच सुख, समाधान आणि शांती मिळेल. समाज मनातून येणारे साद आणि उमटणारे पडसाद आपणास विविध लोककलांमधून पाहवयास मिळतात. महाराष्ट्राच्या मऱ्हाटी मनात लोककलांचे स्थान महत्त्वाचे आहे म्हणूनच महाराष्ट्रातील मऱ्हाटी समाज सांस्कृतिकदृष्ट्या खूपच प्रगत दिसतो.

काटक, कष्टाळू, रगेल आणि रंगेल, मध्यम बांध्याची मऱ्हाटी माणसं, तलवारीच्या खणखणाटांनी निनादलेल्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील पाठीशी मावळमुलूखात, शौर्य बजविणारे मऱ्हाटी बाण्याचं फाकडं असं मऱ्हाटी मन. ज्ञानबा-तुकोबाच्या नामघोषात, टाळ-मृदुंगाच्या जल्लोषात, भक्तिरसात तुडूंब न्हाणारे, लावणीच्या श्रृंगारात मनोमन डुंबणारं हे कलासक्त मऱ्हाटी मन यानंच महाराष्ट्राची लोककला जन्माला घातलेली दिसून येते.

केवळ मनोरंजन किंवा लोकरंजन यासाठी या कला उदयास आल्या नसून लोकरंजनातून उद्‌बोधन आणि प्रबोधन घडावे तसेच याद्वारा नीतिमूल्ये समाजाच्या मनात खोलवर रुजली जावीत या हेतूने लोककला उदयास आल्या.

'उठा उठा जी मायबाप । तुम्हा कशी लागली झोप।'

अशी प्रबोधनाची भूमिका घेऊन मराठी संतांनी सर्वात प्रथम लोकशिक्षण घडविले. त्यांनी एकता-एकात्मता आणि अखंडतेच्या त्यागाची भगवी पताका खांद्यावर घेतली. समता-समानतेची दिंडी काढली. सामाजिक जीवन जगण्याची नीतिमूल्ये मऱ्हाटी मनात खोलवर रुजविली.

पूर्वी, महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात, गावगाड्यात जाऊन बोली भाषेत सांगणारा, शिकविणारा आणि जाता जाता लोकरंजनातून लोकशिक्षण करणारा एक फार मोठा लोककलाकारांचा गोतावळा या महाराष्ट्रात नांदत होता. वाघ्या-मुरळी, भराडी, गोंधळी, वासुदेव, बहुरूपी, जागल्या, कडकलक्ष्मी, भुत्या, पांगुळ, पिंगळा, कुडमुड्या जोशी अशा अनेक लोककलाकारांचा हा महाराष्ट्र होता. आपापल्या परंपरागत अभिनयातून ही मंडळी पूर्वी उभ्या महाराष्ट्राचं रंजन करीत होती. बहुतेक राजा, वतनदार यांच्या तूपरोटीपेक्षा सामान्यजनांच्या भाकरी तुकड्यावर हे लोककलेचे सर्व लोकरंग उपासक आपले चरितार्थ चालवित होते. भक्तीतून कलाविष्कार करणाऱ्या दशावतार, जागरण, कीर्तन, पोतराज, डौरी, कोकेवाले यांनाही समाजात मानाचे स्थान होते.

दिवसभराच्या कष्टाचा परिहार करण्यासाठी महाराष्ट्रातील मऱ्हाटी समाज भलरी, लेझीम, धनगरी, गजा इत्यादी विविध लोककला–खेळात रंगत होता. बहुजन समाज आपल्या पोटासाठी कळसूत्री बाहुल्या नाचवीत, छाया–नाट्य, यमपुरी, डोंबारी, कोल्हाटी यांचा नाच, तमाशाचा फड, नंदीबैलवाला, दरवेशी, गारुडी, भांड, बहुरूपी ही मंडळी उदरनिर्वाह करण्यासाठी लोककलेचा उपयोग करीत होती.

आजच्या आधुनिकीकरणाच्या यंत्र-युगात अशा लोककला, लोकाभिनय, लोकसाहित्य ऱ्हास पावू लागलेल्या दिसतात.

मोट गेली तशी मोटेवरची गाणीही गेली. इंजिन-मोटार आली व भैरूची खड्या आवाजातील भलरीचे स्वरही गगनात विरून गेले. 'जाते' गेले आणि जात्यावरच्या ओवीतून आपल्या प्रतिभेची उधळण करणाऱ्या ग्रामीण स्त्रियांचा कंठ गिरणी डंकात विरला.

भोग सोडून त्यागाचे दान मागणारा आणि त्यासाठी रामनामाची महती गाऊन गाव जागवत रामप्रहरी येणारा 'वासुदेव' हा कधीतरी दिसू लागला. वासुदेव, बहुरूपीचे केवळ चित्रातूनच दर्शन घडेल की काय? अशी चिंता आता निर्माण झाली आहे.

विवेकसंपन्नतेचा होरा सांगणारा 'जोशी', स्वतः फाटक्या झोळीत आपलं जीवन न्याहाळणारा 'कुडमुड्या जोशी', आपली गर्भ-श्रीमंतीच्या स्वप्नांची झोळी भरत आजच्या युगात घरदार धुंडाळत आहे. 'पांगुळ', 'पिंगळा', 'भांड' हे तर काळाच्या ओघात लोप पावलेले दिसतात. 'लळित', 'भारूड', 'तमाशा', 'कठपुतली', 'कीर्तन' अशा काही लोककलांना लोकरंग देवतेच्या कृपा-प्रसादाने का होईना पण लोककलामंच मिळाल्यामुळे आजही त्या थोड्याफार प्रमाणात टिकून राहिल्या.

दळण-वळण आणि प्रसार माध्यमात होणाऱ्या विकासामुळे पाश्चात्यांच्या संस्कृतीत मऱ्हाटी मनाची संस्कृती लय पावते की काय? पाश्चात्यांच्या संस्कृतीचा अविचारी मनाने आज सर्व स्थरातील जनता-जनार्दन स्वीकार करू लागलेली दिसते, परिणामी 'कशात काय अन् फाटक्यात पाय' अशी दयनीय स्थिती आज होऊ पाहत आहे. 'आई-दादा' म्हणणारं कालचं पोर आज 'मम्मी-डॅडी' बोलतो आणि जिवंतपणीच जन्म देणाऱ्या आईचं थडगे व पित्याची डेड-बॉडी स्मशानात नेऊ पाहत आहे. पूर्वी लहान मुलांना पाळण्यात असतानाच माता 'रामरक्षा', 'मारुतिस्तोत्र' वदवून घेत असत पण आजच्या युगात चित्रपटातील अश्लील, अर्थहीन स्तोत्रे (गाणे) आजची मम्मी वदवून घेताना दिसते. कधीकाळी भजन कीर्तनात, भारूडात नाचणारे तरुण आज बेफान होऊन पाश्चात्य संगीतावर आपल्या अंगातले गुण उधळून नाचत आहेत. परकियांच्या अनुकरणाची सवय आणि या कृत्रिम जीवनाचा – मायेचा झराच इथे कोरडा पडू पाहत आहे.

अशाप्रकारे महाराष्ट्रात लोककलांच्याद्वारे होणारे लोकरंजनातून लोकशिक्षण आज लोप पावलेले दिसते. लोककलांच्याद्वारे होणारे लोकप्रबोधन थांबलेले दिसते. प्रभातकाळी पूर्वी ऐकू येणाऱ्या जात्यावरच्या ओव्या, तुळशीवृंदावनाभोवती सडा घालताना म्हटली जाणारी स्तोत्रे, भूपाळी इत्यादी लोकगीतांचे स्वर आजच्या यांत्रिकीकरणामुळे व परकियांच्या जीवन जगण्याच्या आसक्तीच्या अनुकरणामुळे महाराष्ट्राचं मऱ्हाटमोळी मऱ्हाटी मनं आपल्या लोकसंस्कृतीच्या लोककलांना पारखी होत जाताना दिसतात. ही ह्या महाराष्ट्रीय मऱ्हाटी मनाची शोकांतिका नव्हे काय? तद्वत लोककलांचा ऱ्हास होऊ घातलेला नाही काय?

★ ★ ★

## दुरावा

तो तुझा दुरावा, तुझे मनाशी झुरणे
अव्यक्त कथांना, उराशी घेऊन जगणे
भंगले स्वप्न ते, संपून गेली गाणी
या आयुष्याची, झाली एक विराणी
तो दोष ना तुझा, ना माझा काही
न कळतच घडूनी गेल्या गोष्टी काही
तू दुरावली अन् जग दुरावले सारे
या वाटेवरती, उरले फक्त निखारे
जे दुःख तुझे, ते माझेही आहे.
आपुले व्यथांशी, नाते जुळले आहे.
हा नको दुरावा, नको मनाशी झुरणे
तू साथ दे मजला, सुंदर करूया जगणे.

कुणाल इंगळे
तृतीय वर्ष, विज्ञान
(इलेक्ट्रॉनिक)

# असे आकाराला येतात आपले अर्थसंकल्प

प्रा. सुरेश मेहता (सी. ए.)

आगामी आर्थिक वर्ष १९९७-९८ च्या अंदाजपत्रकाची चाहूल आता सगळ्यांनाच लागलेली आहे. अपवाद वगळता दरवर्षी सामान्यतः २८ फेब्रुवारी दरम्यान पुढील आर्थिक वर्षाचे सर्वसाधारण अंदाजपत्रक लोकसभेत सादर केले जाते. अंदाजपत्रकाच्या पोतडीत काय दडले आहे हे जाणून घेण्याची अती तीव्र उत्कंठा सर्वांनाच विशेषतः व्यापारी, उद्योजक, करदाते, अर्थशास्त्रज्ञ, राजकीय पक्ष ह्यांना असते. अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी त्यासाठी घ्यावे लागणारे श्रम, घटनात्मक बाबी ह्यांची माहिती अत्यंत रोमांचक आहे. अंदाजपत्रक बनविले जाण्याबाबतच्या तरतुदींची ढोबळमानाने माहिती देणे हा ह्या लेखाचा मूळ हेतू आहे.

अंदाजपत्रकाबाबतच्या तरतुदी आपल्या देशाच्या घटनेच्या कलम क्र. ११० ते ११३ मध्ये प्रामुख्याने करण्यात आलेल्या आहेत.

## आर्थिक वर्ष

प्रत्येक अंदाजपत्रक हे नेहमी एप्रिल ते मार्च ह्या कालावधीसाठी तयार करण्यात येते. सन १८६७ पासून हा वित्तीय वर्षाचा कालावधी वापरण्यात येत आहे. सन १९८४ मध्ये हा कालावधी बदलून आपल्या देशातील परिस्थितीला साजेसे वित्तीय वर्ष सुचविण्यासाठी केंद्रशासनाने श्री. लक्ष्मीकांत झा ह्यांच्या नेतृत्वाखाली एक बहु सदस्यीय समिती नेमली होती. सदर समितीने 'जानेवारी ते डिसेंबर असे आर्थिक वर्ष आपल्या देशात मानावे' अशी शिफारस केली होती. परंतु काही व्यावहारिक अडचणींमुळे सदर शिफारस प्रत्यक्षात अमलात आणता आली नाही.

## अंदाजपत्रकाची पूर्व तयारी

पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करणे वित्त मंत्रालयास सुलभ व्हावे म्हणून सर्व प्रथम शासनातील सर्व खात्यांना त्यांचे स्वतःचे पुढील वित्तीय वर्षाचे जमा आणि खर्च रकमांचे अंदाज तयार करावे लागतात. (ही प्रक्रिया वित्त विधेयक मांडण्यापूर्वी सुमारे ८ महिने चालू होते.) सदर अंदाज 'योजनांतर्गत' आणि 'योजनाबाह्य' बाबींसाठी स्वतंत्रपणे तयार करावे लागतात. अशी संभाव्य रक्कम निश्चित करताना मागील आर्थिक वर्षाचा प्रत्यक्ष खर्च, चालू वर्षातील देय रकमा आणि शासकीय धोरण ह्यांचा प्रामुख्याने विचार करण्यात येतो. उदा. वित्तीय वर्ष १९९७ - ९८ साठीच्या अंदाजपत्रकाची तयारी सप्टेंबर १९९६ पासूनच होते. पुढील वित्तीय वर्षाचा अंदाज बांधण्यापूर्वी अनेक व्यावहारिक बाबींचा विचार करून चालू वित्तीय वर्षातील जमा आणि खर्च रकमांचे सुधारित अंदाज बांधण्यात येतात. सुधारित अंदाजपत्रकाचा आधार घेऊन पुढील वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येते. तसेच एखाद्या बाबीवर जर मूळ अंदाजपत्रकातील मूळ तरतुदीपेक्षा सुधारित अंदाजपत्रकात जादा खर्च लागणारा खर्च / दर्शविण्यात आला असेल तर संविधानातील कलम ११५ प्रमाणे अशा जादा खर्चास अनुदानास चालू वित्त वर्षातच लोकसभेची मान्यता घ्यावी लागते. त्यानंतर अशा विनियोग विधेयकास (Appropriation Bill) संसदेत मंजुरी घेऊन मा. राष्ट्रपतींची मान्यता त्यास घेण्यात येते. म्हणजे सन १९९६-९७ चे सुधारित अंदाज, सन १९९७-९८ च्या अंदाजपत्रका अगोदर तयार करण्यात येतील आणि त्यांच्या आधारे सन १९९७-९८ चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.

आगामी वित्तीय वर्षाच्या जमा / खर्चाचा अंदाज बांधताना संबंधित खात्यांना सर्व गोष्टींचा अत्यंत काळजीपूर्वक विचार करावा लागतो. अनावश्यकरीत्या खर्चासाठी बांधलेल्या जादा अंदाजांमुळे अगर वास्तवापेक्षा जमा रकमा कमी गृहीत धरल्यामुळे करदात्यांवर करांचा जादा

बोजा पडू शकतो अगर काही खर्च विकासाचे दृष्टीने प्राधान्याचे असेल तरी त्यांच्यामध्ये निधींच्या कमतरतेमुळे कपात करावी लागते. ह्याच्या उलट खर्चाचा अंदाज कमी धरला गेला अगर जमा रक्कम वास्तवापेक्षा जास्त गृहीत धरली गेली तर वित्तीय वर्षाच्या अखेरीस मोठी तूटही येऊ शकते. अगर अनिष्ट कर प्रस्ताव अगर बिगर प्राधान्य खर्च यामुळे अर्थव्यवस्थेवर दूरगामी विपरीत अनिष्ट परिणाम घडू शकतो. राजकीय दृष्ट्याही ह्यातून काही समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणून अंदाजपत्रक बनविताना पुढील आर्थिक वर्षाच्या जमा आणि खर्चाचा अत्यंत वास्तव, व्यावहारिक अंदाज करावा लागतो. म्हणूनच ही विशेषतः आपल्या सारख्या विकसनशील देशामध्ये एक तारेवरील कसरत असते. ह्यासाठी प्रामुख्याने चालू आणि मागील वित्तीय वर्षातील प्रत्यक्ष जमा, खर्चाचे आकडे, विकासाचा दर, इतर अनुषांगिक बाबी, इत्यादींचा सखोल विचार करण्यात येतो.

वेगवेगळ्या खात्यांच्या भांडवल रकमांचा अंतिम अंदाजपत्रकात समावेश करताना केंद्रीय वित्त मंत्रालयाने त्यांना घालून दिलेल्या आर्थिक मर्यादा काटेकोरपणे पाळाव्या लागतात तसेच ज्या बाबींवर पूर्वी खर्च झालेला नव्हता अशा नवीन बाबींवर / प्रकल्पावरील खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करण्यापूर्वी अशा खर्चास वित्त मंत्रालय आणि जरूर तेथे नियोजक मंडळ ह्यांची पूर्व मान्यता घ्यावी लागते. उदा. रु. १५,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लोकांना आता सार्वजनिक वितरण व्यवस्थेखाली जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दराने देण्यात येणार आहेत असे संयुक्त आघाडीतर्फे जाहीर करण्यात आले आहे. ह्यासाठी लागणाऱ्या खर्चास आता वेगळी मान्यता घेण्यात येईल. जर असा खर्च / प्रकल्प दीर्घकालीन असेल तर प्रशासकीय, व्यावहारिक, सामाजिक, नैसर्गिक इ. बाबींचा विचार करून एकूण खर्चापैकी आगामी वित्तीय वर्षात करावयास लागणाऱ्या संभाव्य खर्चाचीच तरतूद अंदाजपत्रकात करण्यात येते. म्हणूनच कोकण रेल्वेसारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पांसाठी प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकात वेगळी तरतूद करण्यात येते.

अशा तऱ्हेने सर्व मंत्रालयाकडून आलेल्या सर्व संभाव्य अंदाजावरून राष्ट्रीय पातळीवरील सर्व जमा / खर्च रकमा, अशा रकमांचे महसुली / भांडवली, योजनांतर्गत /योजनाबाह्य इत्यादी उपशीर्षकांखाली वर्गीकरण करून अर्थ मंत्रालयाने ठरविलेल्या प्रधान शीर्षक आणि गौण शीर्षकाखाली त्या एकत्रित करण्यात येतात. शेवटी त्या नुसार बाबवार अनुदान मागण्या तयार करण्यात येतात. हीच अंदाजपत्रक निर्मितीची मुख्य प्रक्रिया होय.

अंदाजपत्रक बनविताना संबंधित खाते आणि अर्थ मंत्रालय शक्य तेवढा अचूक अंदाज बांधण्याचा प्रयत्न करतात. ह्या अचूकतेबरोबर कोणत्या बाबींना अंदाज पत्रकात खर्चासाठी प्राधान्य द्यावयाचे ह्याचा तुलनात्मक अभ्यास करून एखाद्या वेळेस प्रकल्पाचा खर्च जास्त असूनही विकासाची गरज, प्रादेशिक असमतोल दूर करणे, इत्यादी कारणांसाठी काही प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येते, राष्ट्रीय पातळीवर कोकण रेल्वेसाठी केंद्रीय रेल्वे खात्याने खास तरतूद करून हा महत्वकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य पातळीवर असाच प्रकार, प्रयत्न कृष्णा खोरे विकास महामंडळाबाबत आपणास आढळतो.

## अंदाजपत्रक आणि वित्त आयोग (Budget & Finance Commission)

आपल्या संविधानातच्या कलम २८० अन्वये आपले मा. राष्ट्रपती प्रत्येक पाच वर्षांनी पाच सदस्यीय वित्त आयोगाची स्थापना करतात. आगामी पाच वर्षात केंद्र शासनाने संकलित केलेल्या करांची केंद्र आणि राज्यांमध्ये वाटणी करण्यासाठी शिफारशी करणे, संयुक्त निधीतून राज्यांना अनुदान देणे आणि राष्ट्रपतींनी सोपविलेल्या इतर वित्तीय बाबींवर केंद्राला शिफारस करण्याचे कार्य वित्त आयोग करतो. ह्या शिफारशींचा विचार अंदाजपत्रक तयार करताना केंद्रीय अर्थ मंत्रालयास करावा लागतो. कारण वित्त आयोगाच्या शिफारशींमुळे केंद्राच्या संयुक्त निधीमधून राज्यांना अनुदानाद्वारे आणि करविभागणीद्वारे किती रक्कम द्यावी लागणार हे केंद्रीय अर्थ मंत्रालयास सलग पाच वर्षे अगोदरच कळत असते. हीच रक्कम राज्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकातही केंद्रशासनाकडून येणे म्हणून ''अंदाजे जमा'' सदरात दर्शविली जाते. अशी शिफारस करताना अर्थव्यवस्थेतील विकासाचा दर, चलन

वाढ, अनेक गोष्टी / बाबींचा विचार वित्त आयोगावर करावा लागतो. वित्त आयोगाचे काम अंदाजपत्रकापूर्वी सुमारे पाच वर्षांपर्यंत अगोदर होते हे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईलच.

## अंदाजपत्रक आणि नियोजन मंडळ (Budget & Planning Commission)

वित्त आयोगाप्रमाणे 'नियोजन मंडळास' संविधानात्मक स्थान नाही. परंतु प्रत्येक आर्थिक वर्षाच्या केंद्रीय (आणि राज्यांच्या) अंदाजपत्रकाच्या जडणघडणीमध्ये नियोजन मंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. नियोजन मंडळाच्या अध्यक्षपदी नेहमी पंतप्रधान असतात, तर उपाध्यक्षपदी सत्ताधारी पक्षाशी निष्ठा असणारे नेते असतात. म्हणूनच सध्या नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदी प्रा. दंडवते आहेत. हीच जबाबदारी श्री. चंद्रशेखर यांच्या पंतप्रधानपदाच्या वेळी श्री. मोहन धारियांनी स्वीकारलेली होती; तर श्री. राजीव गांधींच्या काळात श्री. प्रणव मुखर्जी यांनी उचललेली होती.

केंद्र आणि राज्य शासनांशी चर्चा करून नियोजन मंडळ पंचवार्षिक योजना तयार करते आणि त्यास राष्ट्रीय विकास मंडळाची मान्यता घेण्यात येते. नियोजन मंडळ आणि केंद्र शासन / राज्य शासन यांमधील अशी चर्चा प्रथम अधिकारी पातळीवर आणि अंतिम टप्प्यात लोकप्रतिनिधी पातळीवर होते. चर्चेच्या प्राथमिक फेरीत नियोजन मंडळातील सल्लागार आणि केंद्राचे / राज्य शासनाचे वित्त सचिव यांच्यामध्ये विविध मार्गांनी एकूण संभाव्य उपलब्ध निधी आणि त्याचा वापर यावर चर्चा होते. अशा उपलब्ध / जमा होऊ शकणाऱ्या निधींमध्ये देशांतर्गत आणि परकीय कर्जे, अल्पबचत इत्यादी स्रोतांचाही विचार करण्यात येतो. तसेच खर्चामध्ये अशा कर्जाची परतफेड, त्यावरील व्याज यांचाही समावेश करण्यात येतो. अर्थात यामध्ये वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्राने राज्यांना द्यावयाचे अनुदान आणि कर्जे यांचाही केंद्र / राज्यांच्या अर्थसंकल्पात योग्य तऱ्हेने समावेश करण्यात येतो. राज्यांनी नियोजन मंडळाकडे पाठविलेल्या भविष्यकालीन अंदाजामध्ये नियोजन मंडळाशी चर्चा करताना बदल होऊ शकतो. अशा चर्चेचे सविस्तर टिपण/ वृत्तांत तयार करण्यात येते. या टिपणांचा आधार घेऊन राज्याचे/ केंद्राचे पंचवार्षिक योजना कालावधीचे उद्दिष्ट आखण्यात येते.

बऱ्याचदा आयुर्विमा महामंडळ, भारतीय औद्योगिक विकास बँक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया सारख्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थांनाही अशा चर्चेच्या वेळी आमंत्रित करण्यात येते. कारण पंचवार्षिक योजनेत समाविष्ट केल्या गेलेल्या अनेक योजनांना निधी पुरविण्याची जबाबदारी अगर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ह्या संस्था उचलतात. उदा. मा. श्री. मनमोहन सिंग यांच्या शेवटच्या सन १९९५-९६ च्या अंदाजपत्रकावरील भाषणात त्यांनी सर्वसाधारण विमा महामंडळातर्फे 'अपंग कल्याण निधी योजना' राबविण्यात येईल अशी घोषणा केली होती. ती घोषणा करण्यापूर्वी अर्थातच वर म्हटल्याप्रमाणे सर्वसाधारण विमा महामंडळाशी त्यांनी चर्चा केलेली होती आणि त्या चर्चेनुसार आता सर्वसाधारण विमा महामंडळाने संबंधित योजना जाहीर केली आहे. शासन आणि राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमधील योजना पूर्व समन्वयाचे हे एक उदाहरण आहे. अशी इतरही अनेक उदाहरणे नियमितपणे आपणांस पाहावयास मिळतात.

अधिकारी पातळीवरील योजनापूर्व चर्चेनंतर विविध केंद्रीय खात्यांबाबत सामान्यतः केंद्रीय मंत्री आणि राज्यांबाबत राज्याचे मुख्यमंत्री आणि नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष यांच्यामध्ये संबंधित पंचवार्षिक योजनेवर सविस्तर चर्चा होते. या धोरणानुसारच महाराष्ट्र राज्याची सन १९९७-९८ ची योजना निश्चित करण्यासाठी प्रा. मधु दंडवते, श्री. मनोहर जोशी, श्री. प्रकाश जावडेकर आणि श्री. एकनाथ खडसे यांची दि. २९.१.१९९७ रोजी दिल्लीत चर्चा होऊन, आपली ४९,९५० कोटी रुपयांची पंचवार्षिक आणि ८,३२५ कोटी रुपयांची सन १९९७-९८ ची योजना मंजूर करण्यात आली आहे.

अशा तऱ्हेने प्रत्येक राज्यासाठी राज्य पातळीवर आणि केंद्र शासनासाठी केंद्रीय पातळीवर वैयक्तिक पंचवार्षिक योजना तयार झाली, की नियोजन मंडळातर्फे अशा सर्व पंचवार्षिक योजना एकत्र करून राष्ट्रीय पातळीवर संपूर्ण देशासाठी पंचवार्षिक योजना तयार

करण्यात येते. पंचवार्षिक योजनांचा आराखडा डोळ्यांसमोर ठेवूनच केंद्राचे आणि राज्यांचे वार्षिक अर्थसंकल्प तयार करण्यात येतात. अशा वार्षिक अर्थसंकल्पीय आखणीच्या वेळी 'बिगर योजना' खर्चाची मर्यादा देखील निश्चित करण्यात येते.

वरील लिखाणावरून वित्त आयोग, नियोजन मंडळ आणि अर्थसंकल्प यांचा एकमेकांशी अत्यंत घनिष्ट संबंध असल्याचे आपणास दिसून येईल.

अशा तऱ्हेने अनेक पातळीवरील चर्चेच्या माध्यमातून एकदा अर्थसंकल्प तयार झाला, की हा अर्थसंकल्प आपल्या घटनेतील कलम क्र. ११२ तल तरतुदींनुसार लोकसभेतच सादर करण्यात येतो. ह्या वार्षिक अर्थसंकल्पात खालील पत्रकांचा समावेश होतो.

| पत्रक क्र. | तपशील |
|---|---|
| १. | भारताचा संयुक्त निधी (Consolidated Fund of India) (आगामी वित्तीय वर्षात भांडवली आणि महसुली मार्गांनी (१) जमा होणाऱ्या रकमा (Finance Bill) आणि (२) खर्च होणाऱ्या रकमा (Appropriation Bill) |
| २. | भारताच्या संयुक्त निधी (विशिष्ट खर्चासाठी राखून ठेवलेल्या रकमा (Charged Expenditure) |
| ३. | आकस्मिक निधी (Contingency Fund of India) (जमा उणे खर्च रकमा) |
| ४. | सार्वजनिक निधी खाते (Public Account of India) |
| ५. | केंद्रशासित प्रदेशांचे अंदाजपत्रक (Budget of Union Territory) |

ही सर्व पत्रके मिळून वार्षिक आर्थिक पत्रके तयार होतात. ह्या पत्रकांबरोबरच वित्त विधेयकांतील विविध तरतुदी स्पष्ट करणारे पत्रक प्रसूत करण्यात येते.

## अंदाजपत्रकातील तूट

बऱ्याचदा अर्थसंकल्पात जमेपेक्षा खर्च जास्त असू शकतो, असा जादा खर्च महसुली स्वरूपाचा असल्यास अशा तुटीस महसुली तूट म्हणतात.

## वित्त विधेयक (Finance Bill)

वार्षिक हिशेबपत्रके लोकसभेत सादर करताना/ घटनेच्या कलम ११०(१) प्रमाणे त्याचबरोबर वित्त विधेयक सादर करण्यात येते. वार्षिक हिशेबपत्रकात किती महसूल जमा करावयाचा आहे ह्याचा अंदाज असतो, तर सदर महसूल कोणत्या मार्गाने कर लावून उभारावयाचा आहे आणि त्यासाठीचे विविध कर प्रस्ताव वित्त विधेयकाद्वारे केंद्र शासन मांडते. वित्त विधेयक लोकसभेत सादर करण्यापूर्वी त्याला राष्ट्रपतींची शिफारस घ्यावी लागते. महसूल उभारणीच्या ह्या मार्गात आयकर, संपत्ती कर, टपाल दर, उत्पादन शुल्क, सीमा शुल्क इत्यादी उत्पन्न स्रोतांचा समावेश होतो. अशा प्रकारचे प्रस्ताव मांडताना त्यामागील पार्श्वभूमी स्पष्ट करणारे परिपत्रकही वित्त विधेयकास जोडले जाते.

## अंदाजपत्रकातील नियोजित कर प्रस्ताव

अंदाजपत्रकात वित्तीय वर्षातील खर्चाचा अंदाज निश्चित केल्यानंतर हा खर्च भागविण्यासाठी जे जे निरनिराळे मार्ग विचाराधीन असतात त्यात विविध प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष करांचा प्रामुख्याने विचार होतो. सर्वच करांचा भार शेवटी कमी जास्त प्रमाणात नागरिकांवर पडतो; परंतु जो कर स्वतः नागरिकांना स्वतः शासनाकडे भरावा लागतो त्याला प्रत्यक्ष कर म्हणतात. उदा. आयकर, व्यवसाय कर इत्यादी. ज्या करांची झळ प्रत्यक्षरीत्या नागरिकांस जाणवत नाही. त्यास अप्रत्यक्ष कर म्हणतात. उदा. वाहनांवरील उत्पादन शुल्क.

करांचा प्रस्तावित दर आणि त्याचे परिणाम कमी जास्त असले तरी अशा नियोजित कर प्रस्तावामुळे देशाच्या/ राज्याच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा होणारा एकूण परिणाम (आणि काही वेळेस राजकीय दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून) कोणत्या नागरिकांना याचा कारभार सहन करावा लागणार आहे याचाही विचार करण्यात येतो. उदा. महाराष्ट्र राज्यात वाहनांवर जादा प्रवेश कर आकारण्यात येत असल्यामुळे प्रत्यक्षात कायमस्वरूपी महाराष्ट्रात वापरण्यात येणारी वाहने कागदोपत्री गोवा, मध्यप्रदेश, गुजरात इ. राज्यात नोंदविली गेल्याचे आणि महाराष्ट्राचे नुकसान झाल्याचे आपण पाहतो. तसेच गरिबांच्या

कळवळ्याच्या नावाखाली १५ नव्या पैशास साधे पोस्टकार्ड विकून कोट्यवधी रुपयांचे शासनाचे गेली अनेक वर्षे नुकसान होत असल्याचेही आपण पाहतो.

काही वेळेस अविचाराने केलेल्या कर प्रस्तावांमुळे अर्थव्यवस्थेस चलनवाढीचा धोकाही निर्माण होऊ शकतो. आपल्या देशासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत चुकीचे अंदाजपत्रक नाईलाजाने जरी सादर करावे लागले तरी अशी तूट किमान पातळीवर राखण्याची काळजी अर्थमंत्रालयाला घ्यावी लागते.

## अनुदान मागण्या आणि विनियोग विधेयक

**(Demand For Grants & Appropriation Bill)**

वार्षिक अंदाजपत्रक आणि वित्त विधेयक संसदेत सादर करताना घटनेच्या कलम ११३ प्रमाणे अनुदान मागण्या (The Demand For Grants) मांडल्या जातात. अर्थात संयुक्त निधीवर असणाऱ्या स्थायी खर्चाच्या बोजाबाबत (Charged Expenditure) मतदान होत नाही. त्यावर चर्चा मात्र केली जाते. अशा खर्चात अनेक बाबींचा समावेश होतो. उदा.

१) राष्ट्रपतींचे वेतन, भत्ते इत्यादी
२) राज्यसभेचे अध्यक्ष–उपाध्यक्ष आणि लोकसभेचे सभापती, उपसभापती यांचे वेतन, भत्ते इ.
३) सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची वेतन, भत्ते, निवृत्तिवेतन इ.
४) उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची वेतन, भत्ते, निवृत्तिवेतन इ.
५) महालेखाकार आणि नियंत्रकांची वेतन, भत्ते, निवृत्ती इ.

वरील स्थायी खर्च सोडून भारताच्या संयुक्त निधीतून वार्षिक, आर्थिक पत्रकातील इतर अंदाजित खर्च करण्यास परवानगी घेण्यासाठी मा. राष्ट्रपतींच्या शिफारसीनुसार वित्तमंत्री अनुदान मागण्या आणि विनियोग विधेयक (Appropriation Bill) लोकसभेत सादर करतात. (हे वाक्य येथे फक्त दोन ओळीत लिहिलेले असले तरी प्रत्यक्षात) लोकसभेत सादर केलेल्या अनुदान मागण्या आणि विनियोग विधेयक शेकडो छापील पानांमधून मांडले जातात.

## अंदाजपत्रकावरील चर्चा आणि त्यास मंजुरी

अंदाजपत्रक सादर केल्यानंतर त्यावर संसदेत सविस्तर चर्चा होते. अंदाजपत्रकावरील एकूण दोन टप्प्यात होते. पहिल्या टप्प्यात अर्थमंत्र्याच्या अंदाजपत्रकावरील भाषणावर चर्चा होते. ह्या चर्चेत सामान्यतः शासनाचे आर्थिक धोरण, कर प्रस्ताव, मागील वित्तीय वर्षातील महत्त्वाच्या घडामोडी इत्यादींचा समावेश होतो. दुसऱ्या टप्प्यात अनुदान मागण्यांवर चर्चा होते. ह्याच दरम्यान महालेखाकार आणि नियंत्रकांच्या लेखा परीक्षण अहवालावर आणि सार्वजनिक लेखा समितीच्या त्यावरील शिफारशींवर सविस्तर चर्चा होते. ह्याच वेळी अनुदानांमधील रकमा एका शीर्षकाकडून दुसऱ्या शीर्षकाकडे संसदेच्या परवानगीने हस्तांतरित/ वर्ग करण्यात येतात. बऱ्याचदा मूळ अनुदानापेक्षा त्या शीर्षकावर जादा रक्कम खर्च होते. अशी मूळ अनुदानापेक्षा जादा खर्च होणारी रक्कम जादा अनुदानाचे द्वारे मंजूर करून घ्यावी लागते. ह्या प्रक्रियेनंतरच अंदाजपत्रकीय काम खऱ्या अर्थाने पूर्ण होते. त्यानंतर त्याला राष्ट्रपतींची मंजुरी घेण्यात येते. अशा मंजुरीनंतर वित्तविधेयकाचे (Finance Bill) वित्त कायद्यात (Finance Act) रूपांतर होऊन त्याच्या राजपत्रामध्ये प्रसिद्धीनंतर त्याची कार्यवाही केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळामार्फत करण्यात येते. ह्या लेखातील सदर ढोबळ चर्चा प्रामुख्याने केंद्रीय अंदाजपत्रकाशी संबंधित असली तरी ह्याच तत्त्वावर राज्यांचे अंदाजपत्रक तयार करण्यात येते.

ह्या वित्त विधेयकातील काही तरतुदी घटनेतील केंद्र सरकारच्या विशिष्ट अधिकारांमुळे वित्त विधेयक सादर केल्याबरोबर लागू होतात. तर काही तरतुदी वित्त विधेयक मंजूर झाल्यानंतर अर्थमंत्र्यांनी सुचविलेया तारखेपासून लागू होतात. ह्याच मुळे टपाल सेवा, उत्पादन शुल्क, सीमा शुल्क आणि पेट्रोल इत्यादींची दखल वित्त विधेयक मांडल्याच्या दिवसाच्या रात्री १२.०० वाजल्यानंतर लगेचच लागू होते. तर इतर करदरांतील बदल वित्त विधेयकांच्या मंजुरीनंतर त्यात सुचविलेल्या दिनांकापासून अंमलात येतात.

## कपात सूचना

सत्तारूढ पक्षाच्या दृष्टीने 'कपात सूचना' हा फार मोठ्या धोक्याचा कंदील होय. सत्ताधारी पक्षाने

लोकसभेसमोर मांडलेल्या अनुदान मागण्यांमध्ये कपात सुचविणे म्हणजे अप्रत्यक्षरीत्या सत्तारूढ पक्षास खऱ्या अर्थाने बहुमत आहे की नाही हे अजमाविण्याचा प्रयत्न होय. सामान्यतः केंद्रात बहुमताचे शासन असेल तर कपात सूचना नामंजूर होते. दुर्दैवाने जर अशी अनुदान मागण्यांवर विरोधी पक्षाने मांडलेली कपात सूचना लोकसभेत मंजूर झाली, तर सत्तारूढ पक्षावर सभागृहाचा अविश्वास आहे हे सिद्ध होते आणि म्हणूनच अशावेळी सत्तारूढ पक्ष राजीनामा देतो. अशी कपात सूचना अगदी एक रुपया एवढ्या कमी रकमेची असू शकते. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या देशाच्या अर्थसंकल्पीय इतिहासात 'कपात सूचना' मंजूर होऊन कोणत्याही सत्तारूढ शासनाने पदत्याग केलेला नाही.

अत्यंत थोडक्या शब्दांत अंदाजपत्रकाच्या पूर्वतयारी पासून ह्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबतचे अत्यंत संक्षिप्त शब्दांकन करावयाचा हा प्रयत्न आहे. जिज्ञासूंनी अधिक सविस्तर अभ्यासासाठी संविधानाचा (आणि इतर अनुषंगिक) कायद्यांचा जरूर अभ्यास करावा.

**पत्रक क्र. १ : शासकीय निधी**

| संयुक्त निधी | आकस्मिक निधी | सार्वजनिक निधी |
|---|---|---|
| (प्रामुख्याने लोकसभेच्या अधिपत्याखाली (संविधानाचे कलम क्र. २६६(१) | (संविधानाचे कलम क्रमांक २६७) (प्रामुख्याने राष्ट्रपतींच्या अधिपत्याखाली, आकस्मिकरीत्या करावा लागणारा बिगर अंदाजपत्रकीय तरतूद खर्च अगोदर ह्या खात्यातून केला जातो. नंतर पूरक मागण्या लोकसभेत मांडून विनियोग विधेयकास मंजुरी घेऊन असा केलेला खर्च नियमित करण्यात येऊन संयुक्त निधीतून आकस्मिक निधीकडे वर्ग केला जातो. | (संविधानाचे कलम क्रमांक २६६(२) अल्प बचत भविष्य निर्वाह निधी इत्यादी. |

**भांडवली**

| जमा | खर्च |
|---|---|
| ★ कर्ज घेतलेल्या उभारणी कर्जाची | |
| ★ कर्ज परतफेड, वाटपाची राज्यांना राज्यांकडून कर्ज परतफेड वाटप | |

**महसुली**

| जमा | खर्च |
|---|---|
| कर | |
| बिगर कर | |

**पत्रक क्र. २ : सर्व आर्थिक पत्रकांचा / विधेयकांशी पत्रकांचा एकमेकांशी संबंध दर्शविणारे ढोबळ वर्गीकरण.**

वार्षिक आर्थिक पत्रके : अर्थसंकल्प

- एकूण अंदाजे जमा रक्कम
  - वित्त विधेयकाद्वारे 'पैसे जमा करण्याची परवानगी (Finance Bill)
    - आयकर
    - उत्पादन शुल्क
    - सीमा शुल्क
- एकूण अंदाजे खर्च रक्कम
  - अनुदान मागण्याद्वारे आणि विनियोग विधेयकाद्वारे 'खर्चास मान्यता' (Demand for Grants and Appropriation Bill)
    - स्थायी स्वरूपाचा खर्च — मागणी जरूर नाही पण चर्चा होऊ शकते.
    - इतर खर्च — अनुदान मागणी करावी लागते आणि चर्चाही होऊ शकते

# यशस्वी जीवनाचा पाया

कु. उज्ज्वला विश्वनाथसिंग रजपूत, द्वितीय वर्ष-कला

जीवन! जीवन म्हणजे नेमके काय आहे? जीवनाचा अर्थ कोणाला सांगता येईल का? जन्म आणि मृत्यू यांनीच जीवन भरलेले आहे का? जीवन म्हणजे एक अथांग सागर आहे. जीवन हे एखाद्या महासागरात अडकलेल्या जहाजासारखे आहे आणि ते सुखाचा किनारा शोधीत असते. जीवन ही सुखदुःखाच्या भोवऱ्यात अडकलेली नाव आहे. सुख आणि दुःख हे प्रत्येकाच्या वाट्याला कमी-जास्त प्रमाणात येत असतात. त्याला धैर्याने तोंड देणे ह्यातच जीवनाचा आनंद समाविष्ट केलेला आहे. सुख आणि दुःख या जीवनाच्या पायऱ्या आहेत; त्या प्रत्येक माणसाला चढाव्या लागतात. त्याच्याशी एकरूप होणे हा यशस्वी जीवनाचा भाग आहे. सुखात सर्वजण आपल्याबरोबर असतात, आपण हसलो की, सर्व जग हसण्याला साथ देते. पण दुःखात आपण रडत असू तेव्हा आपल्याला त्या वेळी कोणीही साथ देत नाही. काहीजण दुःखात खचून जातात, परंतु तसे न होता त्याला धैर्याने तोंड दिले पाहिजे. त्यालाच तर 'जीवन' म्हटले आहे. कारण जीवन म्हटले की, त्यामध्ये धैर्य, संघर्ष, साहस, सहनशीलता, विनम्रताही अंगी असायलाच हवी. तरच ते यशस्वी जीवन म्हणता येईल. हे गुण प्रत्येक माणसाच्या अंगीं असलेच पाहिजे.

"Life is game, play it.
Life is struggle, fight it."

सुखाचा किनारा मिळविण्यासाठी दुःखाच्या लाटांना धैर्याने तोंड द्यावे लागते. जर धैर्याने तोंड दिले नाही तर जीवनाची होडी अशीच भरकटत राहील व शेवटी नष्ट होईल. सुखाची वर्षे माणसाला काहीच शिकवित नाहीत. पण दुःखाचा एक क्षण माणसाला शहाणा करून सोडतो.

"जीवन हा खेळ आहे तो खेळून पाहा
जीवन हा संघर्ष आहे त्याला तोंड द्या
जीवन हे साहस आहे ते करून पाहा
जीवन ही संधी आहे ती वाया दवडू नका"

यशस्वी जीवन जगायला सर्वांना आवडते. त्यासाठी त्याने आपल्या जीवनाचा अर्थ स्वतः समजावून घेतला पाहिजे. त्यासाठी त्याला स्वतःला करावयाची कर्मे ठरवावी लागतात. ती ठरवीत असताना जीवनातील काही नैसर्गिक बंधने असतात आणि ती पाळावीच लागतात.

एखाद्या व्यक्तीने देशासाठी रक्षण करीत असताना मरण पत्करले तर त्याचे जीवन कामाला आले असे म्हटले जाते. तेवढं कर्म केले म्हणजे जीवन का? हे तर जीवनाचे एक अंग आहे. जीवनाचे विविध रंग आहेत तसेच विविध अंगही आहेत. ते आत्मसात करण्यासाठी जीवनाचा व जगण्याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. तरच तो स्वतःच्या जगण्यावर प्रेम करील आणि जो जगण्यावर प्रेम करतो, तोच इतरांसाठी व समाजासाठी काही करू शकतो व प्रेम देऊ शकतो.

"Life is like icecream,
Enjoy it before it melts."

प्रत्येकाला जीवनाचा अर्थ माहीत असतोच असे नाही. त्याचे जीवन हे एखाद्या यंत्राप्रमाणे चालले असते. नोकरी, घर, संसार, अपत्य यामध्येच तो रमून जातो. त्याचे जीवन हे साचेबंद झालेले असते. येणारा प्रत्येक दिवस हा त्याला सारखाच भासत असतो. त्याला दोन रात्रीतील अर्थ माहीत नसतो. येणारी प्रत्येक रात्र ही नवीन दिवस देत असते. येणाऱ्या नवीन दिवसात तो काही नावीन्य निर्माण करू शकत नाही. या उलट ज्या व्यक्तींना जीवनाचा अर्थ कळलेला असतो ते स्वतःसाठी काही कर्मे ठरवीत असताना त्याचा समाजासाठी कसा उपयोग होईल ते पाहतात. त्यांच्या आशा-आकांक्षा उच्चकोटीच्या असतात.

त्यांच्या मते येणारा प्रत्येक दिवस हा काहीतरी नवीन देऊ पाहतो. ते घेण्यासाठी सदैव तयार असतात. त्यांच्या हातून बरीच नवीन कामे घडली जातात. अशा व्यक्ती क्षणिक सुखात अथवा मोहात अडकत नाही. त्यांना कळून चुकलेलं असतं की, 'जीवन हे क्षणभंगुर आहे' त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा.

जो जगण्यावर प्रेम करतो तो इतरांना प्रेम देऊ शकतो, तसेच मरणावरही प्रेम करतो. तो मरणाचे सावट आजच्या सुखाच्या क्षणावर पडू देत नाही. कारण तो जाणतो की मरण हे अटळ आहे. मृत्यू हे अंतिम सत्य आहे. त्याचे भय असता कामा नये. जोपर्यंत मृत्यू आपल्या जवळ येत नाही. तोवर तो आपल्या जीवनाचा आनंद लुटू शकतो. एखादा माणूस सुखी आहे, जीवनाचा आनंद लुटत आहे ही सगळी मृत्यूचीच मेहेरबानी नाही का? ज्यांना जीवनाचा अर्थ समजलेला असतो ते पुरेपूर जीवन जगल्यानंतर मृत्यूलाही कवटाळायला कचरत नाही. कारण त्यांना मृत्यूने केलेल्या मेहेरबानीची परतफेड करावयाची असते. म्हणून तर पूर्वीच्या संत मंडळींनी जिवंत समाधी घेतली असेल.

जीवन यशस्वी होण्यासाठी जगण्याचा अर्थ समजून घेणे व त्याप्रमाणे स्वतःची कर्मे निश्चित करून त्याचा उपयोग स्वतःसाठी व समाजासाठी करून घेतला पाहिजे.

★ ★ ★



शुभांगी शिंदे, तृतीय वर्ष, कला

# भ्रष्टाचार

सुनीता पाटील, एम.कॉम. १

रोज वर्तमानपत्र उघडताच कुठल्या ना कुठल्या तरी भ्रष्टाचाराची बातमी दिसतेच. या बातम्या वाचून फारसं आश्चर्यही कुणाला वाटत नसावं. कारण भ्रष्टाचार ही भारतातल्या जनतेला नित्याचीच बाब झाली आहे. जगातील ज्या देशांमध्ये भ्रष्टाचार आढळतो, त्यातील भारत हा एक अग्रेसर देश आहे. आपल्या देशात भ्रष्टाचार हा केवळ उच्चस्तरीयच नव्हे, तर सामान्य प्रकरणातही आढळून येतो. भ्रष्टाचार ही आपल्या देशाला लागलेली वाळवी असून हळूहळू ही समाज पोखरत सर्वत्र पसरत आहे. 'विना सहकार नाही उद्धार' हे ब्रीदवाक्य नष्ट होऊन 'विना भ्रष्टाचार नाही उद्धार' हे ब्रीदवाक्य किती चपखलपणे रुढ झाले आहे हे आपल्याला रोजच्या बातम्यांतून किंवा प्रत्यक्ष अनुभवातून दिसते.

वास्तविक पाहता भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचार. जो आचार निषिद्ध आहे असा आचार. याची सुरुवात सावकाश झाली परंतु आता भ्रष्टाचाराने किती रौद्र स्वरूप धारण केले आहे हे आपल्याला रोजच्या साखर घोटाळा, युरिया प्रकरण, हवाला प्रकरण, जयललिता प्रकरण, सरकारी निवास वाटप प्रकरण तसेच अशाच मोठमोठ्या प्रकरणातून समजून येते. रस्ते बांधण्यापासून ते इतर सर्व क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार दिसतो, आणि देशातील मोठमोठ्या नेत्यांशी व नेतृत्वाशी निगडित असलेल्या व्यक्तीच प्रामुख्याने दिसतात. सध्या चर्चेचा विषय आहे तो म्हणजे 'भ्रष्टाचार'. देशाच्या माजी पंतप्रधानावरच जर एवढे मोठे भ्रष्टाचाराचे आरोप होतात, तर त्या देशातील इतरांची स्थिती काय असेल याची कल्पनाच न केलेली बरी! हे सर्व पाहून, ऐकून मन अगदी विषण्ण होते! आणि मग आठवण होते ती महात्मा गांधींसारख्या थोर नेत्यांची, भगतसिंग – सावरकरांसारख्या क्रांतिकारकांची! आणि हजारो अशा स्वातंत्र्यप्रेमी बांधवांची ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. आपल्या प्राणांची आहुती दिली कशासाठी? काय होते त्यांचे स्वप्न? आजच्या स्वतंत्र भारताची स्थिती पाहता अशा स्वतंत्र भारताचे स्वप्न सार्‍यांनी नक्कीच पाहिले नसणार!

आज स्वतंत्र भारतातील कोणत्या क्षेत्रात भ्रष्टाचार आढळत नाही? सरकारी संस्था, कार्यालये ही तर भ्रष्टाचाराची केंद्रेच झाली आहेत. तसेच खाजगी क्षेत्रात, अत्यंत पवित्र अशा शिक्षण क्षेत्रातही भ्रष्टाचार आहेच. नोटा पुढे सरकवल्याशिवाय सामान्यांची कामेच होत नाहीत. हजारो-लाखो रुपयांनी भ्रष्टाचार होतो तरी कित्येक दिवस ते उघडकीस येत नाही. ही किती निंदनीय गोष्ट आहे! मोठमोठे नेते ज्यांच्यावर देशाची जबाबदारी आहे, ज्यांनी देशासाठी काही करायचे सोडून करोडो रुपये आपल्या खिशात घातल्यावर भारतासारख्या उज्ज्वल परंपरा असलेल्या देशाचे काय होणार, हे त्या ईश्वरालाच माहीत! तरीही हे सर्वजन विविध युक्त्या करून जामिनावर सुटतात काय? हात उंचावून जमलेल्या लोकांना अभिवादन करतात काय? साराच आनंदीआनंद आहे. यात सर्वात कळस म्हणजे जयललिता प्रकरण. त्यांनी केलेला भ्रष्टाचार पाहून तर राग येण्याऐवजी घृणा येते. आज सत्ता मिळाली, की प्रथम स्वतःची तिजोरी कशी भरता येईल याचाच ध्यास या नेत्यांना लागतो. जणू काही 'माया' जमविण्याची नामी संधीच चालून आली आहे असेच यांना वाटत असावे.

एकीकडे कित्येक जणांना एकवेळचे अन्नही पुरेसे मिळत नसताना दुसरीकडे आपल्या श्रीमंतीचे, वैभवाचे प्रदर्शन करण्यासाठी आपल्या मानसपुत्राच्या राजेशाही

लग्नसोहळ्यात कोट्यवधी रुपये खर्च होताना दिसतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विषमता केवळ भारतातच असू शकते. ही सर्व झाली बड्यांची उदाहरणे. पण सामान्य माणूसही भ्रष्टाचारापासून दूर नाही. मला जर द्यावे लागते तर मी का घेऊ नये? असा सवाल केला जातो. कारण सामान्य माणसांचेही आयुष्य असते, त्यांचेही प्रश्न असतात. मग त्यांच्या तुटपुंज्या पगारात ही सगळी अग्निदिव्ये पार पडणार नसतात. म्हणूनच केवळ भ्रष्टाचाराविरुद्ध न ओरडता तो कसा नष्ट करावा. यांच्याबरोबरच भ्रष्टाचाराचे कारणे शोधणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी माणूस भ्रष्टाचाराला बळी का पडतो हे पाहायला हवं. उठसूठ पोलिसांविरुद्ध ओरडणाऱ्या आणि नेहमी त्यांच्यावर तोंडसूख घेणाऱ्या अशा किती लोकांना पोलिसांच्या व्यथा, अडचणी माहीत आहेत? ज्या पोलिसांवर समाजाच्या सुरक्षिततेची जबाबदारी रात्रंदिवस असते, त्यांच्या खऱ्या अडचणी कोण जाणून घेतो? सर्वात प्रथम मोठ्या व राजकारणी लोकांना करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराबद्दल कठोर शासन झालेच पाहिजे.

समाजातून भ्रष्टाचार दूर करायचा असेल तर भ्रष्टाचाराविरूद्ध केवळ ओरडणे व दुसऱ्यावर फक्त टीका करणे बंद केले पाहिजे व प्रत्येकाने तसे वागले पाहिजे. स्वतःपासून याची सुरुवात केली पाहिजे. कायद्याने जर सामान्य माणसाला त्याच्या जीवनावश्यक गरजा भागविण्याकरिता घेतलेल्या १००–२०० रुपयांसाठी शिक्षा होते, तर हा नियम सर्वांसाठी अमलात आणायला हवा. तरच पैशाचा हव्यास आणि नसता अवास्तव लोभ नष्ट होईल. ज्याप्रमाणे एखाद्या रोगात माणसाच्या शरीरातील दूषित रक्त बदलले जाते. त्याप्रमाणे देशरुपी शरीरातील भ्रष्टाचाराचे दूषित रक्त काढून टाकून नवजीवन निर्माण केले पाहिजे. म्हणजे तो रोगही नष्ट होईल आणि त्याचा प्रसारही! समाजामध्ये विशेषतः युवकांमध्ये भ्रष्टाचारविरोधी जोपर्यंत चीड व राग निर्माण होत नाही, तोपर्यंत भ्रष्टाचाराला आळा घालणे कठीण आहे. कारण आजच्या युवकांमध्ये किंवा युवापिढीमध्ये हे सामर्थ्य आहे.

